रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९। अंक ३३० । पृष्ठे १० ▌RGD/016/2026-28 www.krushival.in


# कृषीवल

रायगड, शनिवार, दि. ९ मे २०२६

किंमत ४ ₹


## सावत्र पित्याकडूनच अत्याचार

**पनवेल** : करंजाडे नोड परिसरात सावत्र पित्याकडून अल्पवयीन मुलीवर गेल्या २ वर्षांपासून अत्याचार सुरू असल्याची संतापजनक घटना उघडकीस आली आहे. पीडित मुलीच्या आईने पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केल्यानंतर हा धक्कादायक प्रकार समोर आला असून, आरोपीविरोधात कठोर कारवाई करण्याची तयारी पोलिसांनी सुरू केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पीडित मुलगी १५ वर्षांची असून, आरोपी हा तिचा सावत्र पिता आहे. सुरुवातीला पित्याच्या नात्याचा आधार घेत त्याने मुलीचा विश्वास संपादन केला. त्यानंतर घरात आई नसताना तिच्यावर पान २ वर

## थलपती विजय घेणार मुख्यमंत्रीपदाची शपथ

**चेन्नई** : तामिळनाडूमध्ये १२१ आमदारांच्या पाठिंब्यामुळे टीव्हीकेचे प्रमुख थलपती विजय यांच्या मुख्यमंत्रीपदाचा मार्ग आता मोकळा झाला आहे. बहुमतासाठी आवश्यक असलेला ११८ आमदारांचा आकडा त्यांनी ओलांडला असून सरकार स्थापन करण्यासाठी त्यांनी तिसऱ्यांदा राज्यपालांची भेट घेतली आहे. राज्यपालांना सादर करण्यासाठी १२१ आमदारांच्या पाठिंब्याची पत्रेही त्यांनी तयार ठेवली आहेत. त्यामुळे थलपती विजय शनिवारी (दि.९) सकाळी ११ वाजता तामिळनाडूचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेणार असल्याची माहिती मिळत आहे. या पाठिंब्यात टीव्हीकेच्या १०७ आमदारांसह काँग्रेसचे ५, सीपीएमचे २, सीपीआयचे २, व्हीसीकेचे २, आययूएमएलचे २ आणि एएमएमकेचा १ आमदार यांचा समावेश आहे.

## वे|ध|क

### वॉचमन काकाच ठरला नराधम

**पनवेल** : ज्याच्याकडे सुरक्षिततेची जबाबदारी सोपवली जाते, त्याच व्यक्तीने माणुसकीला काळिमा फासल्याची धक्कादायक घटना पनवेल तालुक्यातील कामोठ्यात घडली आहे.



एका नामांकित गृहनिर्माण सोसायटीत तैनात असलेल्या पंकज अजयसिंग सिंग या सुरक्षारक्षकाने तीन अल्पवयीन मुलींचा विनयभंग केल्याचे उघड झाले असून, या घटनेमुळे परिसरात तीव्र संताप व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पंकज सिंग हा संबंधित सोसायटीत सुरक्षारक्षक म्हणून कार्यरत होता. लहान मुलांसाठी तो 'वॉचमन काका' होता. मात्र, या नराधमाने मुलांच्या निरागसतेचा गैरफायदा घेतला. ६, ७ व ९ वर्ष वयाच्या मुली सोसायटीच्या आवारात खेळत असताना पान २ वर

### उरण शहरात बिल्डरची मुजोरी



**उरण** : शहरातील वर्दळीच्या रस्त्यावर इमारतीच्या बांधकामासाठी आणलेली रेती थेट रस्त्यावरच ओतली जात आहे. त्यामुळे रस्त्याच्या निम्म्याहून अधिक भाग व्यापल्याने दुचाकी, रिक्षा व पादचाऱ्यांना जीव मुठीत धरून मार्ग काढावा लागत आहे. पावसाळ्यापूर्वीच रस्त्यावर पसरलेल्या रेतीमुळे वाहनांची चाके घसरून अपघात होण्याची शक्यता अधिक आहे. रात्रीच्या वेळी तर दृश्यमानता कमी असल्याने धोका आणखी वाढला आहे. महाराष्ट्र नगरपरिषदा, पान २ वर

### लाखो लिटर पाण्याची चोरी

**पनवेल** : नवी मुंबई पालिकेच्या मोरबे धरणातून पाणी वाहून नेणाऱ्या मुख्य जलवाहिनीवर अनधिकृत जोडणी करून लाखो लिटर पाण्याची चोरी सुरू असल्याचा धक्कादायक प्रकार उघड झाला आहे. विचुंबे ग्रामपंचायत हद्दीत यापूर्वीही मोठ्या प्रमाणावर पाणीचोरी होत असल्याचे समोर आले होते. मात्र, त्यावर ठोस कारवाई न झाल्याने आता पुन्हा नव्याने अनधिकृत जोडणी करण्यात आल्याचा आरोप होत आहे. मोरबे धरणाची जलवाहिनी विचुंबे ग्रामपंचायत हद्दीतून जात असल्याने २००७ मध्ये नवी मुंबई महापालिकेकडून ग्रामपंचायतीला ७०० युनिट पाणी अधिकृतपणे देण्यात आले होते. वाढत्या मागणीमुळे २०१४ मध्ये ही क्षमता १४०० पान २ वर

# दहावीच्या परीक्षेत मुलींची सरशी

**जिल्ह्याचा ९५.०५ टक्के निकाल**

**मुली ९६.४४ टक्के, मुले ९३.७० टक्के उत्तीर्ण**



**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेचा निकाल शुक्रवारी (दि.८) दुपारी ऑनलाईन पद्धतीने जाहीर झाला. या परीक्षेत रायगड जिल्ह्याचा ९५.०५ टक्के निकाल लागला आहे. त्यात मुली ९६.४४ टक्के व मुले ९३.७० टक्के उतीर्ण झाल्याची माहिती समोर आली आहे. यंदाही दहावीच्या निकालामध्ये मुलींनी सरशी मारून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. त्यामुळे विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

नुकताच बारावीचा निकाल जाहीर झाला. त्यानंतर दहावीच्या परीक्षेच्या निकालाची प्रतिक्षा लागून राहीली होती. हा निकाल १५ मे पर्यंत लागणार असल्याची चर्चा सुरु होती. अखेर शुक्रवारी (दि.८) दुपारी दहावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर होणार असल्याची बातमी गुरुवारी (दि.७) प्रसिद्ध झाली. त्याप्रमाणे शुक्रवारी सकाळी साडेअकरा वाजल्यापासून ऑनलाईन पद्धतीने निकाल जाहीर होऊ लागला. यंदा रायगड जिल्ह्यातून दहावीच्या परीक्षेसाठी एकूण ३५ हजार ४७५ विद्यार्थ्यांची नोंदणी झाली होती. मात्र, फेब्रुवारी- मार्चमध्ये घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेला ३५ हजार २१७ विद्यार्थी बसले होते. शुक्रवारी झालेल्या ऑनलाईन निकालामध्ये एकूण ३३ हजार ४६९ विद्यार्थी उतीर्ण झाले. त्यात १६ हजार ९५९ मुले आणि १६ हजार ५१० मुलींचा समावेश आहे. यावेळी जिल्ह्याचा एकूण ९५.३ टक्के निकाल लागला आहे. त्यात मुलांचा ९३.७० टक्के आणि मुलींचा ९६.४४ टक्के निकाल लागला आहे. त्यामुळे यंदाही मुलींनी मुलांच्या तुलनेत सरस काम गिरी केल्याचे स्पष्ट दिसत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांसह पालक आणि शिक्षकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे कौतुक होत आहे.

### कोकण विभाग अव्वल

राज्यातून नऊ विभागीय मंडळांमधून एकूण १५,५५,०२६ नियमित विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी १५,४२,४७२ विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट झाले असून त्यांपैकी १४,२०,४८६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, राज्याचा दहावीच्या निकाल ९२ टक्के इतका लागला आहे. परंतु, गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदाचा निकाल २ टक्क्यांनी घसरल्याची माहिती राज्य मंडळाचे सचिव डॉ. दीपक माळी यांनी पत्रकार परिषेदतून दिली आहे. यावेळी कोकण विभागातून सर्वाधिक ९७.६२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. तसेच, मुलींची टक्केवारी मुलांपेक्षा ५.४० ने जास्त आहे.

### जिल्ह्यातील निकालावर दृष्टीक्षेप

| तालुके | टक्के |
|---|---|
| पोलादपूर | 97.62 |
| महाड | 96.96 |
| कर्जत | 96.91 |
| पनवेल | 95.94 |
| अलिबाग | 95.35 |
| उरण | 94.89 |
| मुरुड | 94.59 |
| माणगाव | 94.50 |
| रोहा | 94.35 |
| पेण | 93.75 |
| म्हसळा | 93.06 |
| खालापूर | 92.14 |
| श्रीवर्धन | 92.14 |
| सुधागड | 89.98 |
| तळा | 86.29 |

### जिल्ह्यात पोलादपूर आघाडीवर

रायगड जिल्ह्याचा ९५.३ टक्के निकाल लागला आहे. त्यात तालुकानिहाय निकालात पोलादपूर तालुक्याने ९७.६२ टक्के निकाल नोंदवत जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळविला आहे. तर, अलिबाग तालुक्याचा ९५.३५ टक्के निकाल लागला असून सर्वात कमी ८६.२९ टक्के निकाल तळा तालुक्याचा लागला आहे.

# पीएनपीचा १०० टक्के निकाल

## श्रीराज मोहिते संस्थेत प्रथम



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

जिल्ह्यातील सर्व पीएनपी एज्युकेशन सोसायटीच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. पीएनपी एज्युकेशन सोसायटीमध्ये होली चाईल्ड स्टेट बोर्ड स्कूल वेश्वीचा विद्यार्थी श्रीराज मोहिते ९७.४० टक्के गुण मिळवून संस्थेत प्रथम आला आहे. तर, वेश्वी गोंधळपाडा मराठी माध्यम शाळेचा विद्यार्थी मयूर खरात ९४ टक्के गुण मिळवून संस्थेत द्वितीय, तर निधय गोंधळी ९३ टक्के गुण मिळवून संस्थेत तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाला आहे.

पीएनपीच्या मराठी माध्यमांमध्ये माध्यमिक शाळा वेश्वी-गोंधळपाडा मराठी माध्यमचा विद्यार्थी मयूर खरात ९४ टक्के गुण मिळवून शाळेत प्रथम आला आहे. निधय गोंधळी ९३ टक्के गुण मिळवून द्वितीय, तर माध्यमिक शाळा मिठागर शाळेची विद्यार्थिनी अंतरा नाक्ती ९१ टक्के गुण मिळवून तृतीय आलेली आहे. पीएनपी इंग्रजी माध्यमांमध्ये होली चाईल्ड इंग्लिश मिडियम स्कूल वेश्वी आणि जी.जे. एम. स्कूल खालापूरचा निकाल १०० टक्के लागला आहे. होली चाईल्ड इंग्लिश मिडियम स्कूल वेश्वीचा विद्यार्थी श्रीराज मोहिते ९७.४० टक्के गुण मिळवून शाळेत आणि संस्थेत प्रथम आलेला आहे. मनस्वी मळेकर ९१ टक्के गुण मिळवून शाळेत द्वितीय, तर मयंक सरपाळे ८७.२० टक्के गुण मिळवून शाळेत तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेली आहे. सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष जयंत पाटील, खजिनदार नृपाल पाटील, कार्यवाह चित्रलेखा पाटील, सर्व शाळांचे मुख्याध्यापक शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आदींकडून अभिनंदन करण्यात आले.

## साडेतीन लाखांचा एमडी जप्त

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

कामोठे येथे अमली पदार्थ विरोधी पथकाने सापळा रचून ड्रग्ज तस्कराला अटक करून त्यावर कारवाई केली आहे. या कारवाईत त्याच्याकडे ३ लाख ६० हजार रुपयांचे ८ ग्रॅम एमडी ड्रग्ज सापडले. अब्दुल खालिद अब्दुल रशीद शेख (३४) असे ड्रग्ज तस्कराचे नाव आहे. तो सराईत गुन्हेगार असून, २०१२मध्ये त्याच्यावर हत्येचा गुन्हा दाखल आहे. मिळालेल्या माहितीनुसार, एकजण ड्रग्ज घेऊन त्याच्या राहत्या घरी गेल्याची माहिती अमली पान २ वर

## चार कर्मचाऱ्यांवर तालुक्याचा भार



**। पेण । प्रतिनिधी ।**

पेण तालुक्यातील पशुवैद्यकीय विभागाची अवस्था सध्या अक्षरशः व्हेंटिलेटरवर गेली असून प्रशासनाच्या ढिसाळ कारभारामुळे शेतकरी आणि पशुपालक संतप्त झाले आहेत. येथील आठ दवाखान्यांपैकी तब्बल चार दवाखाने कर्मचाऱ्यांविना बंद पडले असून, उरलेल्या चार कर्मचाऱ्यांवर संपूर्ण तालुक्याचा भार टाकण्यात आला आहे. परिणामी ग्रामीण आणि दुर्गम भागातील पशुधन अक्षरशः वाऱ्यावर सोडल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.

पेण तालुक्यातील जोहे, कामार्ली, बोरगाव आणि शिहू येथील पशुवैद्यकीय पान २ वर

# उरणचे तहसीलदार अडचणीत

## अब्जावधी रुपयांच्या जमीनी पळविल्याचा आरोप

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

मुंबई एसईझेडच्या अब्जावधी रुपयांच्या जमीनी पळविल्याचा ठपका उरणचे तहसीलदार उद्धव कदम यांच्यावर ठेवण्यात आला आहे. त्यांच्या या पराक्रमाविरोधात महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे तक्रार करण्यात आली आहे. त्यांची चौकशी करण्याचे आदेश महसूल मंत्र्यांनी कोकण आयुक्तांना दिले आहेत. त्यामुळे डॉ. उद्धव कदम मोठ्या अडचणीत सापडले आहेत. त्यांची लवकरच चौकशी होऊन जमीन पळविल्याप्रकरणी गुन्हा दाखल होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

> **मुंबई एसईझेडच्या जमीन हस्तांतरण प्रकरणात कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार केला नाही. नोटीस देऊन योग्य पध्दतीने प्रक्रीया राबविण्यात आली आहे. केलेल्या आरोपाबाबत चौकशीला सामोरे जाण्याची तयारी आहे. – डॉ. उद्धव कदम, तहसीलदार, उरण**

उरण तालुक्यातील हजारो एकर जमीन महा मुंबई एसईझेड या विशेष प्रयोजनासाठी सन २०१० मध्ये संपादित करण्यात आली. त्या सर्व सातबारावर मुंबई एसईझेडचे नाव दाखल झाले. त्यामुळे जमिनीच्या सातबारा उताऱ्यावर कोणत्याही व्यक्तीचे नाव कोणत्याही परिस्थितीत लागू पान २ वर

## वडखळमध्ये अवैध धंद्यांचा सुळसुळाट

**। वडखळ । प्रतिनिधी ।**

वडखळ परिसरात अवैध धंद्यांनी अक्षरशः उच्छाद मांडला असून गांजा, एमडी, गुटखा आणि मटका व्यवसाय पुन्हा एकदा खुलेआम फोफावत असल्याचे धक्कादायक चित्र समोर येत आहे. नुकत्याच झालेल्या कारवाईत तब्बल १ किलो गांजा जप्त करण्यात आला असला, तरी ही कारवाई म्हणजे केवळ वरवरची धूळफेक असल्याची संतप्त प्रतिक्रिया नागरिकांमधून उमटत आहे.

एकीकडे वडखळ परिसरात मोठ्या उद्योगांमुळे आणि कंपन्यांमुळे परप्रांतीयांची संख्या झपाट्याने वाढत आहे. मात्र, रोजगाराच्या आडून काही घटकांकडून अवैध धंद्यांना खतपाणी घातले जात असल्याचे गंभीर आरोप स्थानिक नागरिकांकडून होत आहेत. सध्या परिस्थिती इतकी बिघडली आहे की, वडखळ परिसरात आता व्यसनांचा काळाबाजार उघडपणे सुरू असल्याचे बोलले जात आहे. विशेष म्हणजे, पान २ वर

## रेवदंड्यातील तरुणाई बरबादीच्या मार्गावर

**। रेवदंडा । विशेष प्रतिनिधी ।**


अलिबाग आणि मुरुड तालुक्यासह संपूर्ण रायगड जिल्ह्यातील तरुणांमध्ये अमली पदार्थांचे वाढते प्रमाण ही गंभीर चिंतेची बाब बनली आहे. विशेष म्हणजे २० ते २५ वयोगटातील युवापिढी या व्यसनाच्या जाळ्यात अडकताना दिसत असल्याने सामाजिक चिंता अधिकच वाढली आहे. दरम्यान, रेवदंडा परिसरात गांजा खुलेआम पान २ वर

**लाभार्थी कमी करण्यात वेग | नवीन लाभार्थी निवडीत उदासीनता**

# लाभार्थी इष्टांक पुनर्वापराअभावी रिक्त

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यामध्ये राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम २०१३ अंतर्गत मंजूर असलेला लाभार्थी इष्टांक मोठ्या प्रमाणावर रिक्त राहत असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. जिल्ह्यातील हजारो पात्र व गरजू कुटुंबे आजही अन्नधान्याच्या हक्कापासून वंचित राहत असल्याचे विदारक चित्र स्पष्ट होत आहे. राज्य शासनाकडून मंजूर करण्यात आलेला लाभार्थी कोटा पूर्ण क्षमतेने वापरला जात नसल्याने भविष्यात पुन्हा रायगड जिल्ह्याच्या अन्नसुरक्षा इष्टांकामध्ये कपात होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. लाभार्थ्यांचा कमी वेग आणि नवीन निवडीची उदासीनता पुरवठा विभागाच्या निष्काळजीपणामुळे दिसून येत आहे.






शिधापत्रिका व्यवस्थापन आरसीएमएस प्रणालीवरील दि.७ मे रोजीच्या अहवालानुसार रायगड जिल्ह्यामध्ये अंत्योदय अन्न योजनेसाठी मंजूर असलेल्या ८२ हजार ०५१ शिधापत्रिकांपैकी केवळ ८० हजार ५६३ शिधापत्रिका कार्यरत आहेत. म्हणजेच पान २ वर

### पात्र कुटूंबे लाभापासून वंचित

जिल्ह्याची लोकसंख्या २६,३५,३९४ इतकी असून राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियमाच्या निकषांनुसार जिल्ह्यातील जवळपास दोन तृतीयांश लोकसंख्या लाभासाठी पात्र ठरते. ग्रामीण भागातील ७६.३२ टक्के व शहरी भागातील ४५.३४ टक्के लोकसंख्या या कायद्यांतर्गत सवलतीच्या दराने अन्नधान्याचा लाभ मिळवण्यासाठी संरक्षित आहे. प्रत्यक्षात जिल्ह्यामध्ये अनेक पात्र कुटुंबे अजूनही लाभापासून वंचित आहेत. काही भागांमध्ये इष्टांकापेक्षा जास्त लाभार्थी असल्याच्या तक्रारी आहेत, तर काही ठिकाणी खरी पात्र कुटुंबे प्रतीक्षेत आहेत.

### महाराजस्व अभियान फक्त दिखावा

राज्यात छत्रपती शिवाजी महाराज महास्वराज्य अभियान अंतर्गत तालुका व मंडळ अधिकारी स्तरावर विविध दाखले, प्रमाणपत्रे व नागरिक सेवा मोहिमेच्या स्वरूपात कामे राबविली जात आहेत. फेब्रुवारी ते एप्रिलनंतर मे महिन्यातही या अभियानाचा पुढील टप्पा सुरु आहे. अशा परिस्थितीत जिल्ह्यामध्ये राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेअंतर्गत विशेष लाभार्थी समावेश मोहीम राबविण्याची गरज नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. मात्र, प्रत्यक्षात याबाबत कोणतीही व्यापक किंवा परिणामकारक मोहीम राबविल्याचे दिसून येत नसल्याची खंत विविध स्तरांतून व्यक्त होत आहे.

**पान १ वरून**

## चार कर्मचाऱ्यांवर तालुक्याचा भार

दवाखाने कर्मचाऱ्यांच्या अभावामुळे पूर्णपणे ठप्प झाले आहेत. तर गागोदे, पाबळ, गडब आणि पेण येथील दवाखान्यांतील मोजक्या कर्मचाऱ्यांवर संपूर्ण तालुका सांभाळण्याची जबाबदारी आहे. एखादा कर्मचारी रजेवर गेला की, संपूर्ण यंत्रणा कोलमडते आणि दवाखाने ओस पडतात. त्याचा थेट फटका पशुपालकांना बसत असून जनावरांना वेळेत उपचार मिळत नसल्याने मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे. विशेष म्हणजे पंचायत समिती स्तरावरही दोन महत्त्वाची पदे रिक्त असल्याने प्रशासकीय कामकाजाचा पुरता बोजवारा उडाला आहे. गेल्या पाच वर्षांपासून रिक्त पदे भरण्याची मागणी होत असतानाही प्रशासनाने केवळ आश्वासनांची खैरात वाटल्याचा आरोप नागरिक करत आहेत. दरम्यान, जिल्हा पशुधन विकास अधिकारी तथा उपायुक्त दुग्ध व्यवसाय विकास डॉ. सचिन देशपांडे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी येत्या जून महिन्यात भरती होणार, असे सांगत जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न केल्याची भावना पशुपालकांत व्यक्त होत आहे. मात्र, जूनपर्यंत जनावरांचे काय? असा संतप्त सवाल आता शेतकरी विचारू लागले आहेत.

## साडेतीन लाखांचा एमडी जप्त

पदार्थ विरोधी पथकाला मिळाली. त्यावरून त्यांनी सेक्टर ३४ येथील मानसरोवर कॉम्प्लेक्समधील घरावर छापा टाकला व ड्रग्स तस्कराला ताब्यात घेतले. त्याच्या घराची झडती घेतली असता, ८ ग्रॅम एमडी मिळून आले. त्याची किंमत ३ लाख ६० हजार रुपये असून, हा एमडी त्याने गोवंडीमधून विक्रीसाठी आणला होता. तसेच, ड्रग्ज तस्कर अब्दुल शेख याच्यावर २०१२ मध्ये कळंबोली पोलीस ठाण्यात हत्येचा गुन्हा दाखल असल्याचे समोर आले. याप्रकरणी अब्दुल खालिद अब्दुल रशीद शेख याच्यावर गुन्हा दाखल करून अटक केली आहे.

## उरणचे तहसीलदार अडचणीत

शकत नाही. तरीही उरणचे तहसीलदार डॉ. उद्धव कदम यांनी दलालांच्या मदतीने ही जमीन बेकायदेशीररित्या त्रयस्थ व्यक्तीच्या नावे हस्तांतरित केली आहे. या जमिनींच्या किंमती अब्जावधी रुपये सांगण्यात येत आहे. यामध्ये मुंबई एसईझेडचे वकील ॲड. सागर जगे यांनी लेखी म्हणणे आणि अवॉर्ड पत्र सादर करून हस्तांतरणास लेखी हरकत नोंदविली आहे. तरीही कदम यांनी हा चमत्कार केला असल्याचे दिसून येते. त्यांना याबद्दल विचारले असता त्यांनी रीतसर सुनावणी घेऊन कलम २३६ अन्वये कायदेशीररित्या आदेश पारित केल्याचे सांगितले. तहसलीदार कदम यांना मुंबई एसईझेड यांच्या नावांच्या जागी त्रयस्थ व्यक्तीचे नाव सातबारा सदरी दाखल करण्याचा त्यांना कोणताही अधिकार नाही. मुंबई एसईझेड उलवे येथील अधिकारी आणि लीगल टीमने स्पष्ट सांगितले की, कदम यांनी १५ नोटीस पाठविलेल्या असून त्या प्रत्येक केसमध्ये हस्तांतरण बेकायदेशीर असून त्यास लेखी हरकत नोंदविली आहे. प्रत्येक केसमध्ये अवॉर्ड कॉपीदेखील सादर केली आहे. अवॉर्ड कॉपी सादर केल्यावर त्या जमिनीसंदर्भात कोणताही निर्णय घेण्याचा अधिकार महसूल न्यायाधिकरणाला नाही तो अधिकार सिव्हिल कोर्टाला आहे. त्यामुळे कदम यांनी सिव्हिल कोर्टाचे अधिकार वापरल्याचे स्पष्ट होत आहे. सिव्हिल कोर्टाचे अधिकार वापरून अब्जावधी रुपयांची जमीन अवैधरित्या हस्तांतरित करून कोट्यावधी रुपयांचा मलिदा जमविल्याची चर्चा जनमानसात आहे. कदम यांच्या या प्रकाराविरोधात महसूल मंत्री बावनकुळे यांच्याकडे तक्रार करण्यात आली आहे. या तक्रारीची तात्काळ दखल घेण्यात आली असून चौकशी करून पंधरा दिवसात अहवाल सादर करण्याचे आदेश कोकण विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल यांना दिले आहेत.

## रेवदंड्यातील तरुणाई बरबादीच्या मार्गावर

उपलब्ध होत असल्याच्या तक्रारी नागरिकांमधून सातत्याने पुढे येत आहेत. काही तरुण उच्चभ्रू कुटुंबांतील असून, काहीजण सर्वसामान्य संगती, मैत्री आणि वाईट सवयींच्या प्रभावातून व्यसनाधीन झाल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. अनेकदा वडिलांच्या चारचाकी गाडीतूनच 'दम मारो दम'सारखे प्रकार सुरू असल्याची कुजबुजही नागरिकांमध्ये ऐकू येत आहे. या व्यसनाचा परिणाम केवळ व्यक्तीपुरता मर्यादित राहत नसून संपूर्ण कुटुंब उद्ध्वस्त होत आहे. तरुण वयातच व्यसन लागल्याने त्याचे गंभीर परिणाम त्यांच्या शिक्षण, नोकरी, आरोग्य आणि कुटुंबजीवन या सगळ्यांवर होत आहे. रेवदंड्यातून व्यसनमुक्तीचे कार्य करणाऱ्यांकडून देशभर जागृती केली जाते, तरीही आपल्या भागातच तरुण पिढी व्यसनाच्या गर्तेत जात असल्याने हा विरोधाभास अधिक बोचरा वाटत आहे. इतरांना व्यसनमुक्तीचा संदेश देणारा परिसरच आज व्यसनांच्या विळख्यात सापडतो आहे, अशी प्रतिक्रिया स्थानिकांतून उमटत आहे.

## वडखळमध्ये अवैध धंद्यांचा सुळसुळाट

२ ते ३ वर्षांपूर्वी याच वडखळ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील जिर्णे खोऱ्यात एमडी ड्रग्ज निर्मितीचा प्रकार उघडकीस आला होता. एवढ्या मोठ्या घटनेनंतरही पोलिसांनी धडा घेतला नाही का? असा सवाल आता उपस्थित होत आहे. दरम्यान, अधूनमधून एखादी किरकोळ कारवाई करून पोलीस प्रशासन स्वतःची पाठ थोपटून घेत असल्याचा आरोपही नागरिक करत आहेत. १ किलो गांजा पकडला म्हणजे संपूर्ण रॅकेट संपले का? की हा फक्त बर्फाच्या डोंगराचा टोक आहे? असा संतप्त सवाल आता सर्वसामान्यांमधून विचारला जात आहे. सर्वात गंभीर बाब म्हणजे, एवढ्या मोठ्या प्रमाणावर अवैध धंदे सुरू असताना हे सगळे नेमके कोणाच्या आशीर्वादाने सुरू आहे? कोणाचे राजकीय किंवा स्थानिक संरक्षण या धंद्यांना मिळत आहे? याकडे पोलिस प्रशासन जाणीवपूर्वक डोळेझाक करत आहे का? अशी कुजबूज आता उघडपणे सुरू झाली आहे.

## लाभार्थी इष्टांक पुनर्वापराअभावी रिक्त

तब्बल १ हजार ४८८ अंत्योदय शिधापत्रिका आजही रिक्त आहेत. प्राधान्य कुटुंब योजनेअंतर्गत मंजूर १५ लाख ४० हजार ९७५ लाभार्थ्यांपैकी प्रत्यक्ष कार्यरत लाभार्थी संख्या १४ लाख ३४ हजार ११५ इतकी आहे. त्यामुळे १ लाख ६ हजार ८६० इतका लाभार्थी इष्टांक वापराविना शिल्लक आहे. दोन्ही योजनांचा एकत्रित विचार करता रायगड जिल्ह्यामध्ये सध्या १ लाख ७ हजारांपेक्षा अधिक लाभार्थी इष्टांक रिक्त पडून आहे. जिल्ह्यामध्ये १ हजार ४५५ रास्त भाव दुकाने कार्यरत आहेत. शासनाकडून राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियमांतर्गत अंत्योदय व प्राधान्य कुटुंब या दोन्ही योजनांसाठी एकत्रित दरमहा २ हजार ३८१ मेट्रिक टन गहू व ८ हजार २६२ मेट्रिक टन तांदूळ असा एकूण १० हजार ६४३ मेट्रिक टन अन्नधान्य साठा मंजूर केला जातो. मात्र, लाभार्थी संख्या सातत्याने कमी होत असल्याने जिल्ह्यामध्ये मंजूर क्षमतेनुसार १०० टक्के धान्य उचल व वितरण होत नसल्याचे स्पष्ट होत आहे. परिणामी शासनाकडून मंजूर होणारा अन्नधान्य साठा जिल्ह्यामध्ये पूर्ण क्षमतेने उचल व वितरण होत नसल्याची गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे.

केंद्र शासनाच्या निर्देशानुसार जिल्हा पुरवठा विभागाकडून सध्या मिशन सुधारअंतर्गत आयकर दाते व मोठे आर्थिक उत्पन्न असणाऱ्या अपात्र लाभार्थ्यांची नावे वगळणे, शून्य आधार लाभार्थी हटविणे, सलग सहा महिने धान्य न उचलणाऱ्या शिधापत्रिकांवर कारवाई करणे, मयत व स्थलांतरित लाभार्थ्यांची नावे कमी करणे अशा प्रक्रिया मोठ्या प्रमाणावर राबविण्यात येत आहेत. ही कारवाई शासन नियमानुसार योग्य आणि आवश्यक असल्या तरी, ज्या वेगाने लाभार्थी कमी होत आहेत त्या प्रमाणात नवीन पात्र लाभार्थी निवड प्रक्रिया मात्र प्रभावीपणे राबवली जात नसल्याचे दिसून येत आहे. मुळातच लाभार्थी निवड ही निरंतर प्रक्रिया असल्याने त्याकडेही प्रशासनाने तितक्याच तत्परतेने लक्ष केंद्रित करणे अत्यावश्यक मानले जात आहे.

## सावत्र पित्याकडूनच अत्याचार

वारंवार अत्याचार करण्यात आले. भीतीपोटी मुलगी दीर्घकाळ गप्प राहिली होती. काही कारणांमुळे आरोपी आईपासून दूर गेल्यानंतर पीडित मुलीने धाडस करून आईसमोर आपल्यावर होत असलेल्या अत्याचाराची माहिती दिली. मुलीकडून सारा प्रकार समजताच आईने तातडीने पनवेल शहर पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार नोंदवली. या प्रकरणातील आरोपीवर यापूर्वीही इतर गुन्ह्यांमध्ये पोलिसांनी कारवाई केल्याची माहिती समोर आली आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक राजेंद्र घेवडेकर हे या प्रकरणात अधिक तपास करीत आहेत. आरोपीला लवकरच अटक करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

## वॉचमन काकाच ठरला नराधम

पंकजने त्यांना एकटे गाठून त्यांच्याशी अश्लील चाळे करत विनयभंग केला. या प्रकारानंतर तिन्ही मुली प्रचंड घाबरल्या होत्या. त्यांनी पालकांना घडलेला सर्व प्रकार सांगितला. आपल्या चिमुकल्यांसोबत घडलेला हा घृणास्पद प्रकार ऐकून पालकांनी तत्काळ सोसायटीचे सीसीटीव्ही फूटेज तपासले असता, सुरक्षारक्षाचे संतापजनक कृत्य कॅमेरात कैद झाल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर पालकांनी कामोठे पोलीस ठाण्यात पंकज अजयसिंग सिंग याच्या विरोधात तक्रार दाखल केली. त्यानंतर त्याला अटक करण्यात आली आहे.

## उरण शहरात बिल्डरची मुजोरी

नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ नुसार सार्वजनिक रस्त्यावर बांधकाम साहित्य टाकण्यास सक्त मनाई आहे. बांधकामासाठी नगरपरिषदेची परवानगी घेणे बंधनकारक असून, रस्ता अडविल्यास संबंधित बिल्डरवर दंडात्मक व फौजदारी कारवाईची तरतूद आहे. तसेच, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता कलम अन्वये अवैधपणे रस्ता अडवून केलेल्या कृत्यासाठी बाजारभावाच्या तिप्पट दंड आकारता येतो. तरीही उरणमध्ये मात्र बिल्डरांनी थेट रस्त्यावरच 'साईट ऑफिस' थाटल्यासारखे चित्र आहे. विशेष म्हणजे, ज्या नगरपरिषदेच्या कर निरीक्षक व मुख्य अधिकाऱ्यांनी अशा बेकायदेशीर कृत्यांवर कारवाई करणे अपेक्षित आहे, तेच मूग गिळून गप्प आहेत. संबंधित बिल्डरला त्याची परवानगी आहे का? याची साधी विचारणाही न करता बिल्डरला मोकळे रान कोणी दिले, असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

## लाखो लिटर पाण्याची चोरी

युनिटपर्यंत वाढविण्यात आली. मात्र, वाढत्या शहरीकरणांच्या नावाखाली स्थानिक पातळीवर जलवाहिनीवर बेकायदेशीर जोडण्या करून तब्बल १ लाख युनिटपर्यंत पाण्याचा उपसा सुरू असल्याचा आरोप करण्यात येत आहे. पाणीचोरीचा परिणाम नवी मुंबईतील पाणीपुरवठ्यावर होत असतानाही पालिका प्रशासनाने कारवाई केली नसल्याने संताप व्यक्त होत आहे.

---

**नोटीस** दिनांक : ०९/०५/२०२६

सर्व जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे बेलोशी, ता. अलिबाग, जि. रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक प्रमोद सहदेव पाटील, यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ. स्वरुपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वास कळावे.

**मौजे बेलोशी, ता. अलिबाग, जि. रायगड**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ (हे.आर.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| बेलोशी ता.अलिबाग | २९ | ०-१२-००<br>पो.ख. ०-०३-००<br>एकुण ०-१५-०० | ०.१७ |

दिनांक : ०९/०५/२०२६
अशिलांची सही

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता: फ्लॅट नं.१०३. पहिला मजला, बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट
जे.एस.एम कॉलेज जवळ, अलिबाग-रायगड
मोबा.९७६७०१०९०२

---

**पनवेल महानगरपालिका**
**वैद्यकीय आरोग्य विभाग**

कार्यालय :- देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी, पनवेल - ४१०२०६
दुरध्वनी कार्यालय : ०२२- २७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. : ०२२-२७४५२२३३
उपायुक्त कार्यालय : ०२२ - २७४५५७५१ आयुक्त कार्यालय : ०२२- २७४५२३३९
ई-मेल : panvelcorporation@gmail.com वेबसाईट : www.panvelcorporation.com

जा.क्र./पमपा/वै.आ.वि/ / सन २०२६-२७ दिनांक : ०५.२०२६

**EXPRESSION OF INTEREST (EOI)**
**MHD/EOI-१/२०२६**

विषय: पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील गरोदर मातांना सिझेरियन व गंभीर व गुंतागुंतीच्या प्रसुती दरम्यान आवश्यकतेनुसार जननी शिशु सुरक्षा कार्यक्रमातंर्गत रक्त पुरवठा करणेकरिता रक्तपेढीकडुन स्वारस्य अभिव्यक्ती (Expression of Interest) मागविणेबाबत

राष्ट्रीय आरोग्य अभियान यांच्या मार्गदर्शक सुचनानुसार High Risk गरोदर मातांना जननी शिशु सुरक्षा कार्यक्रमांतर्गत पालिका स्तरावरुन नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र निहाय क्षेत्रामधील गरोदर मातांना पालिकेमार्फत रक्तपुरवठा उपलब्ध करून द्यावयाचा आहे. रक्तपुरवठा सेवा पुरविण्यास इच्छूक असलेल्या रक्तपेढीनी दोन लिफाफे पद्धतीत (Technical and Commercial) होकारपत्र व दरपत्रक सिलबंद पाकीटात दिनांक १८.०५.२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत वैद्यकिय आरोग्य विभाग, पनवेल महानगरपालिका, मुख्यालय, पनवेल येथे स्वारस्य अभिव्यक्ती (Expression of Interest) सादर करावे. याबाबतची संपुर्ण माहिती पनवेल महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर www.panvelcorporation.com उपलब्ध आहे.

सही/-
**(प्रसेनजीत कारलेकर)**
उपायुक्त (वैद्यकीय)
पनवेल महानगरपालिका

---

**THE REVDANDA CO-OPERATIVE URBAN BANK LTD.**
Revdanda, Dist. Raigad - 402 202. PH. :02141-240039 Fax: 02141-240793
Email ID: revdandabank@rediffmail.com

Ref. CUB/ALI/63/2026-27 DATE: 06/05/2026

**Possession Notice**

Whereas the undersigned being the Authorized officer for The Revdanda Co-Op Urban Bank Ltd, Under Securitization and Reconstruction of financial Assets and Enforcement of security Interest Act,2002 and in exercise of powers conferred under section 13(12) read with rule 3 of the security interest (Enforcement) Rule 2002, issued Demand Notice calling upon the following borrowers to repay the amount mentioned in the notice within 60 days from the date of receipt of the said notice.

The borrowers having failed to repay the amount, notice is hereby given to the borrowers in particular that the undersigned had decided to take possession of the properties describe here in below in exercise of powers conferred on him under section 13 (4) of the said Act read with the Rule 9 of the said rules on following dates written below.

The borrower in particulars and in public in general is hereby cautioned not to deal with the property and any dealing with the property will be subject to the charged of The Revdanda Co-Operative Urban Bank Ltd. Revdanda, for the amount given below and interst and other expenses thereon.

| Sr. No | Name and Address of the Borrower/Guarantor | Outstanding as on date 31/01/2026 | Date of Demand Notice | Date of Possession | Description of Immovable Properties |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Mr. Krupanshu Mahesh Soni Block No 6 Second Floor Vishwas Sadan Agar Ali At Post Revdanda Tal Alibag Dist Raigad | 21,49,184.50 | 16/02/2026 | 06/05/2026 | Tukadi and District Raigad, Pot Tukdi and Taluka Alibag, in the area of Sub Registrar Alibag Raigad Zilla Parishad and Panchyat Samiti Alibag, Group grampanchayat Revdana Talathi Saja-Revdanda, Mauje Revdanda at Vishwas Sandan 2nd Floor House No 405/6 Area 915 Sqft Revdanda agar Ali Tal Alibag Dist Raigad |
| 2 | Mrs. Jyoti Krupanshu Soni Block No. 6, Second Floor Vishwas Sadan Agar Ali At Post Revdanda Tal Alibag Dist Raigad | | | | |
| 3 | Mr. Laxman Raghunath Phaphe At Chaulnaka Post Chaul Tal Alibag Dist Raigad | | | | |
| 4 | Mr. Vidnyan Vidyadhar Vaidya At Sundarvilla, Near Sundar Narayan Mandir Post Chaul Tal Alibag Dist Raigad | | | | |

Date- 06/05/2026
Place - Revdanda

Sign/-
Authorized Officer
The Revdanda Co Op Urban Bank Ltd, Revdanda

---

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे कर्जत जि. रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती मिळकत आमचे अशिल यांनी खालील नमूद विद्यमान मालक यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

| मालकाचे नांव | सर्व्हे नं/ हिस्सा नंबर | क्षेत्र चौ.मी. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| सुबोधिनी सुरेंद्र कुलकर्णी | १२/१/अ/१/ड/८ | ०-०२-९१ चौ.मी | २९.१० |

तरी वरील बिनशेती मिळकती संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून सात (०७) दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील बिनशेती मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदर बिनशेती मिळकतीचे खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वास कळावे.

**ॲड. अशोक पालू डुकरे**
रा. प्रभातदर्शन अपार्टमेंट, ब्लॉक नं १०१,
ममदापुर रोड, नेरळ ता. कर्जत, जि. रायगड
फोन नं. ९८८१२७९८१७

---

दि. ०८/०४/२०२६

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे सुचीत करण्यात येत आहे की, आमचे अशिल यांनी मौजे सावळे, ता. कर्जत, जि. रायगड येथील

| सर्व्हे क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्रफळ | आकार |
|---|---|---|---|
| ५४ | ४ | ०-८५-८ पैकी श्री. रमेश मारूती दळवी यांचे अविभक्त हिश्याची ०-४२-९ ची मिळकत | १-३१ |

उपरोक्त शेतजमीन मिळकत विद्यमान मालक श्री. रमेश मारूती दळवी यांचे कडून कायम स्वरुपी खरेदी करावयाची ठरविले आहे. तसा उभयतांमध्ये व्यवहार घडुन आलेला आहे.

तरी उपरोक्त शेतजमीन मिळकतीमध्ये कोणाही व्यक्तीचा कसलाही अगर ताबा, बयाणापावती, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीन, लीज, भाडेपट्टा, अगर फरोक्तखत, खरेदीखत वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसबंध असल्यास सदरील नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ५ दिवसाचे आत खाली सही करणार अधिवक्ता यांचे कडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरूपात दाखल कराव्यात सदर मुदतीत हरकती न आल्यास उपरोक्त शेतजमीन मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन इतर कोणाही व्यक्तींता कसलाही कोणताही कायदेशीर हक्कहितसंबध नाही. व असल्यास ते जाणीवपुर्वक आमचे अशिलांचे लाभात सोडुन दिलेले आहेत. असे समजुन कायदेशिर बाबींची पुर्तता करून आमचे अशिल उपरोक्त बिनशेतजमीन मिळकती संदर्भातचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील आणि मग मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत वा तक्रार आमचे अशिल यांचेवर बंधनकारक राहणार नाही. याची या जाहीर नोटीसने तमाम जनतेने नोंद घ्यावी.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस आहे.

**ॲड. प्रमोद नथुराम सुर्वे**
रा.''मातोश्री'' निवास आवळस, ता. कर्जत, जि. रायगड
भ्रमनध्वनी क्र. ०९८८१५७९५५५

---

नि.८/ड
दिवाणी चौकशी अर्ज ५७/२०२६
निशाणी नं.
ने. ता. १८/०६/२०२६
ॲड. नरेश मारूती बैलमारे

मा. दिवाणी न्यायाधीश साहेब क. स्तर कर्जत, रायगड

**जाहीर नोटीस**

१) मयूर अनिल फाटक
वय ४९ वर्षे, धंदा नोकरी,
रा.बी-२०४, चैतन्य को.ऑप. हौसिंग सोसायटी, पोलीस ग्राऊंड जवळ, कर्जत
ता. कर्जत, जि. रायगड- ४१०२०१. ...अर्जदार नं. १

२) मृगेश अनिल फाटक
वय ४८ वर्षे, धंदा- नोकरी
रा. ४२१, ४२२, ४२३, बी ४, वृंदावन अपार्टमेंट, राजा ठाकूर रोड, राजमाचिकर फ्लोर मिल समोर, शनिवार रोड, पुणे
पिन नं. ४११ ०३० ... अर्जदार नं. २

३) अश्विनी अनिल फाटक
वय ७६ वर्षे, धंदा : रिटायर्ड,
रा. बी-२०४, चैतन्य को.ऑप. हौसिंग सोसायटी, पोलीस ग्राऊंड जवळ, कर्जत,
ता. कर्जत, जि. रायगड- ४१०२०१ ... अर्जदार नं. ३

ज्याअर्थी, अर्जदार कर्जत येथील दिवाणी न्यायालयात दिवाणी चौकशी अर्ज क्रमांक ५७/२०२६ दाखल केला आहे. सदर अर्जामधील अर्जदार नं. १ यांचे वडील आणि अर्जदार नं. २ यांचे वडील आणि नं. ३ यांचे पती कै. श्री. अनिल वासुदेव फाटक हे दिनांक ०६/१०/२०२५ रोजी मयत झालेले आहेत. अर्जदार हेच त्यांचे कायदेशिर वारस असले बाबत दाखला मिळणे करीता अर्ज दाखल केलेला आहे.

तरी या जाहीर नोटीशीने कळविणेत येते की, कै. श्री. अनिल वासुदेव फाटक यांच्या वारसांबाबत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत असल्यास, ही जाहीर नोटीस प्रसिद्ध केल्यापासून ३० (तीस) दिवसांच्या आत लेखी पुराव्यासह या मे. न्यायालयांत दाखल करावी. अन्यथा, सदरील अर्जदार हेच कै. श्री. अनिल वासुदेव फाटक यांचे कायदेशिर वारस आहेत, असे समजून सदरील अर्जदार यांच्या मागणीप्रमाणे वारस दाखला देण्यात येईल.

आज दिनांक ०६/०५/२०२६ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी जाहीर नोटीस दिली आहे.

सही/-
क. लिपिक
दिवाणी न्यायालय,
क. स्तर, कर्जत

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय,
क. स्तर, कर्जत

---

**CAUTION NOTICE**
TO WHOMSOEVER IT MAY CONCERN :

Please take notice that (1) Smt. Ranjan Mahasukh Shah, through her children and predecessors-in-title, viz., (2) Mr. Rohan Mahasukh Shah and (3) Mrs. Vallari Rajesh Shah @ Vallari Mahasukh Shah (hereinafter collectively referred to as "the Owners"), have agreed to sell, transfer and convey in favour of my client, Mr. Sachin Harishchandra Gunjal, the undermentioned property more particularly described in the Schedule hereunder written.

That the Owners have entered into necessary valid, binding and subsisting Agreement with my client and have also received part-payment of consideration for the sale and transfer of the undermentioned property to my client.

That upon refusal to execute Sale Deed of the under mentioned property and complete the sale transaction unto and in favour of my client, my client has filed Suit for Specific Performance and Injunction against the Owners, being Special Civil Suit No. 54 of 2026 before the Civil Judge Senior Division, Alibaug, which please take note.

The general public is therefore hereby cautioned not to deal with and or enter into any transaction with the Owners in respect of the undermentioned property or any part thereof and inspite of the above if anybody deals with the said Owners in respect of the undermentioned property, such transaction shall not be binding upon my client and the same be treated as sham and bogus and any person entering into any such transaction shall be doing so at his/her/their own costs, consequences & peril.

**THE SCHEDULE HEREINABOVE REFERRED TO:**

ALL THOSE pieces or parcels of agricultural lands or grounds and bearing Gat Nos. 454/1 and 454/2 and as detailed herein below:-

| Sr. | Gat No. | Assessment (Rs.-Ps.) | Land Area (H-Are-Sqm) | | Area (sq.mtrs.) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 454/1 | 9.93 | Cultivable Area | 0.70.36 | 7.036 |
| | | | Pot Kharaba | 0.09.64 | 964 |
| | | | Total | 0.80.0 | 8,000 |
| 2 | 454/2 | 6.30 | Cultivable Area | 0.38.66 | 3,866 |
| | | | Pot Kharaba | 0.06.34 | 634 |
| | | | Total | 0.45.00 | 4,500 |
| | | | Grand Total | 1.25.00 | 12,500 |

totally admeasuring 1.25.00 Hectare-Ares, i.e., 12,500 square meters or thereabouts as per record of rights ALONGWITH the structure bearing Gram Panchayat House No.1306 admeasuring 23 x 28 sq. feet, i.e., 644 square feet standing on land bearing Gat No.454/2, situate, lying and being in the revenue Village of Sasawane, Taluka Alibaug, District Raigad and in the Registration Sub-District Alibaug and Registration District Raigad ALONGWITH the benefit of the 6 meters wide Right of Way leading from Dhokavade-Sasawane Village Road to the said Lands and within the limits of Gram Panchayat Sasawane and bounded by as follows:-

On or towards the North : By Gat No.453 and partially by Dhokavade-Sasawane Village Road
On or towards the South : By Gat No.485
On or towards the East : By Gat No.454/3
On or towards the West : By Gat No.452

Place : Mumbai
Date : 09th May, 2026

Adv. Vidhan Patil
Vatsala, Tilak Road, opp SBI,
Alibag, Raigad 402201

---

प्रोसेस जमा
दि.

अर्जदारातर्फे वकील
ॲड. आकांक्षा किशोर दांडेकर

अलिबाग येथील मे. दिवाणी न्यायाधिश क- स्तर सो.
श्रीम. पर्वतकर सो यांचे कोर्टात
दि. चौ. अर्ज नं ७१/२०२६

जाहीर नोटीस

१) श्री. तुषार पांडुरंग मोहिते.
२) सौ.शिल्पा प्रशांत पाटील
(पुर्वाश्रमीची शिल्पा पांडुरंग मोहिते) अर्जदार
३) श्रीमती कांचन केदारनाथ मोहिते
४) कु. निरजा केदारनाथ मोहिते
५) कु. शुभ्रा केदारनाथ मोहिते

विरुद्ध

कोणीही नाही

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, वरील अर्जदार क्र. १ व २ यांचे वडील, अर्जदार क्र. ३ यांचे सासरे, व अर्जदार क्र. ४ व ५ यांचे आजोबा कै. पांडुरंग सदानंद मोहिते दि. ०७/१२/२०२३ रोजी काळबादेवी, मुंबई येथे निधन झालेले असुन त्यांचे मृत्युपश्चात अर्जदार क्रमांक १ ते ५ यांनी वारस दाखला (हेअरशिप सर्टीफिकेट) मिळणेकरीता मे. कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

तरी अर्जदाराच्या मागणीप्रमाणे त्यांना वारस दाखला (हेअरशीप सर्टिफिकेट) देण्यास कोणत्याही व्यक्तीची, कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून एक महिन्यांचे आत किंवा दि. १०/०६/२०२६ पर्यंत स्वतः किंवा त्यांचे वकिलांमार्फत हजर राहून आपली हरकत कळवावी. वर दिलेल्या मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे वारस दाखला (हेअरशीप सर्टिफिकेट) देणेस कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे समजण्यांत येवून मे. कोर्ट आवश्यक तो वारस दाखला (हेअरशीप सर्टिफिकेट) देणेचा हुकूम अर्जदार नं. १ ते ५ यांचे लाभांत करेल त्याची सर्वानी नोंद घ्यावी.

आज दि. ०८/०५/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

सही/-
कनिष्ठ लिपीक
दिवाणी न्यायाधिश
क. स्तर अलिबाग

कोर्टाचा शिक्का

सही/-
अधिक्षक
दिवाणी न्यायालय
व. स्तर अलिबाग

---

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहिर नोटीसने कळविण्यात येते की, आमचे आशिलांनी पुढे नमुद केलेली शेती मिळकत तिचे विद्यमान मालक नसीम बशीर झारी यांचेकडुन कायम खरेदी करण्याचे ठरवले असुन त्याबाबत विद्यमान मालक व आमचे आशिलांमध्ये बोलणी चालु आहेत. मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे-

मौजे अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड येथील व अलिबाग नगरपरिषद हद्दीतील सर्व्हे नं. ४५/२/अ/१ (जुना सर्व्हे नं. ४५/अ/१, हिस्सा नं. १ ब + १ क, प्लॉट नं. १) या बिनशेती मिळकतीवर उभारण्यात आलेल्या वामन को. ऑप. हौ. सोसायटीमधील दुस-या मजल्यावरील निवासी सदनिका क्र. ११, बांधीव क्षेत्र ७८० चौ. फूट (७२.४९ चौ.मी.) (अलिबाग नगरपरिषद मालमत्ता क्र. ALB00000११६८) ही मिळकत.''

सदरहु मिळकतींमध्ये कोणाही व्यक्तीचा अथवा व्यक्तींचा, कोणत्याही संस्थेचा, बँकेचा गहाण, दान, लिज, लिन, बक्षिस, खरेदी, साठेकरार, कोणताही करार कुळ हक्क, वहिवाटीचा हक्क, पोटगी, मृत्युपत्र, अखत्यारपत्र, ताबा बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क- हितसंबंध, दिवाणीदावा, महसुलवाद असल्यास त्याच्या लेखी हरकतीसह व कागदोपत्री प्रथमदर्शनी पुराव्यासह खालिल सही करणार यांचेकडे हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ०७ दिवसांचे आत प्रत्यक्ष येवुन अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वर नमुद मिळकत पूर्णतः निर्वेध व बीनजोखमी आहे असा भरवसा जमिन मालकांनी आमचे आशिलांना दिलेला आहे. सबब विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासहीत न आल्यास सदरहु मिळकतींबाबत आमचे आशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे आशिलांवर बंधनकारक राहाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. ०८.०५.२०२६
अशिलांची सही

सही/-
**श्री. अमित महेश्वर देशमुख**
ॲडव्होकेट आणि नोटरी,
सृष्टी बिल्डींग, वेधशाळेसमोर,
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड.

---

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकती ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्ती बरोबर तोंडी अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुलमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकांन बरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे तिवरे, ता. कर्जत, जि. रायगड येथील शेतजमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकारणी रुपये | रुपये |
|---|---|---|---|---|---|
| रामलिंगम दोरास्वामी | ५१ | ० | ०-६७-०० | ० | ८५ |

सदरील मिळकतीपैकी खरेदी देणार यांचे मालकीचे हे.आर.चौ.मी ०-२२-४० इतके क्षेत्र

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

सही/-
**ॲड. जयेश संभाजी म्हसे**
दिनांक :- ०९/०५/२०२६
मो.नं. ९०२८९८२२७७

कार्यालयीन पत्ता :- ए विंग, फ्लॅट नं. ४, पहिला मजला, गणेश अपार्टमेंट, कर्जत नगरपालिका कार्यालय शेजारी, ता. कर्जत, जि. रायगड, ४१०२०१.
ई मेल: adv.jayeshmhase@gmail.com

# जिल्ह्याचा संकेतस्थळांवर निकाल जाहीर

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळातर्फे फेब्रुवारी व मार्चमध्ये इयत्ता दहावीची परिक्षा घेण्यात आली होती. या परिक्षेचा निकाल शुक्रवारी (दि.८) मे रोजी मंडळाच्या संकेतस्थळांवर दुपारी १ वाजता जाहीर करण्यात आला. त्यात रायगड जिल्ह्याचा निकाल ९८.०३ टक्के लागला आहे. निकालात मुलांच्या तुलनेत मुलींनी बाजी मारली असून, मुलींचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण ९६.४४ टक्के तर मुलांचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण ९३.७० टक्के इतके आहे.**

## परमार स्कूलमध्ये २५ विद्यार्थी उत्तीर्ण

**| नागोठणे | प्रतिनिधी |**

नागोठण्यातील भारतीय एज्युकेशन सोसायटीच्या वेलशेत येथील शैक्षणिक संकुलातीम एस. डी. परमार इंग्लिश मिडीयम स्कूलचा इयत्ता दहावीचा निकाल १०० टक्के लागला आहे. शाळेचे सर्व २५ विद्यार्थी या परिक्षेत उत्तीर्ण झाले आहेत. यामध्ये आर्यन चितळे ८२.४० टक्के, ज्योझी पानसरे ८२.२० टक्के व इझान सय्यद ८०.८० टक्के हे विद्यार्थी अनुक्रमे पहिला तीन क्रमांकाने उत्तीर्ण झाले आहेत. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे भा. ए. सो.चे संस्थापक, अध्यक्ष किशोर जैन, उपाध्यक्षा संगीता जैन, शाळा समिती चेअरमन सुरेश जैन, भाएसोचे मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिक जैन व मुख्याध्यापिका अमृता गायकवाड यांनी अभिनंदन करून विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## होली एंजल्स स्कूलमध्ये मुलींचे वर्चस्व

**| नागोठणे | प्रतिनिधी |**

नागोठण्यातील नीव सोशियल अँण्ड एज्युकेशन ट्रस्टच्या होली एंजल स्कूलचे सर्व ६६ विद्यार्थी दहावीच्या परीक्षेत उत्तीर्ण झाल्याने शाळेचा निकाल सलग ११ व्या वर्षी १०० टक्के लागल्याने शाळेने आपल्या उज्वल यशाची परंपरा यावर्षीही कायम राखली आहे.




होली एंजल्स स्कूलमध्ये हर्षदा शिरसे ही विद्यार्थिनी ९० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाली आहे. तर सिद्धी भोईर ८९.८० टक्के गुण, शाल्मली जवके ८८.२० टक्के गुण या दोन विद्यार्थिनी अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाल्या आहेत.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे शाळेचे चेअरमन विजय मुल्कवाड, सीईओ रूधीरा मुल्कवाड, रेचल मुल्कवाड, नीलिमा राणे, उपमुख्याध्यापक मुकेश मिसळ यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## नांदगावात मुलींनी मारली बाजी

**पाली/गोमाशी :** संत नामदेव माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय नांदगाव या विद्यालयाचा दहावीचा निकाल ९३.६१ टक्के लागला आहे. यावर्षी मुलींनी बाजी मारली आहे. पूजा खैरे या विद्यार्थीनी ९१.८० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाली आहे. अनुष्का शिंदे ९१.६० टक्के गुण, मिहीर सायगावकर ९० टक्के गुण, स्वरूपा शिंदे ८३.८०टक्के गुण, श्रद्धा खैरे ८३.४०टक्के गुण, उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष सुरेश खैरे, प्राचार्य, शिक्षक वृंदांनी अभिनंदन केले.

## कुरुळच्या तीन विद्यार्थ्यांना विशेष श्रेणी

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

कुरुळ येथील सुएसो माध्यामिक विद्यालयाचा एसएससी परीक्षा फेबुवारी-मार्च २०२६ चा निकाल ९५ टक्के इतका लागला आहे. एकूण २० विद्यार्थ्यांपैकी १९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

तीन विद्यार्थ्यांना विशेष श्रेणी प्राप्त झाली आहे . पाच विद्यार्थ्यांना प्रथम श्रेणी सात विद्यार्थ्यांना द्वितीय श्रेणी चार विद्यार्थी उत्तीर्ण श्रेणीमध्ये आहेत. चिन्मयी पाटील प्रथम क्रमांक ८३.४० टक्के गुण

पायल घोरपडे द्वितीय क्रमांक ८२.०० टक्के गुण

निशा राठोड तृतीय क्रमांक ७७.८०टक्के गुण मिळाले आहेत. कुरुळ येथील या माध्यामिक विदयालयात बहुसंख्य अमराठी विद्यार्थी शिक्षण घेतात.

अशा परिस्थितीत देखील शाळेचा निकाल दरवर्षी अतिशय उत्तम लागतो. त्यासाठी मेहनत घेणाऱ्या सर्व शिक्षकांचे व विद्यार्थ्यांचे शाळेचे चेअरमन ॲड. प्रसाद पाटील व मुख्याध्यापिका सुजाता पाटील यांनी मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.

## पेण शिक्षण महिला समिती विद्यालयाचे ५५ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण

**| खरोशी | वार्ताहर |**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या इ. १०वी. परीक्षेचा निकाल (दि.८) मे रोजी ऑनलाईन जाहीर झाला. त्यात यंदाही पेण शिक्षण महिला समितीच्या इंग्रजी माध्यम शाळेतील विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक यश मिळवत १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे. स्वरांजली पाटील ९४.८० टक्के प्रथम क्रमांक, विराज योगेश लकेश्री ९४.८० टक्के प्रथम क्रमांक, गार्गी गोरी ९३.२० टक्के द्वितीय क्रमांक, पार्थ साळुंखे तृतीय क्रमांक याशिवाय ५५



विद्यार्थी विशेष प्राविण्यासह प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. त्यात २१ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. संस्थेच्या अध्यक्षा सुहासिनी देव, उपाध्यक्षा मेधा देवधर, कार्यकारिणी मंडळ तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका रोहिणी शिंदे, शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

## अंजुमन इस्लाम हायस्कूलचा ९३.५८ टक्के निकाल

**आगरदांडा :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या १० च्या परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला आहे. यात मुरूड अंजुमन इस्लाम जंजिरा आगरी हायस्कूल आणि ज्युनिअर महाविद्यालय मुरुड-जंजिरा यंदा ही मुलींनी बाजी मारली आहे. तुबा सज्जाद मोझर ९०.४० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला, आमना रहिद पठाण ८९.६० टक्के गुण मिळवून व्दितीय क्रमांक पटकावला तर फातिमा शिग्रेकर हिने ८९.४० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकावला.

## उर्दू हायस्कूलचा ९६.५५ टक्के निकाल

**| नागोठणे | प्रतिनिधी |**

रोहा तालुक्यातील उर्दू माध्यमाचे एकमेव हायस्कूल असलेल्या नागोठण्यातील नामांकित नागोठणे एज्युकेशन सोसायटीच्या उर्दू हायस्कूलचा दहावीच्या परीक्षेचा निकाल ९६.५५ टक्के लागला आहे. यामध्ये कुमार फैज नझीर अधिकारी हा विद्यार्थी ९२.४० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला आहे. तर नाफिया छडीदार ९० टक्के गुण, झैबा अधिकारी ८७ टक्के गुण या दोन विद्यार्थिनी अनुक्रमे दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाल्या आहेत. माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेसाठी उर्दू हायस्कूलचे २९ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी २८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. त्यामध्ये उच्च प्रथम श्रेणीत ९, प्रथम श्रेणीत १३, द्वितीय श्रेणीत ३ तर उत्तीर्ण श्रेणीत ३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

नागोठणे उर्दू हायस्कूलचा माध्यमिक शालांत परीक्षेचा निकाल चांगला लागल्यामुळे नागोठणे एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष समादशेठ अधिकारी, जनरल सेक्रेटरी लियाकत शैख अलि कडवेकर, व्यवस्थापकीय संचालक सगिर अधिकारी, शब्बीर पानसरे, डॉ. सादिया दफेदार, शाळेचे प्राचार्य, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या वतीने उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले.

## मोर्बा युनायटेड इंग्लिश स्कुलमध्ये अम्मारा अकलेकर सर्वप्रथम

**| माणगाव | प्रतिनिधी |**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळातर्फे मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या दहावी शालांत परीक्षेचा निकाल शुक्रवारी (दि.) ८ मे रोजी ऑनलाईन जाहीर झाला. या परीक्षेत माणगाव तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या युनायटेड इंग्लिश स्कुल मोर्बा शाळेने सलग दुसऱ्यावर्षी दहावी परीक्षेत नेत्रदीपक यश संपादन करताना या शाळेचा दहावी परीक्षेचा एकूण निकाल १०० टक्के इतका लागला असून अम्मारा म.हनीफ अकलेकर या विद्यार्थिनीने ९१ टक्के इतके गुण संपादन करून शाळेमध्ये सर्वप्रथम क्रमांकाने उत्तीर्ण



होण्याचा मान मिळविला आहे.

या शाळेमधून अनया गंगरेकर या विद्यार्थिनीने ९०.४० टक्के गुण संपादन करून द्वितीय क्रमांक तर महीन गंगरेकर या विद्यार्थिनीने ८९.६०टक्के गुण संपादन करून तृतीय क्रमांक पटकावत शाळेच्या यशामध्ये मानाचा तुरा रोवला आहे. या शाळेमधून यावर्षी दहावी परीक्षेसाठी एकूण २२ विद्यार्थी बसले होते हे सर्व विद्यार्थी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले आहेत. यामध्ये १२ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळविले असून ९ विद्यार्थी प्रथम श्रेणीत तर १ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. या शाळेचा सलग दुसऱ्यावर्षी दहावीचा निकाल नेत्रदीपक लागल्याने पालकवर्गांमधे तसेच विद्यार्थ्यांमध्ये विशेष आनंदाचे वातावरण आहे. भविष्यात ही शाळा आणखी नावारूपाला येईल अशी आशा मोर्बा विभागातील नागरिकांनी बोलून दाखविली आहे. दहावीत विद्यार्थ्यांनी उज्वल यश संपादन केल्याने संस्था पदाधिकारी यांनी शिक्षकांचे खास अभिनंदन करून यशस्वी सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. राहील गंगरेकर, आमीन धनसे, समीर गंगरेकर, नासिर डावरे, आमीर डावरे, डॉ. फैसल, झोया बडे, नुसरत जालगावकर, सर्व शिक्षक वर्ग, शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद यांनी विशेष अभिनंदन करून त्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## मोर्बा मॉडर्न इंग्लिश स्कूलचा नेत्रदीपक निकाल

**| माणगाव | प्रतिनिधी |**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळातर्फे मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या दहावी शालांत परीक्षेचा निकाल शुक्रवारी (दि. ८) मे रोजी ऑनलाईन जाहीर झाला. या परीक्षेत माणगाव तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या मोर्बा मॉडर्न इंग्लिश स्कूलने आपली उज्वल यशाची परंपरा कायम ठेवीत या शाळेचा दहावी परीक्षेचा एकूण निकाल १०० टक्के लागला असून सारा राऊत या विद्यानीने ९२ टक्के इतके गुण संपादन करून शाळेमध्ये सर्वप्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होण्याचा मान मिळविला आहे.



या शाळेमधून फर्जिन राऊत या विद्यार्थिनीने ८३ टक्के इतके गुण संपादन करून द्वितीय क्रमांक तर मेहवीश बंदरकर या विद्यार्थीनीने ८०.८० टक्के इतके गुण संपादन करून तृतीय क्रमांक पटकावत शाळेच्या यशामध्ये मानाचा तुरा रोवला आहे. या शाळेमधून यावर्षी दहावी परीक्षेसाठी एकूण ४१ विद्यार्थी बसले होते हे सर्व विद्यार्थी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले आहेत. त्यामध्ये १२ विध्यार्थ्यानी विशेष प्राविण्य संपादन केले असून प्रथम श्रेणीत २२ विध्यार्थी, द्वितीय श्रेणीत ७ विध्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. या शाळेचा दरवर्षी निकाल नेत्रदीपक लागत असल्याने पालकवर्गांमधे तसेच विद्यार्थ्यांमध्ये विशेष आनंदाचे वातावरण असूनसंस्थापदाधिकारी यांनी शिक्षकांचे खास अभिनंदन करून यशस्वी सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. सैफुद्दीन धनसे, शौकत रोहेकर, इकबाल धनसे, नजीर धनसे, इकबाल हर्णेकर, मोहन साळी, इम्रान पालेकर, सर्व शिक्षक वर्ग, शिक्षकेत्तर कर्मचारी वृंदांनी विशेष अभिनंदन करून त्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## सोहम सुर्वे तळा तालुक्यात प्रथम

**| तळा | प्रतिनिधी |**

तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे गो. म. वेदक विद्यामंदिर तळा चा एकूण निकाल ९०.१४ टक्के लागला असून सोहम नरेश सुर्वे तालुक्यात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला आहे. यामध्ये गो.म.वेदक विद्यामंदिर शाळेत प्रथम क्रमांक सोहम नरेश सुर्वे ८७ टक्के गुण, द्वितीय क्रमांक निर्जला कीर्तने ८४.४० टक्के व तृतीय क्रमांक स्वरा गायकवाड ८३.८० टक्के घेऊन उत्तीर्ण झाली. या केंद्रातून एकूण ७१ विद्यार्थी परीक्षेला बसले होते त्यापैकी ६४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून ७ विद्यार्थी नापास झाले आहेत. विद्यार्थ्यांच्या भावी आयुष्याला कलाटणी देणारा हा दहावीचा निकाल असल्याने याकडे विद्यार्थी व सर्व पालकांचे लक्ष लागले होते. ग्रामीण दुर्गम डोंगराळ भाग असलेल्या तळा तालुक्यातील विद्यार्थ्यांनी शिक्षणात नेहमीच चांगल्या प्रकारे प्रगती केलेली दिसत आहे तालुक्यात तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे वेदक. विद्यामंदिर तळा या विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी १०वी च्या परिक्षेत मिळविलेल्या घवघवीत यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष, पदाधिकारी प्राचार्य शिक्षक यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

## पोटफोडे विद्यालयाचा उज्वल निकाल

| रोहा | प्रतिनिधी |

रोहा तालुक्यातील नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब संचलित श्री. रा. ग. पोटफोडे (मास्तर) विद्यालय खांब या विद्यालयाने इ.१० वीच्या परीक्षेच्या उज्वल निकालाची परंपरा कायम राखून ठेवली असून



विद्यालयाचा एकूण निकाल ८४.०९ टक्के इतका लागला असून ईश्वरी अधिकारी या विद्यार्थ्यांनीने ८८.०० टक्के संपादित करून विद्यालयात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होण्याचा बहुमान पटकावला आहे. रोहिणी घोगळे ८७.४० गुण द्वितीय, आयुष जाधव ८७.०० तृतीय, सई तुपकर ८६.६०टक्के चतुर्थ तर आर्य शेळके ८५.२०टक्के गुण मिळाले. विद्यार्थी वर्गाच्या या यशाबद्दल चेअरमन महेंद्र पोटफोडे, उपाध्यक्ष प्रकाश थिटे ,सचिव धोंडू कचरे व सर्व संचालक मंडळ, मुख्याध्यापक सुरेश जंगम व सर्व शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी वर्ग तसेच विभागातील शिक्षणप्रेमी नागरिक यांनी अभिनंदन व्यक्त करून शुभेच्छा दिल्या आहेत.

## अशोकदादा साबळे विद्यालयाने उमटवला गुणवत्तेचा ठसा

| माणगाव | प्रतिनिधी |

माणगाव शिक्षण प्रसारक मंडळ संचलित अशोकदादा साबळे विद्यालय व माणगाव ज्युनिअर कॉलेज यांनी इयत्ता दहावी फेब्रुवारी/मार्च २०२६ परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत ९३.८३ टक्के निकालाची उज्वल परंपरा कायम राखली आहे. विद्यार्थ्यांच्या अथक मेहनतीला शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य लाभल्याने विद्यालयाने यंदाही गुणवत्तेचा ठसा उमटवला आहे.

यावर्षी विद्यालयातून एकूण १४६ विद्यार्थी परीक्षेला प्रविष्ट झाले होते. त्यापैकी १३७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून विद्यालयाचा एकूण निकाल ९३.८३ टक्के लागला आहे. विशेष म्हणजे २४ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळवत शाळेचा मान उंचावला आहे. तसेच ४७ विद्यार्थी प्रथम श्रेणीत, ४५ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत तर २१ विद्यार्थी पास श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.

या विद्यालयातून ओमकार वरपे याने ४६० गुण मिळवत ९२.६० टक्क्यांसह प्रथम क्रमांक पटकावला तर स्वरुपा धावडे हिने ४४१ गुणांसह ८८.२० टक्के मिळवत द्वितीय क्रमांक मिळविला. सोहम धर्मसाले याने ४३५ गुणांसह ८८ टक्के मिळवत तृतीय क्रमांक पटकावला. तसेच पूजा चव्हाण हिने ४३४ गुणांसह ८७.८० टक्के, तर सई तेटगुरे हिने ४३७ गुणांसह ८७.४० टक्के गुण मिळवत विद्यालयाच्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या यादीत स्थान मिळविले. या यशस्वी विद्यार्थ्यांचे माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. राजीव अशोक साबळे, कृष्णा गांधी, नरेंद्र गायकवाड, आर. एच. पाटील, पर्यवेक्षक, उपमुख्याध्यापक तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## निकम इंग्लिश स्कुलचा ९७.८९ टक्के निकाल

**| माणगाव | प्रतिनिधी |**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळातर्फे मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या दहावी शालांत परीक्षेचा निकाल शुक्रवार दि.८ मे २०२६ रोजी जाहीर झाला.या परीक्षेत शैक्षणिक क्षेत्रात आग्रेसर असणाऱ्या माणगाव येथील एस. एस. निकम इंग्लिश स्कुलने आपल्या उज्वल यशाची परंपरा कायम ठेवली आहे. या शाळेचा दहावी परीक्षेचा एकूण निकाल ९७.८९ टक्के लागला असून अदित्य छेडा, आयुष डवले या विद्यार्थ्यांनी अनुक्रमे ९३.४० टक्के इतके गुण संपादन करून शाळेमध्ये सर्वप्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होण्याचा मान मिळविला आहे. या शाळेमधून नायाब वाडेकर, मुक्ता बेंडखळे, रिद्धी उभारे या विद्यार्थ्यांनी अनुक्रमे ९३ टक्के इतके गुण संपादन करून द्वितीय क्रमांक, साजिरी गायकवाड या विद्यार्थिनीने ९१.६० टक्के गुण संपादन करून तृतीय क्रमांक, ऋतुजा खडतर या विद्यार्थिनीने ९१.२० टक्के गुण मिळवत चतुर्थ क्रमांक, संस्कार म्हसकर व अद्वैत वैभव कोकणे या विद्यार्थ्यांनी अनुक्रमे ९० टक्के गुण संपादन करून पाचवा क्रमांक पटकावत शाळेच्या यशामध्ये मानाचा तुरा रोवला आहे. या शाळेमधून यावर्षी दहावी परीक्षेसाठी एकूण ९५ विद्यार्थी बसले होत. त्यापैकी ९३ विद्यार्थी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले आहेत. शाळेत ९ विद्यार्थ्यांना ९० टक्के पेक्षा जास्त गुण प्राप्त झाले असून विशेष श्रेणीत ४२ विद्यार्थी असून प्रथम श्रेणीत ३३ तर द्वितीय श्रेणीत ९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

## अनन्या यादव सर्वप्रथम

**कर्जत :** कर्जत एज्युकेशन सोसायटीच्या इंग्लिश मिडीयम स्कुल मध्ये दहावी शालांत परीक्षेत अनन्या यादव हिने ९७.४० टक्के गुण मिळवून सर्वप्रथम येण्याचा बहुमान मिळविला.



११७ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली आणि सर्व मुले उत्तीर्ण झाल्याने शाळेचा निकाल शंभर टक्के लागला आहे. अनन्या यादव ९७. ४० टक्के गुण प्रथम, स्वराज शिंदे ९३.२० टक्के गुण द्वितीय, भार्गव मुंढे ९२.२० तृतीय क्रमांक मिळविला आहे.

## वाघरे स्कूलचे उल्लेखनीय यश

**| माणगाव | प्रतिनिधी |**

माणगाव शिक्षण प्रसारक मंडळ संचलित गणेश यशवंत वाघरे इंग्लिश मीडियम स्कूल, माणगाव यांनी सन २०२५-२६ च्या एस. एस. सी. परीक्षेत शंभर टक्के निकालाची उज्वल परंपरा कायम राखत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. शाळेच्या या देदिप्यमान यशामुळे विद्यार्थी, पालक, शिक्षक व संपूर्ण माणगाव परिसरात आनंदाचे आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

यंदाच्या परीक्षेसाठी एकूण ४१ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते आणि विशेष म्हणजे सर्व ४१ विद्यार्थी यशस्वी ठरले. कठोर परिश्रम, नियमित अभ्यास, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचा पाठिंबा याच्या बळावर विद्यार्थ्यांनी हे यश मिळविले आहे. शाळेच्या सातत्यपूर्ण गुणवत्तापूर्ण शिक्षणाची हीच खरी पावती मानली जात आहे. निकालाच्या गुणवत्तेचा विचार करता ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविणारे ३ विद्यार्थी, ८० ते ९० टक्के गुण मिळविणारे ८ विद्यार्थी, ७० ते ८० टक्के गुण मिळविणारे १० विद्यार्थी, ६० ते ७० टक्के गुण मिळविणारे ९ विद्यार्थी, ५० ते ६० टक्के गुण मिळविणारे ७ विद्यार्थी तर ४० ते ५० टक्के गुण मिळविणारे ४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. या निकालातून विद्यार्थ्यांची सातत्यपूर्ण प्रगती आणि शाळेची शैक्षणिक बांधिलकी स्पष्टपणे दिसून येते. शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांनी विशेष चमकदार कामगिरी केली. कायापक तन्वी हिने ९४.४० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. विश्वकर्मा प्रतिभा हिने ९४.०० टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळविला. पलकर निधी हिने ९०.०० टक्के गुणांसह तृतीय क्रमांक मिळवत शाळेचा मान उंचावला. तसेच अडे आरती ८७.६० टक्के गुण, वाडेहवाळ भरगव ८६.६० टक्के, कोळेकर राजवर्धन ८५.४० टक्के गुण, भोंकर आयुष निलकंठ ८४.६० टक्के गुण, वैकुळ पार्थवी गुरुप्रसाद ८३.४० टक्के गुण, परमार पार्थ प्रकाश ८२.८० टक्के गुण, पोटाळे पार्थ सुरेश ८२.६० टक्के गुण यांनीही उलेलेखनीय यश संपादन करत शाळेच्या गुणवंत परंपरेत भर घातली.

## रोहा पब्लिक स्कुलचा १०० टक्के निकाल

**| रोहा | प्रतिनिधी |**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने दहावी परीक्षेचा निकाल जाहीर केला आहे. यंदा शाळेचा १०० टक्के निकाल लागला असून सलग ७ वर्ष शाळेचा १०० टक्के निकाल लागत आहे. यंदाच्या परीक्षेत विशेष प्राविण्यासह प्रथम श्रेणीत ११ विद्यार्थी, प्रथम श्रेणीत १८ द्वितीय श्रेणीत १२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. साची देशमुख हिने ८२.८० टक्के गुण मिळवून शाळेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होण्याचा बहुमान पटकावला आहे. तर निल मिरवणकर याने ८२.६० टक्के गुण मिळवून दुसरा क्रमांक तर अष्टमी येथील सई चांदगावंकर हिने ८१.०० टक्के गुण मिळवून तिसरा क्रमांक मिळविला आहे.

## म्हसळा तालुक्याचा उत्तम निकाल

**| म्हसळा | प्रतिनिधी |**

मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या दहावी परीक्षेत न्यू इंग्लिश स्कूल म्हसळ्याची विद्यार्थिनी तनुष्का कदम हिने ९३. ०२ गुण मिळवून प्रथम येण्याचा मान मिळावीला. श्रेयस पवार याचा द्वितीय क्रमांक ८८. ०६ टक्के गुण, मोरे श्रेया तिसरा क्रमांक ८७. ०४ टक्के गुण, श्रवण गायकर चौथा क्रमांक ८७ टक्के गुण, वैभवी मगर पाचवा क्रमांक ८५. ०८ टक्के गुण मागास वर्गीयमध्ये श्रेया मोरे प्रथम ८७. ०४ टक्के गुण, द्वितीय क्रमांक श्रवण गायकर ८७ टक्के गुण, तृतीय क्रमांक श्रावणी नांदगावकर ८६. ०६ टक्के गुण मिळाले आहेत. म्हसळा तालुक्यातील इतर शाळांचे निकाल खालील प्रमाणे आंबेत हायस्कूल १०० टक्के, न्यू इंग्लिश स्कूल म्हसळा ९८. ८८ टक्के, अंजुमन



हायस्कूल म्हसळा ९६. ९६ टक्के, आयडियल इंग्लिश स्कूल म्हसळा १०० टक्के, खामगाव हायस्कूल १०० टक्के, पांगलोली हायस्कूल १०० टक्के, खरसई हायस्कूल ८८. २३ टक्के, देवघर हायस्कूल ८५. ७१ टक्के, नेवरूळ हायस्कूल ९१. ६६, पाभरे हायस्कूल ७८. १२ टक्के, आगरवाडा हायस्कूल ८७. ५० टक्के, गोंडघर हायस्कूल ९१. ६६ टक्के, केलटे हायस्कूल ८० टक्के, पाष्टी हायस्कूल ९७. २३ टक्के, संदेरी हायस्कूल १०० टक्के, मेंदडी हायस्कूल ५५. ५५ टक्के, व्हिजन इंटरनॅशनल स्कूल १०० टक्के लागला आहे.

# हिंदी सत्तेपुढे लाचार

राज्यात विविध मुद्द्यांच्या निमित्ताने हिंदीविरुध्दचा राग वाढत चालला आहे. मध्यंतरी परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी रिक्षा तसेच टॅक्सीवाल्यांना मराठी बोलता येणे सक्तीचे असल्याचे जाहीर केले. तो निर्णय तूर्तास स्थगित झाला असला तरी त्याला भाजपसारख मतलबी पक्ष सोडून सर्वांनी पाठिंबा दिला होता. आता राज्य सरकारला आपल्या कर्मचाऱ्यांसाठीची हिंदीची परिक्षा पुढे ढकलावी लागली आहे. महाराष्ट्राची राजभाषा मराठी आहे. इथे सर्व कारभार मराठीतून होणे अपेक्षित आहे. अनेकदा कायदे तसेच सरकारी कामकाजाला सोईची म्हणून इंग्रजी वापरली जाते. पण हिंदीचा वापर होण्याची निदान महाराष्ट्रात तरी काहीही गरज नाही. विदर्भ तसेच मराठवाड्यात काही भागात लोक रोजच्या व्यवहारात काही प्रमाणात हिंदीचा वापर करतात हे खरे असले तरी म्हणून सरकारी कामकाजात तिचा वापर करायला उत्तेजन देणे हे आक्षेपार्ह आहे. सरकारी कर्मचाऱ्यांना वरची वेतनश्रेणी तसेच पदोन्नती हवी असेल तर हिंदीची परिक्षा देणे सक्तीचे असल्याचा हा नियम भाजप सरकारने केलेला नाही हे मान्य आहे. जे कर्मचारी शालेय शिक्षणात हिंदी शिकलेले नाहीत त्यांच्यापुरताच हा नियम सीमित आहे हेही मान्य आहे. पण असे राज्यात सुमारे ३५ हजार कर्मचारी असल्याचे सांगितले जाते. यापैकी बहुतेकांनी संस्कृतमध्ये अधिक चांगले गुण मिळतात म्हणून आठवी ते दहावी हिंदीऐवजी संस्कृत भाषा निवडलेली असल्याची शक्यता आहे. आता संस्कृत ही तर विद्यमान सरकारची प्राणप्रिय भाषा आहे. शिवाय तीच सगळ्या भारतीय भाषांची जननी असेही मानण्यात येते. या स्थितीत खरे तर सरकारी कर्मचाऱ्यांना ती येत नाही असे मानणे आणि तिची परिक्षा घेणे याची काहीच गरज नाही. पण यातून हिंदीचा वरचष्मा प्रस्थापित करण्याची सुप्त इच्छा प्रकट होते. दक्षिणेतील राज्यांमध्ये अशी कोणतीही परिक्षा द्यावी लागत नाही हेही इथे लक्षात ठेवायला हवे. याचाच अर्थ तो खाली मान घालून वरचे आदेश पाळतो आहे त्याला अधिक चेपण्याची ही प्रवृत्ती आहे. महाराष्ट्राने हिंदीपुढे व दिल्लीच्या सत्तेपुढे कायमच अशी खाली मान घातल्याने आज त्याचे महत्व खलास झाले आहे.

### लहानपणापासून हिंदी

याबाबत मनसे तसेच दीपक पवार यांच्या मराठी अभ्यास केंद्राने आक्षेप घेतल्याने राज्य सरकारने तूर्त ही परिक्षा स्थगित केली आहे. याबाबत भाजपवाले लगेच हा नियम पूर्वापारचा आहे असे सांगू लागले आहेत. पण भाजपची याबाबतची भूमिका काय आहे हा खरा प्रश्न आहे. ती अर्थातच दिल्ली आणि हिंदीला धार्जिणी आहे. हिंदी, हिंदू, हिंदुस्तान हीच मुळी संघाची आणि त्याच्या मुशीतून निघालेल्या भाजपची अधिकृत भूमिका आहे. मात्र ही भूमिका महाराष्ट्राशी द्रोह करणारी व मराठीला दगा देणारी आहे हे स्पष्टपणे नोंदवायला हवे. काँग्रेसने इतक्या वर्षांच्या कारभारात अनेक चुका केल्या. त्यावेळी अनवधानाने हिंदीचा वरचष्मा आपण मान्य करीत गेलो. पण आता हा प्रश्न अधिक तीव्र झाला आहे. आज मुंबई, पुणे किंवा नाशिकच नव्हे तर अलिबाग, पेण किंवा महाडसारख्या छोट्या शहरांमध्येही हिंदी भाषिकांचे प्रमाण प्रचंड प्रमाणात वाढला आहे. त्यांच्या वाढत्या वावरामुळे व संपर्कामुळे व्यवहारातही हिंदीचा उपयोग व प्रभाव वाढू लागला आहे. दुसरीकडे महाराष्ट्र एसएससी बोर्डाशी संलग्नता बंद करून अनेक भागातील संस्था आता दिल्ली बोर्डाचा किंवा सीबीएसईचा अभ्यासक्रम स्वीकारू लागल्या आहेत. या अभ्यासक्रमात हिंदी भाषा शिकणे अनिवार्य होत चालले आहे व त्यात मराठीचा बळी दिला जातो किंवा लोअर लेव्हलचे मराठी शिकवले जाते. यातून विद्यार्थी मराठीमध्ये कच्चे राहू लागले आहेत. व्यवहारात हिंदी सिनेमे, मोबाईल्सवरची हिंदी रील्स, टीव्ही वाहिन्यांच्या हिंदी बातम्या यांचा प्रभाव वाढत चालला आहे. आपले राजकारणीदेखील पत्रकारांशी बोलताना हिंदीतून बोलू लागले आहेत. कारण त्यामुळे आपल्याला राष्ट्रीय वाहिन्यांवर प्रसिध्दी मिळते असा त्यांचा गैरसमज आहे. अशा वातावरणात मराठीचे रक्षण करणे हे मोठे कार्य होऊन बसले असून त्यासाठी खास प्रयत्न करण्याची गरज निर्माण झाली आहे. मराठी अभ्यास केंद्रासारख्या संस्था ते करीत आहेत व त्यांना जनतेतूनही चांगला प्रतिसाद मिळत आहे.

### परभाषकांचा माज

देवेंद्र फडणवीस सरकार सातत्याने हिंदीचा प्रभाव वाढवणारी धोरणे पुढे रेटत आहेत. यापूर्वी त्रिभाषा सूत्राच्या वादातही त्यांनी मराठीच्या विरोधात व हिंदीच्या बाजूने कौल दिला होता. पहिलीपासून हिंदी विषय शिकवण्याची टूम त्यांनी काढली होती. आपल्याकडे बहुतांश मुले सध्या आधीच मराठी व इंग्रजी या दोन भाषा लहान वयापासून शिकू लागतात. वास्तविक हेदेखील त्यांच्यावरचे ओझेच आहे. मातृभाषा म्हणजे मराठीतूनच त्यांचे शिक्षण व्हावे असा आग्रह धरणे हेच अधिक रास्त आहे. पण आता तो मार्ग कोणालाच व्यवहार्य वाटत नाही. लोक जसे पैसे कमावण्यासाठी कोणतेही मार्ग अवलंबायला मान्यता देत चालले आहेत तसेच ते भाषेचा बळी देऊन इंग्रजीला होकार देत चालले आहेत. या स्थितीत मुलांवर आणखी एक भाषा अभ्यास म्हणून शिकवण्याचा दबाव टाकणे हा अत्याचारच म्हणायला हवा. पण फडणवीस सरकारला त्याची पर्वा नव्हती. अखेर तेव्हाही मराठी अभ्यास केंद्राच्या दबावामुळे तो निर्णय स्थगित करावा लागला व नरेंद्र जाधव यांची समिती नेमावी लागली. या समितीच्या अहवालावर अजूनही निर्णय झालेला नाही. त्यांनी नेमका काय अहवाल दिला आहे हेही गुप्त आहे. त्यामुळे तो विषय पुन्हा मुलांच्या बोकांडी बसणारच नाही अशी हमी कोणीही देऊ शकत नाही. त्याही प्रकरणात याबाबतचा सारा दोष उद्धव ठाकरे यांच्या सरकारवर टाकून राजकारण करण्याचा प्रयत्न फडणवीसांनी केला. हिंदीची सक्ती केलीच पाहिजे अशी आमची भूमिका आहे असे म्हणण्याची हिंमत अर्थातच त्यांच्यातच नाही. मात्र मागल्या दाराने तेच करायचे असे त्यांचे धोरण आहे. त्यामुळे हिंदी परिक्षा घेण्याचा निर्णय आज स्थगित केला असला तरी उद्या गुपचूप तो अमलात येईल व सरकारी कर्मचारीही वेतनवाढ तसेच बढतीचा सवाल असल्याने ती देऊन मोकळे होतील. रिक्षा व टॅक्सी चालकांना मराठी येणे आवश्यक आहे हा नियमही अगदी रास्त होता. लंडन, पॅरिस, न्यूयॉर्क अशा सर्व मोठ्या कॉस्मोपॉलिटन शहरांमध्ये अशाच प्रकारच्या नियमाची कडक अंमलबजावणी केली जाते. जगभरातून भरपूर फी देऊन अमेरिका व इंग्लंडमध्ये शिकायला येणाऱ्या विद्यार्थ्यांना इंग्रजीच्या परिक्षा द्याव्या लागतात. पण महाराष्ट्रात येणाऱ्या कोणालाही मराठी यावी अशी अपेक्षा करणे गैर मानले जाते. रिक्षा व टॅक्सीवाल्यांना वास्तविक अगदी जुजबी मराठी आले तरीही भागेल. पण तितकेही बोलायला त्यांचा विरोध आहे. मराठी लोकांनीच आमच्याशी हिंदीतून बोलावे असा त्यांचा आग्रह आहे. आणि त्यांच्या या माजाला फडणवीस सरकार खतपाणी घालत आहे.

## विचार

# महाराणा प्रताप जयंती

***महाराणा प्रतापांचा धारदार भाला, राजपुतांची तळपती तलवार आणि वनवासी सैनिकांच्या तीरकामट्यांच्या वर्षावाने अकबराच्या मोगल सैनिकांची दाणादाण उडाली. खरं तर, राणा प्रतापांना त्यांच्या संक्रमण काळात वनवासी अर्थातच भिल्ल समाजाने निष्ठापूर्वक भक्कम पाठबळ दिलं, याची मेवाडच्या इतिहासात नोंद घेतली गेली.***



रणवीरसिंह राजपूत

मेवाडचे महाराजा वीरशिरोमणी
महाराणा प्रताप की जय हो
वीरता, त्याग, धैर्य, बलिदान,
चारित्र्यशिलता, राष्ट्रभक्ती,
देशाभिमान याचं मूर्तिमंत प्रतिक म्हणजे मेवाडचे महाराजा वीरशिरोमणी महाराणा प्रतापसिंह सिसोदिया होत. अशा महापराक्रमी व अपराजित राजाचा जन्म सिसोदिया राजवंशात ९ मे १५४० रोजी कुंभलगड येथे झाला, अन् जणू हिंदुत्वाचा रक्षणकर्ता क्रांतीसूर्यच भारतभूमीवर उदयास आला.राणा प्रताप यांच्या पिताश्रीचे नाव राणा उदयसिंह तर मातोश्रीचे महाराणी जयवंता कुंवर.

बाप्पा रावल, राणा खुमानसिंह, समरसिंह, राणासंग, राणाकुंभ, उदयसिंह यांचा वैभवशाली व शौर्याचा वारसा महाराणा प्रतापांनी चालविला. ‘‘प्राण गेला तरी बेहत्तर, पण कोणा शत्रूपुढे झुकणार नाही’’, ही त्यांची भीष्मप्रतिज्ञा होती. ‘‘पारतंत्र्याच्या साखरभातापेक्षा, मला माझ्या स्वातंत्र्यातली मीठभाकरी, कंदमुळे प्रिय आहेत’’, असे राणा प्रताप अभिमानाने सांगत असत. वीरशिरोमणी महाराणा प्रताप यांना जयंती दिनानिमित्त त्रिवार मानाचा मुजरा! जय राणा!

महाराणा प्रताप यांच्याकडे अकबर बादशहाच्या तुलनेत सैन्यबळ व युद्धसामग्री अत्यल्प होती.तरीदेखील महाराणा प्रताप हे सन १५७६ ते १५८६ या दशकात मोगल सैन्यांशी प्राणपणाने लढले. हळदीघाट अन् खमनौरच्या युद्धांत वनवासी धनुष्यधारींच्या सहाय्याने अकबर बादशाह व त्याच्या सैन्याला जेरीस आणून त्यांना रणांगणातून माघारी जाण्यास भाग पाडलं. या युद्धादरम्यान वनवासी धनुर्धारींनी राणा प्रतापांना मोलाची साथ दिली.पहाडी क्षेत्रात युद्ध करण्याचे तंत्र केवळ वनवासींनाच ज्ञात असल्याने त्यांनी पहाडी युद्धतंत्राबाबत अनभिज्ञ असलेल्या मोगल सैनिकांना रणांगणावरून सळो की पळो करून सोडलं. त्यांच्या या पराक्रमी व क्षत्रिय बाण्याला मी वंदन करतो.

शतकानुशतके भारतीयांच्या हृदयात मानाचं स्थान मिळविणाऱ्या महाराणा प्रतापसिंह सिसोदिया यांनी एक शपथ घेतली होती की, ‘‘मी बाप्पा रावल यांचा वंशज... माझ्या मातृभूमीला शत्रूपासून मुक्त केल्याशिवाय मी म हालात राहणार नाही, सोन्या -चांदीच्या ताटात भोजन करणार नाही,
राजमहालच्या शयनगृहात झोपणार नाही,
तर वृक्षांची छाया हाच माझा महाल, गवत हाच माझा बिछाना अन् झाडांची पानं हीच माझी भोजनाची भांडी राहतील.’’

महत्वाचे म्हणजे राणा प्रतापांचे भारदस्त व्यक्तिमत्त्व कोणाच्याही मनाला भावणारं होतं. धिप्पाड शरीरयष्टी (७ फूट ५ इंच उंची, तर वजन १२० किलो), श्वेतवर्ण, भेदक डोळे, लांब मिश्या, पिळदार भुजा अन् निधडी छाती अशी त्यांची बलदंड देहयष्टी होती. युद्धाच्या वेळी त्यांच्या अंगावर चिलखत तसेच भाला, तलवार(दोन) या युद्ध साहित्याचे वजन सुमारे २०८ किलो असायचे. यावरून त्यांच्या शारीरिक बळाचा अंदाज येतो. दोन तलवारी बाळगण्याचे कारण म्हणजे एक स्वत:साठी अन् दुसरी निहत्यारी शत्रुसाठी असायची. म्हणजेच शत्रूकडे जर मुकाबला करण्यास तलवार नसेल, तर त्यावर हल्ला न करता, आधी त्याला तलवार द्यायची अन् नंतर त्याच्याशी युद्ध करायचे, असा त्यांचा क्षत्रिय बाणा होता.

राणा प्रताप व त्यांच्या कुटुंबियांचे रानावनात वास्तव्य असताना वनवासींनी त्यांचे जागोजागी स्वागत करून त्यांच्या राहण्याची-भोजनाची व्यवस्था केली. त्यांच्या कुटुंबियांसाठी रात्रंदिवस पहारा देत डोळ्यात तेल घालून शत्रूपक्षापासून रक्षण केलं. महत्वाचे म्हणजे राणा प्रतापांना युद्धाच्या वेळी पावलोपावली वनवासींनी मदतीचा हात दिला. प्रभू श्रीरामचंद्र, सीतामैय्या, लक्ष्मण यांना जशी वनवास काळात भिल्ल समाजाची मदत झाली, तशीच मदत महाराणा प्रताप अन् त्यांच्या शाही परिवाराला हळदीघाटांच्या दऱ्याखोऱ्यात भिल्ल समुदायाची झाली. सांगण्याचे तात्पर्य म्हणजे वनवासी लोक जरी स्वभावाने गरीब व साधेभोळे असले तरी ते स्वाभिमानी, साहसी व वेळप्रसंगी इतरांसाठी जीवाची बाजी मारणारे, असा त्यांचा खरा परिचय आहे.

उल्लेखनीय गोष्ट म्हणजे महाराणा प्रतापांचा धारदार भाला, राजपुतांची तळपती तलवार आणि वनवासी सैनिकांच्या तीरकामट्यांच्या वर्षावाने अकबराच्या मोगल सैनिकांची दाणादाण उडाली. खरं तर, राणा प्रतापांना त्यांच्या संक्रमण काळात वनवासी अर्थातच भिल्ल समाजाने निष्ठापूर्वक भक्कम पाठबळ दिलं, याची मेवाडच्या इतिहासात नोंद घेतली गेली. यासाठीच मेवाडच्या राजचिन्हावर राजपूत सैनिक आणि वनवासी सैनिकाची प्रतिमा कोरून दोन्ही समाजातल्या बंधुत्वाचं प्रतिक प्रतिबिंबित केलं, याला मेवाड-चितोडचा इतिहास साक्षीदार आहे.

हळदीघाट व अन्य युद्धात संपादन केलेल्या विजयात राणा प्रताप यांच्या चेतक अश्वाचा मोलाचा वाटा राहिला. रणांगणावर संकटसमयी स्वत:चा जीव धोक्यात टाकून आपल्या धन्याचे प्राण वाचविणाऱ्या चेतकची स्वामिनिष्ठा अतुलनीय व अवर्णनीय आहे.म्हणूनच राणा प्रताप हे चेतकला आपल्या गळ्याचे ताईत मानत असत. स्वतः जखमी अवस्थेत असूनही २० मीटर लांबीच्या नाल्यावरून छलांग मारून धन्याचे प्राण वाचविण्याची महान कामगिरी चेतकने केली अन् आपली जबाबदारी पूर्ण केल्यावर आपले प्राण सोडले. कृतज्ञतेच्या भावनेतून राणा प्रतापांनी चेतकचे जारोळ येथे स्मृतीस्मारक उभारले. चेतकची धन्याबद्दलची अपार निष्ठा, निस्सीम भक्ती अन् त्याच्या असामान्य पराक्रमाची नोंद भारताच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरली गेली.


मेवाडचे महाराणा प्रतापसिंह यांच्या शौर्यगाथेबद्दल आपल्या ‘भारताचा शोध’ या कादंबरीत माजी पंतप्रधान दिवंगत पंडित जवाहरलाल नेहरू म्हणतात, ‘‘राणा प्रताप हे संकटाचे स्वागत करणारे योद्धे होते. म्हणून जोपर्यंत पृथ्वीवर वीरांची पूजा होत राहील, तोपर्यंत राणा प्रतापांचं चिरस्मरण लोकांना राष्ट्रप्रेम व देशाभिमानाचे धडे देत राहील.’’

महाराणा प्रताप हे एके दिवशी शिकारीला गेले असता घोड्यावरून पडून जबर जखमी झाले. त्यानंतर त्यांची प्रकृती बिघडतच गेली. परिणामी स्वरूप त्यांचे ९ जानेवारी १५९७ रोजी चावंड येथे निधन झालं अन् भारतमाता एका राष्ट्रप्रेमी शुर योद्ध्याला कायमची मुकली. राणा प्रतापच्या निधनाची खबर जेव्हा अकबर बादशहाच्या कानी पडली. त्याक्षणीच ‘ते’ ताडकन सिंहासनावरून उठले अन् निःशब्द होऊन उभे राहिले. त्या दुःखद घडीला त्यांचे डोळे पाणवले होते. अकबर बादशहा आपल्या भावना व्यक्त करताना म्हणाले, मेवाडचा राजा महाराणा प्रताप हा अपराजित राजा होता.तो आयुष्यात कोणापुढे झुकला नाही. अशा शुरवीर योद्ध्याला मी सलाम करतो. ज्याच्या शौर्यगाथेची मित्रच काय... तर, शत्रूनेही प्रशंसा केली, अशा महापराक्रमी क्रांतीसूर्य महाराणा प्रतापसिंह सिसोदिया यांना मी जयंती दिनानिमित्त त्रिवार वंदन करतो.

महाराणा प्रताप अन् छत्रपती शिवाजी महाराज या शूरवीर महापुरुषांनी आपल्या रक्ताची आहुती देऊन आपल्या प्राणप्रिय हिंदुस्थान राष्ट्राचे रक्षण केले. अत: त्यास अधिक शक्तिशाली, समृद्ध व सुजलाम सुफलाम करण्यासाठी आपण सर्वजण कटिबद्ध होऊया, म्हणजे हीच या महापुरुषांना खरी आदरांजली ठरेल. जय हिंद! जय राजपुताना! जय महाराष्ट्र!

## विशेष

# जागतिक पक्षी स्थलांतर दिन



प्रेमसागर मिस्त्री

पूर्व आशियाई देशांतील थायलंड येथे आम्ही ऑक्टोबर महिन्यात २०२२ साली उघडचोची करकोचे (ओपन बिल्ड स्टॉर्क्स ) यांचे स्थलांतर आणि विणीच्या हंगामातील घरटे असलेले सारंगागार पहायला बँकॉक शहराच्या उत्तरपूर्व भागात खास संरक्षित राखीव क्षेत्रात फिरलो. इथे इतर सुद्धा पक्षी फार मोठ्या प्रमाणावर प्रजनन, घरटी करण्यासाठी स्थलांतरीत झाले होते. या वर्षी इतकी संख्या वाढ होती की आम्ही खाओ दिनसर या दक्षिण प्रदेश शिकारी पक्षी अभ्यासासाठी गेलो असता तेथील अनेकांनी हे सुचवलं की ईस्टर्न वेटलॅन्ड रिझर्व मध्ये तुम्ही नक्की स्टॉर्क्स आयबिसेस बघायला जायला हवं. इथे पोहचल्यावर सगळा कॅनव्हास बदलला. आजूबाजूला इमारती, शहराच्या थोड लांब अशी जागा पाणथळ पक्षांसाठी खास राखीव होती.. का...? तर इथे पाहुणे येतात आणि आपले घरटे तयार करतात व त्यामधील पिल्ले मोठी होऊन सुरक्षित उडून जावे यासाठी यशस्वी आयोजन करणे ही आपली जबाबदारी असल्याचे मत इथल्या प्रत्येकाचे आहे. शिवाय शहराच्या टाऊनशिप आराखड्यात तसे नियोजन अधोरेखित केले गेले असून त्याची अंमलबजावणी देखील करण्यात येते हि बाब मला विशेष भावली.

अगदी रस्त्या मधोमध असलेले झाड (सारंगागार) हे देखील जोपासले गेल होते. क्लायमेट इम्पॅक्ट मुळे यंदा घरटी जास्त झाल्याचे इथले पक्षी अभ्यासक सांगत होते. मी सारा आणि काव्या यांना या संवर्धन नियोजन पद्धतीचे प्रयत्न विशेष समजून सांगितले. याचे कारण पहिले म्हणजे शेती. शेतात खूप जास्त प्रमाणात गोगलगाय अशासारखे शिंपले, खूबे वाढले तर त्यांच्या लाळेसारख्या चिकट पदार्थामुळे रोपांच्या खोडावर, पानावर बुरशीजन्य रोगाची लागण होते. आणि नेमके या गोगलगायी मुग्ध बलाक करकोचांचे खाद्य असल्यामुळे ईथे त्यांच्या संख्येवर नियंत्रण राखले जाते. बगळे, करकोचे हे शेतकऱ्याचे खरे मित्र.

रायगड जिल्ह्यात विणीच्या काळात मे ते ऑक्टोबर या कालावधीत शेकडो आशियाई उघडचोची करकोचे पावसाच्या हंगामात विणीसाठी स्थलांतर करतात. जलीय गोगलगायींच्या शोधात पुन्हा महाड, अलिबाग, माणगाव येथे आता ते स्थिरावलेले आहेत. प्रजनन क्षेत्रात दुर्मिळ होत जाणारी झाडे आणि शिवाय वन्यजीव अधिवास विचारत न घेता करण्यात येणारी वृक्षतोड या बलाक प्रजेला चिंताजनक ठरली आहे.

यंदा पाण्याची पातळी पूर्वीपेक्षा खूपच कमी झाली असून आपण भीषण पाणी टंचाईला सामोरे जात आहोत. कोरडे हवामान आणि पाणथळ जागी इतर काळ व्यस्त असणारे करकोचे पावसाळ्यात हमखास कोकणात स्थलांतरीत होताना दिसतात. यंदा ही टोळी जरा लवकरच आली. साधारण २२मार्च रोजी पहिली ३०ते ३५ पक्षी चवदार तळ्याच्या आबाच्या झाडावर विसावताना नोंदविले गेले. अंतर्गत पाणथळ जागा, गोड्या खाऱ्या पाण्याची सरोवरे, शेतजमिनीतील सिंचन प्रदेश, अशी पूरक ठिकाणे निश्चित करून या पक्षांचे स्थलांतर होत असल्याचे दिसून येते. महाड येथील चवदार तळे परिसर जुनी मंडई, डोंगरी वाडा आणि सरेकर अळी परिसरात यांची वीण सर्वात जास्त संखेने होती. २८४ घरटी नोंद पूर्वी केली गेली आहे. पण गेल्या आठ वर्षांपासून बांधकाम आणि विद्युत तारा वर येणाऱ्या झाडांच्या फांद्यांची तोड या आणि इतर कारणांमुळे काही ठिकाणी समूळ वृक्षतोड तर अगदी मधले खोड बाकी ठेऊन मोकळ्या केलेल्या साऱ्या फांद्या या मुळे या पक्षांचे स्थलांतर खूपच कमी होताना दिसत आहे. शिवाय त्यांच्या विष्टा आणि पिल्लांच्या खाली पडण्यामुळे निर्माण होणारी दुर्गंधी या व अशा इतर कारणांमुळे त्यांची घरटी ऐन पावसात काढली जातात . ही बाब खेद जनक आहे. खरतर हा वन्यजीव कायद्यांनुसार गुन्हा देखील आहे. वन्यजीव कायद्यांनुसार त्यावर कारवाई करणे क्रमप्राप्त ठरते. यंदा अवघी ७८ घरटी चवदार तळे विभागात होत असून हे प्रमाण २८टक्के इतके चिंताजनक झाले आहे. सिस्केप संस्था महाड आणि वनविभाग वनपरिक्षेत्र महाड यांच्या संयुक्त विद्यमाने यंदा बगळे आणि करकोचे यांचे घरट्याचे संवर्धन करण्यासाठी विविध प्रयत्न नियोजित आहेत. यासाठी स्थानिक आणि नगरपालिका प्रशासन यांनी सहभाग घेऊन या स्थलांतरीत पक्षांचे संरक्षण करणे गरजेचे आहे. चला तर जागतिक पक्षी स्थलांतर दिवसाचे अवचित्य साधून येणाऱ्या या पाहुण्यांचे स्वागत करूया आणि त्यांचे संरक्षण करूया.

## लोकसंसद

### देशभरात एकूण गुन्हे घटले, मात्र सायबर गुन्ह्यांमध्ये वाढ

राष्ट्रीय गुन्हे नोंदणी ब्युरोने नुकताच ‘भारतातील गुन्हेगारी २०२४’ हा अहवाल प्रसिद्ध केला. या अहवालानुसार, २०२४ मध्ये देशभरात एकूण ५८.८५ लाख गुन्ह्यांची नोंद झाली, जी २०२३ मधील ६२.४१ लाख गुन्ह्यांच्या तुलनेत ६ टक्क्यांनी कमी आहे. देशात प्रति एक लाख लोकसंख्येमागील गुन्ह्यांचे प्रमाण ४४८.३ वरून कमी होऊन ४१८.९ पर्यंत खाली आले आहे. महिलांवरील गुन्ह्यांमध्येही १.५ टक्के घट नोंदवली गेली. २०२४ मध्ये महिलांवरील ४.४१ लाख गुन्हे नोंदवले गेले, तर २०२३ मध्ये ही संख्या ४.४८ लाख होती. मात्र देशातील एकूण गुन्हे घटले असले तरी सायबर गुन्ह्यांमध्ये १७.९ टक्क्यांची मोठी वाढ झाली आहे. २०२४ मध्ये देशभरात एकूण १ लाख १ हजार ९२८ सायबर गुन्हे नोंदवले गेले. २०२३ मध्ये ही संख्या ८६ हजार ४२० इतकी होती. सायबर गुन्हेगारीचा दर प्रति १ लाख लोकसंख्येमागे ६.२ वरून ७.३ पर्यंत वाढला आहे. सायबर गुन्ह्यांमध्ये आर्थिक फसवणूक हे सर्वात मोठे कारण असून, एकूण प्रकरणांपैकी ७२.६ टक्के (७३९८७ प्रकरणे) ही आर्थिक फसवणुकीशी संबंधित आहेत. तर लैंगिक शोषण (३.१ टक्के) आणि खंडणी (२.५ टक्के) ही सायबर गुन्ह्यांची इतर कारणे आहेत. देशातील महानगरांमध्ये बेंगळुरू (१७५६१ प्रकरणे) सायबर गुन्ह्यांच्या बाबतीत अव्वल स्थानी असून, त्यापाठोपाठ मुंबई (४९३९ प्रकरणे) दुसऱ्या क्रमांकावर आहे. त्यानंतर हैदराबाद आणि दिल्ली ही शहरे आहेत. तर तेलंगणा आणि कर्नाटक ही राज्ये सायबर गुन्हेगारीत हॉटस्पॉट ठरली आहेत. या अहवालानुसार गुन्हेगारीचा कल आता तंत्रज्ञानावर आधारित सायबर गुन्हेगारीकडे झुकलेला दिसून येत आहे.

**– प्रदीप मोरे, अंधेरी**

## दिनविशेष

# थोर समाजसेवक गोपाळ कृष्ण गोखले



गोपाळ कृष्ण गोखले हे आधुनिक भारताचे एक महान नेते, नेमस्त पक्षाचे अध्वर्यु आणि थोर समाजसेवक होते. नामदार, भारताचा हिरा अशा विविध उपाधी मिळालेल्या गोपाळ कृष्ण गोखले यांचा जन्म १८६६ साली गुहागरमधील कोतलुकमध्ये झाला. लहानपणापासून अभ्यासात अतिशय हुशार आणि इंग्रिजीवर विलक्षण प्रभुत्व होते. कोल्हापूर, पुढे पुण्यातील डेक्कन कॉलेज आणि मग मुंबई येथील एल्फिन्स्टन कॉलेजमधून त्यांनी शिक्षण घेतले. काही काळ मुलांच्या शिकवण्या घेऊन त्यांनी शिक्षणासाठी घेतलेले कर्ज फेडले. न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांचा प्रभाव गोखल्यांवर पडला. रानड्यांचे मानसपुत्र म्हणूनही गोखल्यांना ओळखले जाई. गणिताचे प्राध्यापक म्हणून कार्यरत असताना गोखल्यांना नोकरी, कुटुंब, ‘आपण बरे, आपले काम बरे’ हा विचार पटला नाही. ज्या देशात जन्म मिळाला आहे त्या देशासाठी आपण काहीतरी करायला हवे ही भावना कायम होती. गोखले यांच्या अंगी असलेल्या शुचिता, नैतिकता, तत्त्वनिष्ठता, सौजन्यशीलता व निःस्वार्थी सेवावृत्ती आदी गुणांनी प्रभावित होऊन महात्मा गांधीजी गोखले यांना गुरुस्थानी मानत असत. गांधीजी त्यांना ‘महात्मा गोखले, धर्मात्मा गोखले’ म्हणत. गोपाळ कृष्ण गोखले हे कुशल राजकारणी होते. राजकारणाच्या प्रति त्यांचा दृष्टिकोण उदारमतवादी होता. राजकीय आणि सामाजिक परिवर्तन घडवून आणावयाचे असेल तर घटनात्मक मार्गाचाच अवलंब केला पाहिजे असे त्यांचे स्पष्ट मत होते. भारतात सर्वप्रथम कायद्याचे राज्य, शांतता, सुव्यवस्थेचे प्रस्थापन, आधुनिक विचारांचे केलेले बीजारोपण, देशात केलेल्या अनेक सुधारणा यांमुळे इंग्रजी सत्तेविषयी त्यांचे धोरण मवाळ होते. कोणतीही चळवळ कायद्याच्या चौकटीतून करणे, स्वदेशीच्या वापरातून आपल्या देशातील उत्पादनास चालना देऊन आर्थिक उद्दिष्ट साध्य करणे असे त्यांचे विचार असत. गोपाळ गणेश आगरकरांनी सुरू केलेल्या ‘सुधारक’च्या इंग्रजी आवृत्तीची जबाबदारी नामदार गोखले यांनी काही काळ सांभाळली. सार्वजनिक सभा, राष्ट्रसभा समाचार या वृत्तपत्रांतूनही त्यांनी लेखन केले. वृत्तपत्रातील लिखाणाद्वारे ते समाजसुधारणांचा सतत पाठपुरावा करत. ‘राजकारणाचे आध्यात्मिकरण’ ही अतिशय वेगळी (परंतु कोणत्याही स्तरावरील, क्षेत्रातील राजकारणात सर्वकाळ अत्यावश्यक असणारी) संकल्पना त्यांनी भारतात मांडली. राजकारण हे साधन शुचितेला महत्त्व देऊन, सेवाभावाने करायचे विशेष कार्य आहे, असे त्यांचे ठाम मत होते. चारित्र्य, नैतिकता, निःस्वार्थी वृत्ती या सद्गुणांचा त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला, स्वतः चे आदर्श उदाहरणही तत्कालीन नेत्यांसमोर व जनतेसमोर ठेवले.

इ.स. १९०५ साली त्यांनी भारत सेवक समाजाची स्थापना केली. भारतातील तत्कालीन शिक्षण व्यवस्था ही भारतीयांसाठी पुरेशी नाही या विचाराने ही संस्था स्थापित केली. या संस्थेच्या कार्याअंतर्गत ग्रंथालयं उभारणं, शाळा स्थापन करणं आणि कामगारांसाठी रात्री शिकवण्या घेणं. असे विविध उपक्रम राबवले गेले. १९०१ मधे त्यांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे व्हावे म्हणून पाहिले विधेयक इम्पीरियल कौन्सिलमध्ये मांडले. संपूर्ण आयुष्य राजकारणात राहूनही ‘राजकारण’ न करता विशुद्ध सार्वजनिक जीवन जगणाऱ्या या महाराष्ट्राच्या सुपुत्राचे वयाच्या अवघ्या ४९ व्या वर्षी निधन झाले.

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

९ मे

१) श्री.जयवंत केशव शिंदे मु.कामतआळी, अलिबाग, दि.९-५-१९५८

२)श्री.मंगला विजय राजे पिंपळभाट, अलिबाग दि.९-५-१९५२


## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

आजचे अन्नदाते

**कै. प्रभावती महादेव पाटील स्मरणार्थ अलिबाग**



# भ्रमणध्वनी सेवा वारंवार खंडित

## हरिहरेश्वरमध्ये कॅशलेस व्यवहार ठप्प; व्यावसायिकांसह पर्यटकांची गैरसोय

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

श्रीवर्धन तालुक्यातील प्रसिद्ध तिर्थक्षेत्र तसेच भाविकांचे श्रद्धास्थान आणि पर्यटकांचे आकर्षण असलेल्या दक्षिण काशी हरिहरेश्वर येथे भ्रमणध्वनी सेवा वारंवार खंडित होत असल्याने व्यवसायिकांसह पर्यटकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे.

दक्षिण काशी हरिहरेश्वर येथे नामांकित तीन कंपन्यांनी भ्रमणध्वनी सेवा सुरू केल्याने नागरिकांसह व्यावसायिकांनी ही भ्रमणध्वनी सेवेचा लाभ घेतला. इंटरनेट माध्यमातून आलेल्या ग्राहकांना आर्थिक व्यवहार करणे सोपे जावे, या दृष्टीने व्यावसायिकांनी डिजिटल पेमेंट सेवा उपलब्ध केली. मात्र सद्यस्थितीत हरिहरेश्वर येथे भ्रमणध्वनी सेवा वारंवार ठप्प होत असल्याने कॅशलेस व्यवहार ठप्प होत आहेत. यामुळे



व्यावसायिकांसह पर्यटकांची गैरसोय होताना दिसत आहे.

### ‘नो कनेक्टिव्हिटी’मुळे नुकसान

बँक, शासकीय कार्यालये तसेच ऑनलाइन नोकरी व शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे नो कनेक्टिव्हिटीमुळे नुकसान होत आहे. जनगणनेचे काम भ्रमणध्वनी ॲपच्या माध्यमातून डिजिटल पद्धतीने होत आहे. ही प्रक्रिया १ मे ते १४ जून २०२६ या कालावधीत पार पडत आहे. याकरीता हरिहरेश्वर येथील भ्रमणध्वनी सेवा अखंडित असावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

### कंपनीमार्फत खुलासा

एकाच वेळी एकाच टॉवरवरून अनेक भ्रमणध्वनी ग्राहक हे इंटरनेट किंवा कॉल करत असल्यास नेटवर्क जाम होते. यामुळे कॉल ड्रॉप होणे किंवा इंटरनेट बंद पडणे असे प्रकार घडतात. भ्रमणध्वनी टॉवरना सिग्नल प्रसारित करण्यासाठी सतत वीजपुरवठा आवश्यक असतो. वीजपुरवठा खंडित झाल्यास अडचण उद्भवू शकते. अशा कारणांमुळे संबंधित क्षेत्रातील भ्रमणध्वनी सेवा खंडित होऊ शकते, असा खुलासा कंपनी प्रतिनिधीने आपले नाव जाहीर न करण्याच्या अटीवर सांगितले आहे.

हरिहरेश्वर तिर्थक्षेत्रावरील प्रदक्षिणा मार्गावर पर्यटक सेल्फीचा मोहात आपला जीव गमावतात. यावेळी या परिसरात स्थानिक नागरिक घटनास्थळी असल्यास वेळीच बचावकार्य सुरू होते. परंतु अशावेळी भ्रमणध्वनी सेवा अखंडित असणे आवश्यक आहे. जेणेकरून, घटनास्थळी अधिक मदत भासल्यास पर्यटक मुक्कामाला आलेल्या ठिकाणी संपर्क करू शकतील.

> **“हरिहरेश्वर येथे भ्रमणध्वनी सेवा बंद पडत असल्याने आम्हा व्यावसायिकांना फटका बसतो. पर्यटक खरेदी करून झाल्यावर डिजिटल पेमेंट साठी आग्रही असतात. नेटवर्क नसल्यास त्याची अडचण होते व अनेक वेळा वादविवाद होतात. येथील तिन्ही भ्रमणध्वनी कंपन्यांनी आपल्या सेवेत सुधारणा करावी. अन्यथा आंदोलन करावे लागेल.**
>
> **– सचिन गुरव, हरिहरेश्वर, व्यावसायिक”**

# विद्यार्थ्यांची फसवणूक करणाऱ्या संस्थांवर होणार गुन्हा दाखल

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचे संरक्षण करणे ही सर्वोच्च प्राथमिकता आहे. विद्यार्थ्यांची फसवणूक आणि त्यांचे शैक्षणिक नुकसान मुळीच खपवून घेतले जाणार नाही. विद्यार्थ्यांची फसवणूक करणाऱ्या संस्थांवर फौजदारी गुन्हे दाखल करा, असे निर्देश उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी प्रशासनाला दिले.

वांद्रे, मुंबई येथील डॉ. बळीराम हिरे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या फसवणूक प्रकरणाची गंभीर दखल घेत दोषी संस्थांवर तातडीने फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे निर्देश मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिले.

वांद्रे येथील डॉ. बळीराम हिरे महाविद्यालयात १३२ हून अधिक विद्यार्थ्यांना बोगस अभ्यासक्रम आणि पदव्या देऊन फसविल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणाचा सविस्तर आढावा उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी घेतला. यावेळी या मान्यताप्राप्त वास्तुशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थेत विद्यापीठ अनुदान आयोगाची मान्यता नसलेला अभ्यासक्रम सुरू करुन विद्यार्थ्यांची फसवणूक केल्याबद्दल या संस्थेच्या मान्यतेच्या अनुषंगाने विद्यापीठाच्या कायदयाअंतर्गत असलेल्या तरतूदी विचारात घेऊन त्यानुसार कारवाई करण्याचेही निर्देश दिले.

तसेच, महाराष्ट्र राज्य कृषी, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम (प्रतिबंध) अधिनियम २०१३मधील तरतूदीनुसार कारवाई करण्याचेही त्यांनी निर्देश दिले आहेत. त्याचप्रमाणे सक्षम प्राधिकरणांची मान्यता नसलेल्या विद्यापीठ अथवा अनधिकृत संस्था प्रवेशोच्छुक विद्यार्थ्यांना खोटी आमिषे दाखवून अथवा संस्था मान्यताप्राप्त आहे, असे भासवून प्रवेश घेण्यास प्रवृत्त करतात व नंतर विद्यार्थ्यांना त्यांची फसवणूक झाल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे कोणत्याही अनधिकृत संस्थेच्या अथवा विद्यापीठाच्या भूलथापांना बळी न पडता अभ्यासक्रमाची मान्यता तपासून घ्यावी उच्च शिक्षण संचालनालय तसेच तंत्रशिक्षण संचालनालयाच्या संकेतस्थळावर अथवा सक्षम प्राधिकरणांच्या संकेतस्थळावर संबंधित संस्थेचे नाव व अभ्यासक्रम असल्याची खात्री करूनच प्रवेश घ्यावा, असेही आवाहन त्यांनी केले आहे.

भविष्यात असे प्रकार रोखण्यासाठी आणि विद्यार्थ्यांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी विभागाने एक विशेष कार्यप्रणाली तयार करावी. त्याचप्रमाणे वांद्रे येथील डॉ. बळीराम हिरे महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या १३२ विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताच्या दृष्टीकोनातून नवीन शैक्षणिक धोरण २०२० मधील रिकगनिशन प्रायर लर्निंग तरतूदीनुसार या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित जोपासले जाईल, यासाठी महाराष्ट्र राज्य शैक्षणिक व संशोधन परिषदने अभ्यासून त्यानुसार कार्यवाही करावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

## हातभट्टीवर छापा

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

भिवंडी तालुक्यातील कालवार गावाजवळील खाडी परिसरात धाड टाकत पोलिसांनी गावठी दारूचे अड्डे उद्ध्वस्त केले. ठाणे ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेनेही कारवाई करत २ लाख ८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. हातभट्टी लावणारा सुभाष पंडित फरार झाला. ठाणे ग्रामीणचे अप्पर पोलीस अधीक्षक अनमोल मित्तल यांनी जिल्ह्यात गावठी हातभट्टी दारू तयार करणारे आणि विक्री करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाईचे आदेश दिले होते. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप गीते यांच्या पथकाने ही कारवाई केली.



## अवकाळीमुळे ऊसाच्या शेतीचे नुकसान

**नेरळ :** कर्जत तालुक्यात अवकाळी पावसाने अचानक हजेरी लावली आणि अनेकांची तारांबळ उडाली. तळवडे येथील ऊसाची शेती करणाऱ्या शेतकरी यांच्या शेतीचे मोठे नुकसान झाले. कर्जत तालुक्यात राज नद्याच्या पाण्यावरती दुबार शेती केली जाते. या शेतीमध्ये भाताचे पीक मोठ्या प्रमाणात घेतले जाते. मात्र अवकाळीमुळे मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांना फटका बसत आहे. त्यातच कर्जत तालुक्यातील कोलीवली गावातील मंगेश गणपत मिसाळ या शेतकऱ्याने आपल्या शेतीमध्ये कर्जत तालुक्यात ऊसाची लागवड केली होती. मात्र गुरुवारी (दि.७) या ऊसाच्या पिकाला अवकाळी पावसाचा फटका बसला. वादळी वाऱ्याने पीक जमीनदोस्त झाल्याचे पाहायला मिळाले. दरम्यान वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे पिकांचे खूप मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून सरकारने याकडे लक्ष देऊन तात्काळ पंचनामे करून नुकसान भरपाई देण्यात यावी, अशी मागणी शेतकरी मंगेश मिसाळ यांनी केली आहे.

## महानगर गॅसच्या खोदकामाचा फटका

**● तब्बल नऊ तास वीजपुरवठा बंद**

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल तालुक्यातील आकुर्ली-सुकापूर परिसरात महानगर गॅस कंपनीच्या खोदकामादरम्यान झालेल्या निष्काळजीपणामुळे २२ केव्ही नेरे मुख्य उच्चदाब वीजवाहिनीचे मोठे नुकसान झाले. परिणामी तब्बल नऊ तास वीजपुरवठा बंद राहिल्याने १०० हून अधिक गाव-वाड्यांतील हजारो ग्राहकांना अंधाराचा सामना करावा लागला.

महानगर गॅसच्या कामासाठी सुरू असलेल्या खोदकामावेळी वीजवाहिनी तुटल्याने संपूर्ण परिसरातील वीजपुरवठा अचानक खंडित झाला. पर्यायी यंत्रणा उपलब्ध नसल्याने महावितरणला वीजपुरवठा तातडीने सुरू करता आला नाही. त्यामुळे नागरिकांना रात्रभर अंधारात बसावे लागले. घटनेची माहिती मिळताच महावितरणचे अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. रात्रभर युद्धपातळीवर दुरुस्तीचे काम सुरू ठेवण्यात आले. अखेर पहाटे पावणे सहाच्या सुमारास वीजवाहिनी दुरुस्त करून वीजपुरवठा पूर्ववत केला. महानगर गॅस कंपनीच्या खोदकामातील निष्काळजीपणामुळे ही परिस्थिती निर्माण झाल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. दरम्यान, या घटनेप्रकरणी संबंधितांवर कारवाई केली जाणार असल्याची माहिती महावितरण अधिकाऱ्यांनी दिली.

## महिलेसोबत चिमुरडी बेपत्ता

**पनवेल :** खारघर सेक्टर ५ परिसरातून २२ वर्षीय महिला आणि तिची दोन वर्षांची मुलगी बेपत्ता झाल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात मिसिंगची नोंद करण्यात आली असून, पोलिसांकडून शोधमोहीम सुरू करण्यात आली आहे. रशिदा फिरोजअली शेख या आपल्या दोन वर्षीय मुलीला सोबत घेऊन सेक्टर ५, खारघर येथील आपल्या राहत्या घरातून कोणालाही न सांगता निघून गेल्या. त्या अद्यापपर्यंत घरी परत न आल्याने पती फिरोजअली अब्दुल शेख यांनी खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.




## पाली बसस्थानकाकडे जाणाऱ्या मार्गाचे नामांतरण

**। पाली । प्रतिनिधी ।**

पाली नगरपंचायतीतर्फे बसस्थानकाकडे जाणाऱ्या प्रमुख मार्गाचे नामांतरण ‘भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग’ असे करण्यात आले आहे. या निमित्ताने नगरपंचायतीच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रमुख मार्गाला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर असे नाव दिल्याने भीम अनुयायांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. उद्घाटन सोहळ्यात मार्गाचे नामफलक अनावरण करण्यात आले. उपस्थितांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महान कार्याचा गौरव करत ‘जय भीम’चा जयघोष केला.

नगरसेवक सुधीर भालेराव यांनी यापूर्वी नगराध्यक्ष आणि मुख्याधिकारी यांना लेखी निवेदन दिले होते. या निवेदनात हटाळेश्वर चौक ते तहसील कार्यालय या मार्गाला ‘भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग’ असे नामकरण करण्याची मागणी केली होती. त्यांच्या या मागणीला नागरिकांचा मोठा पाठिंबा मिळाला आणि नगरपंचायतीने जन भावनेचा आदर करून हा निर्णय घेतला. यावर्षी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती साजरी होत असून, त्यानिमित्ताने पाली नगरपंचायतीनकडून हा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. या निर्णयामुळे नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, हा मार्ग आता अधिकृतपणे ‘भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग’ म्हणून ओळखला जाणार आहे.

# खाडीपट्ट्यात आरोग्य सेवा व्हेंटिलेटरवर

**। मुंबई । सुजित धाडवे ।**

महाड तालुक्यातील खाडीपट्टा विभागातील आरोग्य व्यवस्था सध्या गंभीर संकटात सापडली असून, रुग्णवाहिकांच्या तीव्र कमतरतेमुळे स्थानिकांना मरणयातना सहन कराव्या लागत आहेत. एकीकडे आरोग्य सेवा आपल्या दारी असल्याचा गाजावाजा होत असताना, दुसरीकडे मात्र या दुर्गम भागातील नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीत देवावर हवाला ठेवून राहावे लागत आहे.

खाडीपट्ट्यातील डोंगराळ आणि विखुरलेल्या वाडीवस्त्यांमध्ये गंभीर आजारी रुग्ण, गरोदर माता, अपघातग्रस्त आणि सर्पदंश विंचूदंश झालेल्या रुग्णांची संख्या मोठी आहे. अशा परिस्थितीत रुग्णांना तातडीने महाड ग्रामीण रुग्णालय किंवा जिल्हा रुग्णालयात हलवणे आवश्यक असते. मात्र, हक्काची रुग्णवाहिका वेळेवर उपलब्ध होत नसल्याने अनेकदा रुग्णांची स्थिती गंभीर होते. महाड तालुक्यात सुसज्ज असे रुग्णालय नसल्यामुळे माणसांची त्रेधा तिरपीट होते.

ग्रामीणभागात एकेकाळी आधार असलेल्या एसटी बसेसच्या फेऱ्याही दिवसें दिवस कमी होत चालल्या आहेत. त्यामुळे




पर्यायी वाहतूक व्यवस्था पूर्णपणे कोलमडली आहे. रुग्णवाहिका मिळत नसल्याने ग्रामस्थांना खाजगी

**● रुग्णवाहिकेअभावी रुग्णांचे बेहाल**

वाहनांचा आधार घ्यावा लागतो. याचाच फायदा घेऊन खाजगी वाहनचालक अव्वाच्या सव्वा भाडे आकारत असल्याने गरिबांच्या खिशाला मोठी कात्री लागत आहे.

अपघाताच्या वेळी किंवा रात्री-अपरात्री कोणाची प्रकृती बिघडली तर गाडी शोधण्यातच अर्धा-एक तास जातो. हक्काची शासकीय रुग्णवाहिका या विभागासाठी स्वतंत्रपणे उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी स्थानिकांसह जनमानसाची आहे.

**यू बिझनेस मिट यांचा अनोखा उपक्रम**

**व्यवसायाच्या प्रचार, प्रसारासाठी स्टॉलचे आयोजन**

# नवी मुंबईमध्ये ग्लोबल बिझनेस समिटचे आयोजन

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

नवी मुंबईमधील प्रथमच ग्लोबल बिझनेस समिटचे आयोजन करण्यात आले आहे. भारत आणि थायलंड यांच्यामधील व्यापार वृद्धीच्या अनुषंगाने हे समिट अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहे. बेलापूर येथील पार्क या तारांकित हॉटेलमध्ये १८ मे रोजी ही समिट पार पडणार आहे.

थायलंडचे माजी उपपंतप्रधान एच इ कॉर्न दब्बरान्सी, इंजीनियरिंग इन्स्टिट्यूट ऑफ थायलंडचे संचालक तथा PEITAचे सल्लागार प्रो. डॉ. चियांचुंग ओदि कलायांनामित्र, भारतातील थाई दुधावासाचे माजी



सदस्य तथा PEITAचे सल्लागार थाराडोल थाँगग्रंग, पंतप्रधान कार्यालयातील फॉरेन अफेयर्स सचिव प्रसर्त पियासाचादेश यांचे शिष्टमंडळ या बिझनेस सबमिटमध्ये थायलंड देशाच्या वतीने उपस्थित राहणार आहे. तूर्तास युद्धजन्य परिस्थितीमुळे आखाती देशांतील व्यापार वृद्धी हा विषय संपुष्टात आलेला आहे. होर्मुज समुद्रधुनी रोखून ठेवल्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेवर त्याचे अत्यंत विपरीत परिणाम दिसून येत आहेत. युनायटेड नेशन्स सोबत महत्त्वपूर्ण बिजनेस ट्रेड डील झालेली असली तरी देखील ती अमलात आणण्यासाठी किती वेळ लागेल याचे कुणाकडे शाश्वत उत्तर नाही. व्यवसायाच्या दृष्टीने महासत्ता असणाऱ्या अमेरिकेला सध्या युद्धाची झळ सोसावी लागत असल्या कारणामुळे भारतीय गुंतवणूकदार व्यवसाय वृद्धी करता या देशाकडे देखील सकारात्मक दृष्टीने पाहत नाहीत. चीनसारखा व्यवसाय वातावरण पोषक देश आपल्या शेजारी असून देखील या देशासोबत असणारी विश्वासार्हता ही नेहमीच वादातीत राहिलेली आहे. याच कारणांमुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेमध्ये व्यवसाय वृद्धी करण्याकरता भारतातील लघु मध्यम आणि मोठे व्यावसायिक योग्य संधीच्या शोधात आहेत.

दुसरीकडे थायलंडसारखा देश हा सातत्याने ऐयाशी करण्याकरता प्रसिद्ध राहिलेला आहे. परंतु, या देशातील असणाऱ्या व्यवसाय पोषक परिस्थितीचा भारतातील गुंतवणूकदार आणि व्यावसायिक यांना फायदा होऊ शकतो. याच गोष्टीची चाचपणी करण्याकरता दोन्ही देशांतील व्यावसायिक आणि प्रशासन यांच्यात सुसंवाद प्रस्थापित करण्याकरता यु बिझनेस मीट यांच्यावतीने ग्लोबल समिट २०२६ चे आयोजन करण्यात आलेले आहे. १८ मे रोजी संपूर्ण दिवस कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले असून या ठिकाणी व्यवसायाचे प्रचार आणि प्रसार करण्यासाठी स्टॉलचे आयोजनदेखील करण्यात आले आहे. या समितीमध्ये सहभागी होण्याकरता सशुल्क नावे नोंदणी प्रक्रिया सुरू झालेली असून बुक माय शोच्या माध्यमातून देखील या समितीमध्ये रजिस्ट्रेशन करता येऊ शकेल. रियल इस्टेट, इम्पोर्ट एक्सपोर्ट, बँकिंग, एज्युकेशन, टेक्नॉलॉजी, मेडिकल टुरिझम, लाईफस्टाईल आणि हेल्थकेअर, स्पेशल टुरिझम, स्पिरिचुअल टुरिझम ग्लोबल मीडिया अँड एंटरटेनमेंट या व्यवसाय क्षेत्रांवर प्राधान्य क्रमाने फोकस ठेवण्यात आलेला आहे.

# निवडक



## आदई सर्कलचे सुशोभीकरण

**नवीन पनवेल :** नवीन पनवेल येथील आदई सर्कलचे पनवेल महानगरपालिकेकडून आकर्षक सुशोभीकरण करण्यात आले असून क्रिकेटप्रेमींसाठी खास क्रिकेट थीम साकारण्यात आली आहे. सर्कलमध्ये बॅट, बॉल, स्टंप, ग्लोव्हज, हेल्मेट, बूट आदी क्रिकेट साहित्याची प्रतिकृती उभारण्यात आली आहे. बाजूलाच असलेल्या पालिकेच्या स्टेडियममुळे या परिसराला अधिक आकर्षक रूप प्राप्त झाले असून नागरिकांचे लक्ष वेधून घेत आहे.

## जितेंद्र म्हात्रे पोलीस उपनिरीक्षकपदी

**पनवेल :** पनवेल तालुका पोलीस ठाण्यात कार्यरत असणारे जितेंद्र विठ्ठल म्हात्रे यांना महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागातर्फे पोलीस उपनिरीक्षक पदाची बढती देण्यात आली आहे. जितेंद्र विठ्ठल म्हात्रे हे १ जानेवारी १९९३ साली पोलीस खात्यात कॉन्स्टेबल म्हणून भरती झाले. प्रथम त्यांनी रायगड जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यात कामकाज पहिले. त्यानंतर त्याची बदली नवी मुंबई आयुक्तालयात झाली. यामध्ये विशेष शाखा, खंडणी विरोधी पथक, गुन्हेशाखा विविध पोलीस ठाणे येथे कार्यरत राहून त्यांनी आपल्या कामाचा ठसा उमटवला. या कामाची दखल शासनाने घेऊन त्यांना



२०२५ साली राष्ट्रपती पदक देण्यात आले. सध्या ते पनवेल तालुका पोलीस ठाणे येथे कार्यरत असताना त्यांना पोलीस उपनिरीक्षक पदाची बढती देण्यात आल्याने सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## ‘सहकार वाढविण्याचा प्रयत्न करावा’




**माणगाव :** सहकार वाढविण्याचा रायगड व कोकणच्या जनतेने प्रयत्न केला पाहिजे. याच सहकार चळवळीच्या माध्यमातून चांगले प्रकल्प कोकणात कसे येतील, त्यासाठीही प्रयत्न झाले पाहिजेत, असे प्रतिपादन महाराष्ट्र गृहनिर्माण स्वयं समुह पुनर्विकास प्राधिकरण अध्यक्ष ना.प्रविण दरेकर यांनी केले. रायगड नागरी सहकारी पतपेढी मर्यादीत मुंबई या पतसंस्थेची माणगाव शाखा द लँडमार्क बिल्डिंग, निजामपूर रोड, रेल्वे पुलाजवळ सुरु करण्यात आली आहे. या माणगाव शाखेचा उद्घाटन समारंभ गुरुवारी (दि.७) सकाळी ११ वाजता झाला. यावेळी ना.प्रवीण दरेकर यांनी उद्घाटक म्हणून उपस्थितांना असे मार्गदर्शन केले. यावेळी ते बोलत होते. आपल्या मार्गदर्शनात बोलताना ना.दरेकर पुढे म्हणाले की, अनेक गोष्टी आज सहकाराच्या माध्यमातून राज्यात उभ्या राहिल्या आहेत. राज्यातील अनेक सहकारी संस्था पाहता कोकणातील ज्या संस्था उभ्या राहिल्या आहेत, कोकणातील त्या संस्था आज प्रभावीपणे लोकांसाठी काम करताना दिसत आहेत. कोकणातील पाचही जिल्ह्यातील सहकारी संस्था अ वर्गात आहेत. कोकणी माणूस हा कुठलीही संस्था चालविताना सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून संस्था चालवीत असल्याने या संस्था यशस्वी होत आहेत. रायगड जनता नागरी सहकारी पतपेढी आणखी वाढली पाहिजे.

## महिला दक्षता समितीची मासिक बैठक



**पनवेल :** पनवेल तालुका पोलीस ठाणे येथे हद्दीतील महिला दक्षता समिती सदस्य यांची मासिक बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला वपोनि गजानन घाडगे व पोलीस उपनिरीक्षक जितेंद्र म्हात्रे यांनी विशेष मार्गदर्शक तसेच सूचना केल्या. त्यामध्ये महिला/ मुली यांची सुरक्षा यावर चर्चा आणि मार्गदर्शन केले. सायबर क्राईम, नशा मुक्तीयावरही चर्चा तसेच मार्गदर्शन करण्यात आले. शाळा, कॉलेज येथे विद्यार्थीनी यांचे सुरक्षेच्या दृष्टीने महिला वार्डन नेमणेबाबत उपस्थित शिक्षिका-महिला दक्षता सदस्य यांना सूचना केली आहे. महिला सक्षमीकरण, महिलांच्या अडीअडचणी, तक्रारी याकरिता पोलीस ठाण्यात महिला पोलीस अधिकारी व महिला पोलीस अंमलदार यांची नेमणूक करण्यात आली असून त्यांची माहिती देण्यात आली आहे. तसेच महिला दक्षता समिती सदस्य यांच्या तक्रारी ऐकून त्यांच्या समस्येचे निराकरण करण्यात आले. या बैठकीत महिला दक्षता समिती सदस्य व प्रतिष्ठित महिला उपस्थित होत्या.

## आनंदी पाटील यांची बिनविरोध निवड



**पनवेल :** पनवेल तालुक्यातील ओवळे ग्रामपंचायतीच्या उपसरपंच पदाची रिक्त झालेली जागा अखेर भरली असून, शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाच्या आनंदी चंद्रकांत पाटील यांची या पदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे. उपसरपंच निवडीसाठी विशेष सभेचे आयोजन सरपंच रुपेश गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले होते. यावेळी ग्रामसेवक राठोड यांनी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून कामकाज पाहिले. उपसरपंच पदासाठी केवळ आनंदी पाटील यांचाच एकमेव अर्ज आल्याने त्यांची निवड बिनविरोध झाल्याची अधिकृत घोषणा करण्यात आली. निवडीनंतर कृतज्ञता व्यक्त करताना उपसरपंच आनंदी पाटील म्हणाल्या की, ‘पक्षाने आणि ग्रामपंचायत सदस्यांनी माझ्यावर जो विश्वास टाकला आहे, त्याला मी पूर्णपणे पात्र ठरेन. सरपंच रुपेश गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली गावातील प्रलंबित विकासकामे मार्गी लावण्याला माझे प्राधान्य असेल. पाणी, रस्ते आणि महिलांच्या समस्या सोडवण्यासाठी मी कटिबद्ध राहीन’. निवडीनंतर सर्व स्तरांतून आनंदी पाटील यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

दि. /०५/२०२६

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक संकेत अशोक ढमाले आणि साक्षी संकेत ढमाले यांच्या मालकीची मिळकत त्यांचेकडून कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे तशा आशयाची बोलणी आमच्या अशिलांच्या सोबत झालेली आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालकांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र आर चौ.मी | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| वरसोली ता. अलिबाग, | १६६/१९०/१९६/१९७/ १९८/१२० | ४-५०-०० | ४५.०० |

तरी वरिल मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या १५ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

**ॲड. तनुष्का तुषार पेडणेकर**
रजिस्टर ऑफिस समोर, गाळा नं.१,
ता. अलिबाग, जि. रायगड.

दि. ०९/०५/२०२६

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे सुचीत करण्यात येत आहे की, आमचे अशिल रिलायबल डेव्हलपर्स तर्फे विकासक यांनी मौजे मुद्रे (बु), ता.कर्जत, जि.रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती मिळकत व त्यावरील ईमारतीचे विद्यमान मालक अंबर गृह निर्माण सहकारी संस्था मर्यादीत कर्जत यांचे कडून पुर्नविकसीत करण्याकरीता घेतलेली आहे. तसा उभयतांमध्ये उपरोक्त मिळकती बाबतचा विकसन व्यवहार घडुन आलेला आहे.

| मालकाचे नाव | सिटी सर्व्हे क्र. | क्षेत्रफळ | आकार |
|---|---|---|---|
| अंबर गृह निर्माण सहकारी संस्था मर्यादीत कर्जत | १२/२ब/२अ | ५-०५-०० (५०५-० चौ. मी) | ३०-५ |

तरी उपरोक्त बिनशेती मिळकतींमध्ये कोणाही व्यक्तीचा कसलाही हक्कहितसबंध अगर ताबा, बयाणापावती, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीन, लीज, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास सदरील नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ५ दिवसाचे आत खाली सही करणार अधिवक्ता यांचे कडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरूपात दाखल कराव्यात सदर मुदतीत हरकती न आल्यास उपरोक्त बिनशेती मिळकती निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन इतर कोणाही व्यक्तीचा कसलाही कोणताही कायदेशीर हक्कहितसंबध नाही. व असल्यास ते जाणीवपुर्वक आमचे अशिलांचे लाभात सोडुन दिलेले आहेत. असे समजुन कायदेशीर बाबींची पुर्तता करून आमचे अशिल रिलायबल डेव्हलपर्स तर्फे विकासक उपरोक्त बिनशेती मिळकती संदर्भातचा विकसन व्यवहार पुर्ण करतील आणि मग मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत वा तक्रार आमचे अशिल यांचेवर बंधनकारक राहणार नाही. याची या जाहीर नोटीसने तमाम जनतेने नोंद घ्यावी.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस आहे.

**ॲड. प्रमोद नथुराम सुर्वे**
रा.''मातोश्री निवास आवळस, ता. कर्जत, जि. रायगड
भ्रमनध्वनी क्र. ०९८८१५७९५५५

## जाहीर नोटीस

दिनांक ०७/०५/२०२६

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे सुचीत करण्यात येत आहे की, आमचे अशिल यांनी मौजे आवळस, ता. कर्जत, जि. रायगड येथील,

| मालकाचे नाव | सर्व्हे/हिस्सा | क्षेत्रफळ | आकार |
|---|---|---|---|
| श्री. परशराम काशिराम घोडके | ६५/२/अ | ०-७२-४० | १-४४ |

ची शेतजमीन मिळकत विद्यमान मालक यांचे कडून कायम स्वरुपी खरेदी करावयाची ठरविलेले आहे. तसा उभयातांमध्ये व्यवहार घडून आलेला आहे. तरी उपरोक्त शेतजमीन मिळकतींमध्ये कोणाही व्यक्तीचा कसलाही अगर ताबा, बयाणपावती, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीन, लीज, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास सदरील नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसाचे आत खाली सही करणार अधिवक्ता यांचे कडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरुपात दाखल कराव्यात. सदर मुदतीत हरकती न आल्यास उपरोक्त जमीन मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन इतर कोणाही व्यक्तींचा कसलाही कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध नाही. व असल्यास ते जाणीपुर्वक आमचे अशिलांचे लाभात सोडून दिलेले आहेत. असे समजुन कायदेशिर बाबींची पुर्तता करुन आमचे अशिल उपरोक्त जमिन मिळकती संदर्भातचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील आणि मग मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत वा तक्रार आमचे अशिल यांचेवर बंधनकारक राहणार नाही. याची या जाहिर नोटीसने तमाम जनतेने नोंद घ्यावी. येणे प्रमाणे जाहिर नोटीस आहे.

**ॲड. पूजा प्रताप सुर्वे**
रा. पळसदरी, हनुमान मंदिर जवळ, ता. कर्जत, जि. रायगड
भ्रमनध्वनी क्र. ९२७१८७६०५० ईमेल poojasurve337@gmail.com

नि.८/ड
दिवाणी चौकशी अर्ज ५६/२०२६
निशाणी नं.
ने. ता. १८/०६/२०२६
ॲड. नरेश मारूती बैलमारे

मा. दिवाणी न्यायाधीश साहेब क. स्तर कर्जत, रायगड

**जाहीर नोटीस**

१) सार्थक विलास गोसावी
वय २४ वर्षे, धंदा नोकरी,
रा. उक्रुळ, पो. चिंचवली,
ता. कर्जत, जि. रायगड- ४१०२०१. ...अर्जदार नं. १

२) वनिता विलास गोसावी
वय ४४ वर्षे, धंदा गृहिणी,
रा. उक्रुळ, पो. चिंचवली,
ता. कर्जत, जि. रायगड- ४१०२०१ ... अर्जदार नं. २

ज्याअर्थी, अर्जदार कर्जत येथील दिवाणी न्यायालयात दिवाणी चौकशी अर्ज क्रमांक ५६/२०२६ दाखल केला आहे. सदर अर्जामधील अर्जदार नं. १ यांचे वडील आणि अर्जदार नं. २ यांचे पती कै. श्री. विलास मारूती गोसावी हे दिनांक ०९/०१/२०२६ रोजी मयत झालेले आहेत. अर्जदार हेच त्यांचे कायदेशिर वारस असले बाबत दाखला मिळणे करीता अर्ज दाखल केलेला आहे. तरी या जाहीर नोटीशीने कळविणेत येते की, कै. श्री. विलास मारूती गोसावी यांच्या वारसांबाबत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत असल्यास, ही जाहीर नोटीस प्रसिद्ध केल्यापासून ३० (तीस) दिवसांच्या आत लेखी पुराव्यासह या मे. न्यायालयांत दाखल करावी. अन्यथा, सदरील अर्जदार हेच कै. श्री. विलास मारूती गोसावी यांचे कायदेशिर वारस आहेत, असे समजून सदरील अर्जदार यांच्या मागणीप्रमाणे वारस दाखला देण्यात येईल.

आज दिनांक ०६/०५/२०२६ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी जाहीर नोटीस दिली आहे.

सही/-
क. लिपिक
दिवाणी न्यायालय,
क. स्तर, कर्जत

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय,
क. स्तर, कर्जत

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, माझे अशिल श्री. दत्तात्रय वामन पाटील रा. नेरुळ, नवी मुंबई व श्री. शितलकुमार हसुराम म्हात्रे रा. पनवेल, जिल्हा-रायगड यांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत सदर जमिन मिळकतीचे विद्यमान मालक श्री. हरीश्चंद्र परशुराम शिगवण रा. जांभोशी, तालुका-पेण, जिल्हा-रायगड यांचेकडून रजिस्टर्ड खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे व तशी बोलणी सुरु आहेत.

**मिळकतीचे वर्णन-** जिल्हा रायगड, पोट तुकडी पेण, पंचायत समिती पेण, मे. दुय्यम निबंधक पेण यांचे कार्य क्षेत्रातील तलाठी सजा-पाबळ, मौजे जांभोशी येथील जमिन मिळकतीचे वर्णन ७/१२ वरुन खालील प्रमाणे-

| मौजे | गट क्र. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| जांभोशी | ३अ | ०-९५-१० | २-७४ |

पैकी ०-३४-०० हे.आर.चौ.मी. ही जमिन सामाईकांत विकत घेत आहेत. सदरची जमिन ही या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

सदरची जमिन ही निर्वेध व बोजाविरहीत असल्याची ग्वाही विद्यमान जमिन मालकांनी माझे अशिलांना दिली आहे. तरी वरील मिळकती संदर्भात जर कोणाचा साठेकरार, गहाण, दान, जप्ती, लिन, लीज, चार्ज, जामिनकी, कब्जा, वारसाहक्क अगर कायदेशीर हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह ही नोटीस प्रसिद्ध झाले दिवशी पासून १५ (पंधरा) दिवसांचे आत खाली सही करणार ॲडव्होकेट यांचे पत्यावर रजिस्टर्ड पोस्टाने कळवाव्यात.

जर सदर जाहीर नोटीसीस वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरची जमिन मिळकत ही निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजुन माझे अशिल विद्यमान मालकांबरोबर खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व वरील मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत ही माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

पेण- रायगड.
दि. ०८/०५/२०२६

सही/-
**ॲड. संजय भास्कर पाटील**
परमार प्लाझा, शॉप नं.१६.
तळ मजला. शिवाजी पथ, पेण,
पेण-रायगड. ४०२१०७.
मोबा. ९८८१९१५२१९

## महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

**उप प्रादेशिक कार्यालय रायगड-१**

### पर्यावरण विषयक जन सुनावणीची सूचना

मे. ऑइल अँड नॅचरल गॅस कॉर्पोरेशन (ONGC), तालुका-पनवेल, जिल्हा रायगड यांच्या ओएनजीसी न्हावा पुरवठा बेस (सप्लाय बेस) पायाभूत सुविधांचे अदययावतीकरण आणि न्हावा येथील जेटीच्या नूतनीकरणासाठी प्रकल्पाकरीता पर्यावरण विषयक जनसुनावणी आयोजित करणेकामी प्रस्ताव म. प्र. नि. मंडळाकडे प्राप्त झालेला आहे. या संदर्भात सदर प्रकल्पाबाबत पर्यावरणविषयक जनसुनावणी घेण्याचे प्रस्तावित आहे. सदर प्रकल्पाच्या परिसरातील रहिवासी, पर्यावरण विषयी काम करणा-या संस्था, सदर प्रकल्पामुळे अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवासी यांना उपस्थित राहता येईल.

सदर प्रस्तावासंबंधी पर्यावरणविषयक सूचना, विचार, टिका-टिप्पणी तसेच आक्षेप नोंदविण्यासाठी जाहीर पर्यावरणविषयक जनसुनावणीचे आयोजन पुढीलप्रमाणे करण्यात आलेले आहे.

**ठिकाण** – **सिद्धिविनायक बॅकेंन्ट, शेलघर, सेक्टर १६, आरटीआयएससी जवळ, खारकोपर, उलवे, ता. पनवेल, जि. रायगड–४१०२०६.**
**दिनांक** – **१२/०६/२०२६**
**वार** – **शुक्रवार**
**वेळ** – **दु. ०३.०० वाजता**

सदर प्रकल्पाबाबत लेखी स्वरुपात सूचना ही जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत खालील पत्त्यावर पाठविण्यात याव्यात–

**प्रादेशिक कार्यालय / उप–प्रादेशिक कार्यालय रायगड–१,**
**महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड भवन, ६ वा मजला, सेक्टर–११, सी. बी. डी. बेलापूर, नवी मुंबई – ४००६१४. ई–मेल : sroraigad1@mpcb.gov.in**

सदर प्रकल्पासंबंधी माहिती असलेले कार्यकारी सारांश अहवाल मराठी व इंग्रजी भाषेमध्ये तसेच पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल खालील कार्यालयांमध्ये उपलब्ध आहेत. संबंधित व्यक्ती या कार्यालयांमध्ये कार्यालयीन वेळेत सदर कागदपत्रे अभ्यासू शकतील.

१. जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड, अलिबाग
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड अलिबाग
३. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, रायगड अलिबाग.
४. प्रांताधिकारी, प्रांत कार्यालय, ता. पनवेल, जि.रायगड.
५. तहसिलदार, तहसिल कार्यालय, ता. पनवेल, जि.रायगड.
६. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, ता. पनवेल, जि. रायगड
७. प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, ६ वा मजला, रायगड भवन,सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई
८. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुख्यालय, कल्पतरु पॉईन्ट, ३ रा मजला, सायन माटूंगा स्कीम रोड नं.८, सायन सर्कल समोर, सायन (पूर्व),मुंबई–२२.
९. पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासन भवन, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई–३२.
१०. प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, पश्चिम विभाग, तळ मजला, पूर्व बाजू, नवीन सचिवालय इमारत, सिव्हील लाईन्स, नागपूर–४४०००१.
११. ग्रामपंचायत कार्यालये : ग्रुप ग्रामपंचायत न्हावे, ग्रामपंचायत कार्यालय – गव्हाण, वहाल, उलवे.

**सही/–**
**(प्रशांत भोसले),**
**उप प्रादेशिक अधिकारी, रायगड–१**

## कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड

**(भारत सरकारचा उपक्रम)**

सादर सेवा

### निविदा सूचना

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड, रत्नागिरी येथील वरिष्ठ विभागीय सिग्नल व दूरसंचार अभियंता यांच्या वतीने अनुभवी कंत्राटदारांकडून "(i) रत्नागिरी, कणकवली आणि कुडाळ या 03 स्थानकांवरील पॅनेल इंटरलॉकिंगयुक्त सर्व एसअँडटी कक्षांमध्ये ॲस्पिरेशन टाईप एअर सॅम्पलिंग डिटेक्टर सह स्वयंचलित अग्निशमन शोध व अलार्म प्रणाली उपलब्ध करून देणे आणि (ii) 10 गुमट्यांमध्ये ॲस्पिरेशन टाईप एअर सॅम्पलिंग डिटेक्टकर्स उपलब्ध करून देणे. या कामामध्ये रत्नागिरी विभागातील कोलाड, माणगाव, वीर, गोरेगाव आणि इंदापूर स्थानकांवरील गुमट्यांमध्ये विद्यमान एएफडिएएस प्रणालीशी इंटरफेसिंग करणे देखील समाविष्ट आहे." या कामासाठी ई-निविदा आमंत्रित करण्यात येत आहे. **निविदा सूचना क्र.: केआर-आरएन-एसजी-टी-02-2026-27 दिनांक 09.05.2026, कामाची अंदाजित किंमत:** रु. 53.12/- लाख (जीएसटी सहित), **ईएमडी रक्कम:** रु. 1,06,200/-, **निविदा सादर करण्याची अंतिम तारीख व वेळ:** 30.05.2026 रोजी 15:00 वाजेपर्यंत. अधिक माहितीसाठी कृपया भेट द्या: www.ireps.gov.in

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. भुषण दत्तात्रेय घरत रा. चौल, ता.अलिबाग यांचेकडुन कायम खरेदी करण्याचे ठरविले असुन तसा साठेकरार आमचे अशिल व विद्यमान मालक यांचे दरम्यान झालेला आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र हे. आर. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| नागाव ता. अलिबाग | १२८६ | ०-२९-८०<br>०-०१-५०<br>०-३१-३० | ५.६३ |

सदरहु मिळकतीपैकी श्री. भुषण दत्तात्रेय घरत यांचे खुद्द मालकीची व ताबे कब्जा वहीवाटीतील ०-१५-१० हे. आर. एवढे क्षेत्रफळ असलेला मिळकत ही या जाहीर नोटीशीचा विषय आहे.

सदरहु मिळकत ही पुर्णपणे बोजाविरहीत व निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. तरी वरील नमुद मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षिस, लिज, पोटगी जाण्या येण्याचे वहिवाटीचे मार्ग, मृत्युपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासहित खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन होणारे ७ (सात) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास नमुद मिळकतीचे टायटल हे निर्वेध व बोजाविरहित आहे. असे गृहित धरुन आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : ०८/०५/२०२६

सही/-
**श्री. उमेश बाळकृष्ण म्हात्रे**
बोफोर्स श्रीबाग नं. २
अलिबाग - रायगड
मो.नं. ९९२२७१६३११

## हरकत जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, कै. धर्माजी नारायण पाटील, कै. जनार्दन पाटील, कै. नामदेव पाटील, कै. माणिक पाटील, कै. चिंतामण पाटील, कै. हिराजी पाटील यांचेतर्फे आमचे अशील श्री. भालचंद्र धर्माजी पाटील, रा. रांजणखार- चिंचवली, ता. अलिबाग, जि. रायगड व यांनी दिलेल्या माहितीनुसार खालील वर्णन केलेल्या मिळकती संदर्भित हरकत नोटीसीचा विषय आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे नारंगी, ता. अलिबाग, भुमापन क्रमांक व उपविभाग ८३/४, ३३/२, ८३/११/१२/१३, ८३/१६ अ, ८३/१६ ब, ७६/१०,

सदरच्या वर नमुद मिळकती ह्या वरील विद्यमान मालक यांचे ताबा, कबजात, वहिवाटीत असून इतर अन्य सहमालक यांचा सदरच्या मिळकतींवर कोणताही, कसल्याही प्रकारचा हक्क व अधिकार नाही. असे असताना केवळ सदर मिळकतीच्या सातबारा सदरी गोपाळ धनाजी पाटील, विकास धनाजी पाटील व प्रकाश धनाजी पाटील यांचा सदरच्या सातबारामध्ये केवळ नाव असल्याचा गैरफायदा घेऊन सदरच्या मिळकती क्रमांक ८३/४, ८३/११/१२/१३, ८३/१६ अ, ८३/१६ ब, या मिळकतींमध्ये त्यांचा अविभक्त हिस्सा दाखवून पंकज युवराज खजानची, विश्वास जिवराज खजानची व निखिल जगन्नाथ अंचलकर यांना निरंतर वहिवाटीकरिता हक्क करारनामा लिहून दिला आहे. सदरचा करारनामा हा खोटा, खोडसाळ असून आमचे अशीलांस मान्य व कबूल नाही.

आमचे अशील यांची कोणतीही परवानगी अथवा संमती न घेता सदरच्या वर नमुद मिळकतींपैकी गट नं. ८३/४, ८३/११/१२/१३, ८३/१६ अ, ८३/१६ ब, या मिळकतींचा करार नोंदणीकृत करण्यांत आलेला आहे सदरचे तुमचे हे कृत्य बेकायदेशीर आहे. सदरच्या वरील वर्णनाच्या मिळकतीच्या करारास आमचे अशीलांची सक्त हरकत आहे.

सदरचा केलेला करारनामा हा सब रजिस्ट्रार अलिबाग यांचे कार्यालयांत दस्त क्र. ६७२/२०२६ नुसार दिनांक २३.१.२०२६ नुसार नोंदणीकृत केलेला आहे. सदरचा दस्त हा पंकज युवराज खजानची, विश्वास जिवराज खजानची व निखिल जगन्नाथ अंचलकर यांनी रद्द करुन घ्यावा अन्यथा आमचे अशील हे तुमचे विरुद्ध फौजदारी वा दिवाणी स्वरुपाची कोर्ट कारवाई करतील.

तरी ह्या जाहिर नोटीसीचे हरकतीद्वारे सर्वांना सुचीत करणेत येते की, सदर मिळकतींचा कोणीही कोणत्या प्रकारे अथवा खरेदी विक्रीचा व्यवहार, निरंतर वहिवाटीकरिता हक्क करारनामा वा अन्य करारनामे, आमचे अशीलांचे अपरोक्ष करु नये. याउपरही सदरचे मिळकतीसदंर्भात कोणीही कोणतेही खरेदीखत अथवा इतर कोणताही व्यवहार केल्यास तो आमचे अशीलांवर व त्यांचे वालीवारसांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. कळावे.

अलिबाग
दिनांक : ०८/०५/२०२६

**ॲड. भूपेंद्र जी. पाटील**
जिल्हा न्यायालय रायगड अलिबाग
मोबा नं. ९५१८५६२३३३

## कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड

**(भारत सरकारचा उपक्रम)**

सादर सेवा

### रोजगार अधिसूचना

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडने नियमित तत्वावर 7व्या वेतन आयोगाच्या वेतन मॅट्रिक्स लेव्हल-8 (रु. 47600-151100) अंतर्गत खालील पदांसाठी रोजगार अधिसूचना क्र. सीओ/पी-आर/01/2026 दिनांक 04/05/2026 प्रसिद्ध केली आहे:

| पद | रिक्त पदांची संख्या युआर | रिक्त पदांची संख्या ओबीसी-एनसीएल | रिक्त पदांची संख्या एससी | एकूण |
|---|---|---|---|---|
| सहाय्यक अभियंता (स्थापत्य) | 01 | - | - | 01 |
| सहाय्यक वैद्यकीय अधिकारी | 02 | 01 | - | 03 |
| सहाय्यक व्यवस्थापक / माहिती तंत्रज्ञान | 01 | - | - | 01 |
| सहाय्यक वाहतूक व्यवस्थापक (ऑपरेटिंग व वाणिज्य) | 02 | 01 | 01 | 04 |
| सहाय्यक साहित्य व्यवस्थापक | - | 01 | - | 01 |
| सहाय्यक यांत्रिक अभियंता | - | 01 | - | 01 |
| सहाय्यक सिग्नल व दूरसंचार अभियंता | - | - | 01 | 01 |
| सहाय्यक वित्तीय सल्लागार | - | 01 | 01 | 02 |
| सहाय्यक विद्युत अभियंता | - | 01 | - | 01 |
| सहाय्यक कर्मचारी अधिकारी | 01 | - | - | 01 |
| सहाय्यक उपमहाव्यवस्थापक | 01 | - | - | 01 |

उमेदवारांनी अधिसूचना, पात्रता निकष इत्यादी तपशीलांसाठी केआरसीएल संकेतस्थळ www.konkanrailway.com वर **लिंक → नियुक्ती → वर्तमान अधिसूचना → अधिसूचना** पाहावी व त्यानुसार अर्ज करावा.

**मुख्य कार्मिक अधिकारी**

## जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली बिनशेती मिळकत तिचे मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या बिनशेती मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे बोपेले, ता. कर्जत, जि. रायगड.**

| मालकाचे नाव | स. नं./हि. नं. | एकुण क्षेत्र चौ.मी. | आकार रू.पैसे. |
|---|---|---|---|
| जी.पी. ॲन्ड कंपनी तर्फे भागीदार श्री. गिरीशचंद्र राधेश्याम गुप्ता. जी. पी. ॲन्ड कंपनी तर्फे भागीदार श्री. प्रफुल्ल शत्रुघ्न साहु. | ५२/७ | ५१३-०० | ५१-३० |

तरी, वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दूसरे कोणाचा साठेकरार, कूळमूखत्यारपत्र, बयाना, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटेचमेंट, लिन, मृत्युपत्र, पोटगी, अदलाबदल वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. असे सर्वांस कळावे.

दि. ०९/०५/२०२६

**ॲड. संजय हरिश्चंद्र म्हसे**
पत्ता - बी-३०१, सायली निर्माण,
निर्माण नगरी, नेरळ, ता.कर्जत, जि.रायगड.
मो.नं. ९४०३६४७९५३

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. शशिकांत डी. कुलकर्णी यांनी मौजे आक्षी, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची बागयत जमीन मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | एकुण क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| आक्षी ता. अलिबाग | ३५२/३ | बागायत ०-१३-८० | ५.६२ |

वर वर्णन केलेली जमीन मिळकती पैकी क्षेत्र ०-०६-०० हे. आर. बागायत क्षेत्र या नोटीसीचा विषय आहे.

सदर नोटीसीचा विषय असलेली मिळकत हि विद्यमान मालक शामल पंकज भोईर यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, ती विकणेचा त्यांस पुर्ण कायदेशिर हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहार हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसाचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरुन आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वांस कळावे

ठिकाण- अलिबाग
दिनांक ०८/०५/२०२६
मोबा. नं. ९९२२७०७०१२

**ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे**
ऑफिस - लक्ष्मीनारायण, पहिला मजला,
गाळा नं. ७ व ८, ब्राम्हण आळी, राम मंदिर
समोर, ता. अलिबाग, जि. रायगड ४०२२०१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरिता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे चेवणे, ता. कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रू.पै. |
|---|---|---|
| ७/१/अ | एकूण क्षेत्र ०-५०-८० हे.आर पैकी विक्री क्षेत्र ०-२०-०० हे.आर | ४.०० |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून तीन दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक :- ०९/०५/२०२६

सही/-
**ॲड. रोहित रो. मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ता :- हाउस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ,
मु.पो. कामार्ली, ता.पेण, जि.रायगड पिन नं.४०२१०७

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची मौजे बामणगांव, ता. अलिबाग येथील मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्रीम. सविता केशव कुंटे, वगैरे ११ यांच्याकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| बामणगांव | ३११/१ | ०-२३-१०<br>पो.ख. ०-०५-५०<br>०-२८-६० | ०.६२ |

सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र, तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज, लिएन या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क - हितसंबंध असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात.

मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व त्यामध्ये कुणाचाही कोणत्याही प्रकाराचा हक्क अधिकार नाही, असे गृहित धरून आमचे अशिल सदरचा खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
ता. ०७/०५/२०२६

**ॲड. विधान अरविंद पाटील**
'वत्सला' टिळक रोड, स्टेट बँकेसमोर
ता. अलिबाग, जि. रायगड
मो. नं. ९४२२३७५११५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, माझे अशिल श्री. सागर दिलीप तुरे रा. खारपाले, तालुका-पेण, जिल्हा-रायगड यांनी खालील वर्णनांची जमिन ही सदर जमिनीचे विद्यमान मालक श्री. राजेंद्र अंबादास राणे व इतर सर्व रा. आमटेम, तालुका- पेण, जिल्हा - रायगड यांचेकडुन रजिस्टर खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले असुन साठेकरार करण्यात आलेला आहे.

मिळकतीचे वर्णन जिल्हा रायगड, पोट तुकडी व तालुका पेण, मे. दुय्यम निबंधक पेण यांचे कार्यक्षेत्रातील तलाठी सजा - निगडे, मौजे निगडे येथील गट नं. ५७/३ क्षेत्र ०-४०-५० हे.आर.चौ.मी. त्यासी आकार रु. ११-२० पैसे ही सामाईक मालकीची जमिन या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

सदरची जमिन ही निर्वेध व बोजाविरहीत असल्याची ग्वाही सदर जमिनीचे विद्यमान मालकांनी माझे अशिलांना दिली आहे. तरी वरील जमिन मिळकती संदर्भात जर कोणाचा साठेकरार, गहाण, दान, जप्ती, लिन, लीज, चार्ज, जामिनकी, कब्जा, वारसाहक्क अगर कायदेशीर हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले दिवशीपासून १४ (चौदा) दिवसांचे आंत खाली सही करणार ॲडव्होकेट यांचे पत्यावर रजिस्टर्ड पोस्टाने कळवाव्यात.

जर वरील मुदतीत कोणाचीही लेखी हर-हरकत न आल्यास सदरची जमिन निर्वेध व बोजाविरहित आहे व त्यावर इतर दुसरे कोणाचाही, कसल्याही प्रकारचा हक्क अगर हितसंबंध नाही असे समजुन माझे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदती नंतर येणारी कोणतीही हरकत ही माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.

पेण- रायगड.
दि. ०९/०५/२०२६.

सही/-
**ॲड. संजय भास्कर पाटील**
परमार प्लाझा, शॉप नं. १६,
तळ मजला. शिवाजी पथ.
पेण- रायगड. ४०२१०७.
मोबा. ९८८१९१५२१९

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची मौजे धोकवडे, ता. अलिबाग येथील मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक, श्री. विश्वास हरिश्चंद्र म्हात्रे यांच्याकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार |
|---|---|---|---|
| धोकवडे | ५६/१ | ०-१९-४०<br>०-१३-८०<br>०-३३-२०<br>पो.ख.०-०१-००<br>०-३४-२० | रु.५.६८ |

पैकी श्री. विश्वास हरिश्चंद्र म्हात्रे यांच्या मालकीचे ० हे. १५.१० आर एवढे क्षेत्र

सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र, तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज, लिएन या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क - हितसंबंध असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात.

मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहित धरून आमचे अशिल सदरचा खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
ता. ०८/०५/२०२६


**ॲड. विधान अरविंद पाटील**
रा. वत्सला, टिळक रोड, स्टेट बँकेसमोर,
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड
मो. नं. ९४२२३७५११५

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी– सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

• वधू पाहिजे– केंद्रीय सरकारी अधिकारी वय ४० ते ५०, निमगोरी शिक्षण-ग्रज्युकेशन , जात -हिंदु. उत्पन्न- २०००००० वार्षिक, फोन - ७३८५६६४०७९.

• सहारा ट्रॅव्हल्स अलिबागमध्ये ऑफिस कामासाठी स्थानिक मुलगी पाहिजे. १०/१२ वी ९५२७०२९५०२

• अलिबागमध्ये दुकान गाळा विक्री करणे आहे. लोनची व्यवस्था करून मिळेल. ९७६४५४८६७९

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१




## राशीभविष्य

- **मेष** : महत्त्वाची कामं होतील. विवाहेच्छुकांना दिलासा मिळेल. व्यवसायात उत्तम स्थिती राहील.
- **वृषभ** : उधार, उसनवारीमुळे अडचणी येतील. कर्जाचा भार वाढेल. कुलदेवतेची उपासना करायला हवी.
- **मिथुन** : प्रकृतीच्या तक्रारी संभवतात. नोकरीत इतरांकडून प्रशंसा होईल. आर्थिक प्रश्नातून मार्ग निघेल.
- **कर्क** : व्यवहारात नुकसान संभवतं. कर्ज प्रकरणं रखडतील. वास्तुदोष असेल तर वेळीच उपाय करावेत.
- **सिंह** : नोकरीत उत्तम संधी लाभतील. मोठी गुंतवणूक लाभदायक ठरेल. चैनीवर अधिक खर्च होईल.
- **कन्या** : प्रियजनांचा सहवास लाभेल. कौटुंबिक प्रश्नांचा ताण राहील. यांत्रिक क्षेत्रात संधी लाभतील.
- **तूळ** : मनासारख्या घटना घडतील. व्यवसायात नव्या संधींचा लाभ घ्यावा. मानसिक स्वास्थ्य लाभेल.
- **वृश्चिक** : कोर्ट प्रकरणात दिलासा मिळेल. गर्दीच्या ठिकाणी जाणं शक्यतो टाळावं. बाकी चिंता नसावी.
- **धनु** : आवाका ओळखून व्यवहार करावे. वैवाहिक जीवनात मतभेद संभवतात. शनिची उपासना करावी.
- **मकर** : नोकरीच्या प्रयत्नात यश मिळेल. ओळखीतून मोठी कामं होतील. विद्यार्थ्यांची उत्तम प्रगती होईल.
- **कुंभ** : भाग्योदयाच्या दिशेने वाटचाल होईल. कलाकारांचा उत्साह वाढेल. बोलण्यातून गैरसमज संभवतात.
- **मीन** : आर्थिक स्थिती उत्तम राहील. नव्या ओळखींचा लाभ घ्यावा. बेरोजगारांना दिलासा मिळेल.

## ९ मे — दिनविशेष

**१९३६** : इटलीने इथिओपिया देश बळकावला.
**१९४६** : अखिल भारतीय काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष म्हणून पं. जवाहरलाल नेहरूंची चौथ्यांदा निवड.
**२०१३** : जम्मूमधील कारागृहात कैद्यांच्या हल्ल्यात जखमी झालेला पाकिस्तानी कैदी समाउल्लाह याचा मृत्यू झाला.
**२०१७** : नयना पुजारी बलात्कार आणि खूनप्रकरणी तिन्ही आरोपींना फाशी सुनावली गेली.

## आरोग्यमंत्र — वेदना का होत नाहीत?

काही टोचल्यास आपल्याला वेदना होतात. कळ येते. मग नख कापताना किंवा डोक्यावरचे केस कापून घेताना आपल्याला वेदना का होत नाहीत? याचे उत्तर म्हणजे शरीरातल्या जिवंत पेशींशी मज्जातंतू जोडलेले असतात. त्या पेशींची मोडतोड झाली, त्यांना इजा झाली की त्यांच्यामधून विद्युत्रासायनिक संदेश मेंदूपर्यंत पोहोचतो आणि वेदनेची जाणीव होते. पण हे मज्जातंतू चाळवलेच गेले नाहीत तर वेदना होणारच नाही. नखं आणि केस या मृतपेशी असतात. त्यामुळे त्यांच्याशी मज्जातंतू जोडलेले नसतात. साहजिकच नखं कापताना किंवा केस कापून घेताना वेदना जाणवण्याचा प्रश्नच उद्भवत नाही; परंतु केसांची वाढ ज्या फॉलिकलमधून होते त्या जिवंत पेशी असतात. केस कापण्याऐवजी ते उपटले तर या पेशींना धक्का पोहोचतो. त्यांच्याशी जोडलेल्या मज्जातंतूंना प्रभाव जाणवतो आणि आपल्याला वेदना होतात. नखांच्या बाबतीतही हीच परिस्थिती असते. नखांच्या मुळाशी असलेल्या पेशींची वाढ होते आणि नखांच्या मुळाशी एक नवी प्रत तयार होते. ती मृत पेशींना वरच्या दिशेनं ढकलते आणि नखं वाढतात. कालांतरानं या नव्या प्रतीतल्या पेशीही मृत होतात आणि त्यांच्या मुळाशी एक नवी प्रत तयार होते. त्यामुळे नखांची वा केसांची वाढ होत असली तरी त्या मृत पेशी असल्यानं कापताना अजिबात वेदना होत नाहीत. दाढीच्या बाबतीतही ही स्थिती असते.



## व्हॉट्स न्यू? — आगळा फोल्डेबल लॅपटॉप

फोल्डेबल स्मार्टफोनची चर्चा होत असताना लिनोवो या कंपनीने दुमडता येणारा लॅपटॉप तयार केला आहे. हा फोल्डेबल लॅपटॉप सध्या चर्चेचा विषय ठरत आहे. कंपनीच्या थिंकपॅड सिरिजचा एक भाग असणारा हा लॅपटॉप जगातला पहिलाच फोल्डेबल लॅपटॉप असल्यामुळे त्याबाबत कुतुहल निर्माण झालं आहे. तीन वर्षांच्या संशोधनानंतर कंपनीने हा लॅपटॉप तयार केला. १३.३ इंचांचा टू के रेझोल्युशनवाला ओएलईडी स्क्रीन यात बसवण्यात आला आहे. हा स्क्रीन मधून दुमडता येतो. टायपिंग करताना युजरच्या स्क्रीनवरच व्हर्च्युअल की बोर्ड तयार होतो. यामुळे वेगळ्या की बोर्डची गरज भासत नाही. या लॅपटॉपसोबत वायरलेस की बोर्डही देण्यात येईल. दुमडल्यानंतर तो एखाद्या डायरीसारखा दिसतो. त्यामुळे तो अगदी सहज कॅरी करता येईल. यात ट्रॅकपॅडही बसवण्यात आला आहे. यात सी टाईप यूएसबी पोर्ट असेल. हेडफोन लावण्याची सुविधाही देण्यात आली आहे. या लॅपटॉपमध्ये विंडोज १० आणि कॅमेरा असेल. यात इंटेलचा प्रोसेसर बसवण्यात आला आहे. एकदा चार्ज केल्यानंतर हा लॅपटॉप दिवसभर वापरता येईल.

## करीअर ग्रोथ

✽ मॅकेनिकल इंजिनिअरींग केल्यानंतर भारतीय हवाई दल, रेल्वे, लष्कर, डीआरडीओ, भेल, पीडब्ल्यूडी अशा ठिकाणी सरकारी नोकरीसाठी अर्ज करण्याची संधी मिळते.

✽ बायोटेक्नॉलॉजीनंतर फॉरेन्सिक विभागात नोकरी करता येईल. या क्षेत्रात संशोधन करण्यासाठी सरकारकडून निधीही उपलब्ध होऊ शकतो.

✽ सिव्हिल इंजिनिअरींग करून वाहतुकीच्या क्षेत्रात करीअर करता येईल. तसंच पायाभूत सोयीसुविधा उपलब्ध करून देणाऱ्या शासकीय संस्थांमध्येही संधी आहेत.

## स्टाईल स्टेटमेंट — गेट रेडी फॉर वीकेंड

✽ यंदा डंगरीची फॅशनही इन आहे. डंगरी हा प्रकार बऱ्याच वर्षांपासून चलनात असला तरी यंदा त्याचे अनेकविध पर्याय पहायला मिळत आहेत.

✽ उन्हाळ्यात फ्लोरलला प्रचंड डिमांड असते. या ऋतूतल्या एखाद्या संध्याकाळी मस्त हवेत उडणारा, झुळझुळता फ्लोरल ड्रेस घाला. मुलायम अशा शीर फॅब्रिकचे फ्लोरल ड्रेस खूप छान दिसतील. कंफर्टसाठी कॉटन ड्रेस ट्राय करा.

✽ चारचौघींमध्ये उठून दिसायचं असेल तर जंपसूट घाला. फॉर्मल आणि कॅज्युअल अशा दोन्ही ऑकेजन्सना जंपसूट चालून जातो. हा पेहराव दिवसभर कॅरी करता येईल. दिवसभर शॉपिंग केल्यानंतर रात्री डिनरचा कार्यक्रम असेल तरी तुम्ही जंपसूट घालू शकता.

✽ तुम्ही क्रॉप टॉपही वेगवेगळ्या पद्धतीने ट्राय करू शकता. या टॉपवर डेनिम जॅकेट किंवा श्रग घालता येईल. क्रॉप टॉपमध्ये तुम्ही मस्त ट्रेंडी दिसाल.

## पंचांग

**शनिवार, ९ मे २०२६**
पराभवनाम संवत्सर शके १९४८,
वैशाख कृ. ७, चंद्रराशी : मकर,
नक्षत्र : श्रवण, योग : शुक्ल,
सूर्योदय ६.०९, सूर्यास्त ७.०२

## फॉरवर्ड्स

**हर बुलंदी क़े नीचे क़ुछ टूटे हुयें किस्से हैं...**

**हम ऊपर खड़े हैं नीचे दबे हुयें हमारें हिस्से हैं...!**

## भविष्यवेध — स्वप्न नव्हे, सत्य

येत्या काळाचा वेध घेणे अत्यंत गरजेचे आहे, कारण येऊ घातलेल्या बदलांमुळे आपल्या आयुष्यात मोठे बदल होऊ घातलेले आहेत. जसे की, भैष्यात कृत्रिम प्रज्ञा वेगाने सुधारत जाईल. त्यामुळे वैद्यकीय उपकरणे अधिक शहाणी होऊन तपासणी सोपी होईल. बहुतांश शिक्षण संगणकावर होईल, तसेच शेती विज्ञानात प्रचंड प्रगती होईल. ✽ जुनी खूप गाजलेली कादंबरी फ्यूचर शॉक विसरा कारण चौथी औद्योगिक क्रांती येत आहे. यात कृत्रिम प्रज्ञा, यंत्र मानवी उद्योग, छपाई, सौर विद्युत, वीजेवर चालणारी विमाने, दूर पल्ल्याच्या बसऐवजी वीजेवरचे ड्रोन्स आदी बघायला मिळतील. वीज फुकट झाल्यामुळे प्लास्टीक नष्ट करता येणार असून कदाचित प्लास्टीकचे रूपांतर करण्याचे तंत्रज्ञानही विकसित होईल. ✽ २०४० पर्यंत विजेवरची वाहने सर्वसामान्य होतील. त्यातून प्रवास हा मुक्त आणि अल्पदरात असेल. त्यामुळे खाजगी वाहने असणारच नाहीत. सहाजिकच प्रदूषण नाही. ✽ सर्व वाहने विजेवरची असल्यामुळे शहरे तसेच ग्रामीण भागात पर्यावरण स्वच्छ असेल. स्वच्छ हवा, स्वच्छ पाणी असेल. शारीरिक तंदुरुस्तीसाठी सायकलींचा वापर वाढेल. मोठ्या प्रमाणात असणार.



## खेचाखेची — संधी सोडू नका

विनाकारण लोकांना त्रास देत जाऊ नका.
.
.
.
आणि

कारण मिळालं तर...
.
.
.
संधी सोडू नका.


## वेगळं काही

इटलीतल्या सिलसिली या बेटावरच्या पालेर्मो कॅपुचिन संग्रहालयात ममी आणि मृतदेहांचा संग्रह करण्यात आला आहे. इथे आठ हजार मृतदेह आणि १२५२ ममी आहेत. सोळाव्या शतकात ख्रिस्ती भिक्षूकांनी या परिसरात मृतदेह पुरण्याचं तसंच ममी तयार करण्याचं काम सुरू केलं होतं. त्याचं रूपांतर संग्रहालयात करण्यात आलं. या मृतदेहांना ममीच्या माध्यमातून सुरक्षित ठेवण्यात आलं. १९२० पासून या भागात मृतदेह पुरण्याचं काम बंद करण्यात आलं आणि संग्रहालयाच्या निर्मितीला वेग आला. या विचित्र संग्रहालयाच्या व्यवस्थापनाची जबाबदारी ख्रिस्ती भिक्षुकांकडेच आहे. यातल्या काही ममी पूर्ण अवस्थेत आहेत तर काहींची अवस्था बिकट झाली आहे.

## संगोपन — गॅजेट्सचा अतिवापर टाळा

शाळा सुरू असताना मुलं अभ्यास आणि अन्य उपक्रमांमध्ये अडकलेली असतात. मात्र सुट्टीच्या दिवसात ती वेगवेगळ्या गॅझेट्सच्या जाळ्यात अडकलेली दिसतात. ही बाब धोकादायक ठरु शकते. म्हणूनच त्यांना या मोहजालापासून दूर ठेवण्याचे उपाय शोधायला हवेत.

✽ मुलं आई-वडिलांचं अनुकरण करत असतात. त्यामुळे पालकांनी मुलांसमोर गॅजेट्स वापरणं टाळावं अथवा वापर कमी करावा. ✽ मुलांचं वय दहा वर्षांच्या आतील असेल तर त्यांना गॅजेट्स गिफ्ट करणं टाळावं. ✽ मुलांना चांगल्या सवयी लागाव्यात. यासाठी घरात नियमांचं पालन करण्याचा प्रयत्न करावा. याचप्रमाणे प्रत्येकाने घरात 'नो डिव्हाईस टाईम' पाळणं महत्त्वाचं आहे. या वेळी घरातील प्रत्येकाने डिव्हाईसेस लांब ठेवून गप्पा, खेळ यासाठी वेळ द्यावा. ✽ मुलं घरात बसून बराच काळ गेम्स खेळतात. अशा वेळी त्यांना आउटडोर खेळांसाठी प्रोत्साहन द्यावं. पालकांनी स्वत: सहभागी होऊन प्रोत्साहन दिल्यास मुलं गॅजेट्सपासून लांब राहतील यात शंका नाही.



## सुडोकू १०१


| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | २ | | ५ | ३ | | | | |
| | ५ | | २ | | १ | ९ | | ७ |
| | १ | | | | ४ | | | |
| | ६ | | | | | | | ५ |
| | | | १ | | ३ | | | |
| ७ | | | | | | | ४ | |
| | | | ४ | | | | ८ | |
| १ | | ५ | ३ | | २ | | ६ | |
| | | | | ८ | ५ | | ९ | १ |

टीप -
✽ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्न ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
✽ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
✽ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू १००चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | ३ | २ | १ | ६ | ४ | ५ | ९ | ७ |
| ७ | ९ | ५ | २ | ८ | ३ | ६ | ४ | १ |
| १ | ४ | ६ | ७ | ९ | ५ | २ | ३ | ८ |
| ९ | २ | ३ | ८ | ४ | ७ | १ | ६ | ५ |
| ६ | ७ | १ | ९ | ५ | २ | ३ | ८ | ४ |
| ४ | ५ | ८ | ६ | ३ | १ | ९ | ७ | २ |
| ३ | ६ | ७ | ५ | २ | ८ | ४ | १ | ९ |
| ५ | ८ | ४ | ३ | १ | ९ | ७ | २ | ६ |
| २ | १ | ९ | ४ | ७ | ६ | ८ | ५ | ३ |

## शब्दकोडे क्रमांक १०१



**आडवे शब्द :-**
१) कसरत
४) कमळ
७) आवाजांचा गोंधळ
९) दुसऱ्याची काळजी करणारा. हित पाहणारा
११) घराण्याची अब्रू घालविणारा
१३) मांडणी
१५) वृक्ष.
१६) राष्ट्र.
१७) लट
१८)कठोर,पांढुरका रंग
२०) पंख
२२) एक उपदिशा
२४) दावानल
२५) उद्यान
२६) अर्धा शेर
२८) पदार्थ झाकून ठेवण्याचे पात्र
३०) भांडणे लावणारा
३२) पैंजण
३६) गवंडी
३८) तपस्वी
४०) चिंतन
४१)गाढव
४२) गणपतीचे एक नाव
४३) विनंती, आर्जव
४५) गळा
४७) मोठेपणा दाखविण्यासाठी बरोबर आलेली माणसे
४९) लोचन
५१) सप्तस्वरातील पहिला स्वर
५२) चेहऱ्यावरील तेज
५४) औषध
५५) अरण्यात राहण्याची शिक्षा
५७) गजवदन
६०) गोल-गोल फिरणारे मोठे वादल
६१) सिद्ध
६२) लक्ष्मीचे एक नाव
६३) विश्व,दुनिया
६५) चक्र
६६) दरी
६७) हिंदुस्थान
६८) उगीच,नाहक
७२) त्वचेचा पापुद्रा
७४) जास्वंद
७५) आरडाओरड,गडबड
७७) किंमत
७८) शिक्षक
८०) चर्चा,खल
८३) पाणी
८४) बोलणारा,स्वत:
८५) नदीवरील बांध
८४) काम, नशीब.

**उभे शब्द :-**
१) ढोबळ नफा-तोटा पत्रक
२) वर्षाचा बारावा भाग
३) काळजीत असलेला
४) चिखल
५) पाण्याच्या साठ्याची जागा
६) फुलांचा राजा
७) मणका
८)एक छोटे शस्त्र
१०) मोठा डेरेदार वृक्ष
१२) बडबड
१४) खंदक
१६) मंदिर
१८) दरवाजा
१९) मच्छर
२१) भला
२३) दु:ख
२५) लांबचा संबंध
२७) शोध
२९) व्यंजनापासून बारा स्वरांची अक्षर मालिका
३१) वेल
३३) छोटा
३४) रम्य
३५) जन्म
३७) सोन्याचा धागा
३९) उद्याच्या नंतरचा दिवस
४२) भ्रमण
४३) हवाई अड्डा
४४) जंगलातील रस्ता
४६) दंत
४७) मध्यस्थ
४८) एक बारीक धान्य
५०) पोलिस,शेरीफ
५३) मागणारा
५४) रुग्णालय
५६) व्यर्थ
५८) दिल्लीतील प्रसिद्ध मशीद
५९) दृष्टी
६४)गेलेला काळ,भूतकाळ
६५)चाकरी करणारा
६६)मोठा हातोडा
६७) स्तुती करणारा
६८) तुमान,पायजमा
६९) स्वयंप्रकाशित किडा
७०) धपाटा
७१) सैल
७२) वर्ष, सन
७३) घागरा
७५) जाड मोठा अंगरखा
७६) सहस्त्र
७७) गणपतीला आवडणारा एक पदार्थ
७९) स्थर,दर्जा
८१) चुना मळण्याची जागा

(उत्तर उद्याच्या अंकात)

## कालच्या शब्दकोड्याचे उत्तर



# कलासक्त

## नात्यांच्या मायेचा ओलावा




'आमच्या पिढीची गोष्टच वेगळी' ही तीन पिढ्यांमधील नात्यांच्या आठवणींवर आधारित असलेली कथा नाटकाच्या रूपाने मराठी रंगभूमीवर लवकरच येत आहे. बदलत्या ऋतूंनुसार झाडाची पाने गळली तरी मूळ मात्र मातीशी घट्ट असते, तसेच काळाच्या प्रवाहात पिढ्या बदलल्या तरी रक्ताच्या नात्यांमधील मायेचा ओलावा कधीच आटत नाही. सोनल प्रॉडक्शन्स आणि नंदू कदम यांची निर्मिती असलेले हे नाटक म्हणजे आधुनिक काळातील नात्यांचे एक देखणे रूप आहे. अद्वैत दादरकर यांच्या कल्पक दिग्दर्शनातून आणि अमोल पाटील यांच्या लेखणीतून गणपुले कुटुंबाची ही हृदयस्पर्शी कहाणी साकारली आहे. यात सुनील बर्वे, हर्षदा खानविलकर, शर्मिला शिंदे आणि अक्षर कोठारी यांसारख्या कसलेल्या कलाकारांचा अभिनय म्हणजे रसिक प्रेक्षकांसाठी एक सात्विक मेजवानीच ठरेल. १९७० च्या दशकातील साधेपणा, ९० च्या दशकातील संक्रमण आणि आजच्या जेन झीचा वेगवान प्रवास असा एक अद्भूत समन्वय या नाटकात गुंफला आहे. तंत्रज्ञानाच्या आभासी जगात हरवत चाललेला नात्यांचा ओलावा सोशल मीडियाच्या माध्यमातून कसा जपता येतो, याचे चित्रण यात पाहायला मिळते. एका पिढीने पाहिलेले स्वप्न हेच दुसऱ्या पिढीसाठी मुक्त आकाशात भरारी घेण्याचे स्वातंत्र्य ठरते, हा उदात्त विचार हे नाटक मांडते.

## मातीशी नाते जपणारा बाप्प्या



मराठी रुपेरी पडद्यावर ग्रामीण मातीचा सुवास आणि नात्यांमधील ओलावा घेऊन 'बाप्प्या' हा नवा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. कोकणच्या मातीतील सुगंध आणि मानवी मनातील गुंतागुंतीचे भावविश्व उलगडणारा हा चित्रपट लवकरच रुपेरी पडद्यावर दाखल होत आहे. सामाजिक चौकटींना छेद देणारा एक धाडसी आणि संवेदनशील विषय घेऊन हा चित्रपट १५ मे २०२६ रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. मुक्तल तेलंग आणि विक्रांत काटकर यांची निर्मिती असलेल्या चित्रपटाचे दिग्दर्शन समीर तिवारी यांनी केले असून, अभिजीत चंद्रकला यांनी संगीत दिले आहे तर राव नंदकिशोर यांनी छायांकनाची धुरा सांभाळली आहे. कोकणातील एका सामान्य कुटुंबाची पार्श्वभूमी असलेल्या या कथानकात लिंगबदल आणि त्यानंतर समाजात व कुटुंबात निर्माण होणारा संघर्ष अतिशय प्रभावीपणे मांडला आहे. विशेष म्हणजे पुणे इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल २०२६ च्या मराठी स्पर्धा विभागात अधिकृत निवड होऊन या चित्रपटाने मोहोर उमटवली आहे. नुकत्याच प्रदर्शित झालेल्या ट्रेलरमुळे राजश्री देशपांडे आणि गिरीश कुलकर्णी यांच्यातील अभिनयाची जुगलबंदी पाहण्यासाठी प्रेक्षकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे.

## नात्यांमधील रेशमी बंध

रुपेरी पडद्यावर लवकरच 'दादी की शादी' हा नात्यांचा निखळ आनंद आणि हास्याची कारंजी उडवणारा एक कौटुंबिक सोहळा अनुभवायला मिळणार आहे. नात्यांमधील रेशमी बंध विनोदाच्या रंगात न्हाऊन निघतात, तेव्हा अशी एक कलाकृती आकाराला येते. ८ मे २०२६ रोजी चंदेरी पडद्यावर दाखल होणारा हा हिंदी चित्रपट म्हणजे केवळ एक कथा नसून, भावना आणि हास्याचा एक पर्वणी आहे. श्रद्धा अग्रवाल, अक्षत लाहोरिया आणि बीइंग यू स्टुडिओजची निर्मिती असलेल्या या चित्रपटाची धुरा दिग्दर्शक आशिष आर. मोहन यांनी सांभाळली असून कौटुंबिक जिव्हाळ्याला आधुनिकतेची जोड दिली आहे. या चित्रपटाचे मुख्य आकर्षण म्हणजे एका अतरंगी आणि उत्साही आजीची व्यक्तिरेखा, जी ज्येष्ठ अभिनेत्री नीतू सिंह कपूर यांनी साकारली आहे. ही आजी आपल्या विवाहाची घोषणा फेसबुकवरून करते, तेव्हा संपूर्ण कुटुंबात विचारांचे जणू काहूर माजते. याच गोंधळातून आणि दोन पिढ्यांमधील वैचारिक संघर्षातून विनोदाची कारंजी फ ुलत जातात. या चित्रपटाद्वारे रिद्धिमा कपूर साहनी बॉलिवूडमध्ये पाऊल टाकत असून तिच्यासोबत कपिल शर्माचा अफलातून विनोद, दाक्षिणात्य दिग्गज आर. सरथकुमार यांचा दम दार वावर आणि सादिया खतीब यांचा अभिनय ही या चित्रपटाची जमेची बाजू आहे. हिमाचल प्रदेशातील धुक्यात हरवलेल्या पर्वतरांगांच्या पार्श्वभूमीवर चित्रित झालेली ही कथा सर्वांना एकाच सूत्रात बांधून ठेवणारी आहे. थोडक्यात सांगायचे तर, आशिष आर. मोहन आणि त्यांच्या टीमने विणलेला हा चित्रपट एक हास्यपर्वणी ठरेल. रौद्र रूपाचा महानायक, सनी देओलचा 'गबरू'हा चित्रपटदेखील प्रदर्शित होत आहे. शौर्याची गाथा आणि संघर्षाचा निखारा असलेल्या सनी पाजींचा अभिनय प्रेक्षकांच्या काळजाचा ठोका चुकवेल. हा चित्रपट अजेय साहस आणि संघर्षाचे एक प्रतीक ठरेल.




## सत्तेचा धगधगता संघर्ष

हिंदी मालिकेच्या रूपाने 'ॲमेझॉन एमएक्स प्लेअर'वर 'संकल्प' हा राजकारणाच्या पटावरील शह–काटशहांचा खेळ आणि सत्तेच्या संघर्षाची एक धगधगती गाथा सज्ज आहे. सस्पेन्स आणि ड्रामा शोधणाऱ्या दर्दी प्रेक्षकांसाठी ही कलाकृती म्हणजे मेजवानी ठरेल. सत्तेच्या सिंहासनासाठी डावपेच आखले जातात, तेव्हा न्यायापेक्षा रणनीतीला अधिक महत्त्व प्राप्त होते आणि सूडाचा प्रवास अंताकडे झुकतो. हाच अनुभव ही मालिका देणार आहे. सुप्रसिद्ध दिग्दर्शक प्रकाश झा यांच्या कल्पकतेतून आणि जिओ स्टुडिओजच्या सहकार्याने साकारलेली ही दिल्लीच्या राजकीय वर्तुळातील गुंतागुंत उलगडणारी ही मालिका एक जबरदस्त करमणूक म्हणून दर्शकांच्या भेटीला येत आहे. या मालिकेचे वैशिष्ट्य म्हणजे ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांनी साकारलेली कन्हैयालाल ही भूमिका. एका चाणक्यसदृश किंगमेकरच्या रूपात ते पडद्यावर आपल दरारा निर्माण करत आहेत. त्यांना संजय कपूर, नीरज कबी आणि मोहम्मद झीशान अयुब यांसारख्या कसलेल्या कलाकारांच्या अभिनयाची भक्कम साथ लाभली आहे. दिल्लीच्या रणरणत्या उन्हात आणि राजकीय वास्तूंच्या साक्षीने झालेल्या या चित्रीकरणाने सेटवर प्रत्यक्ष राजकारणाचाच भास निर्माण केला होता. चित्रीकरणा दरम्यानचा एक प्रसंग तर काळजाचा ठोका चुकवणारा ठरला. एका महत्त्वाच्या भाषणाच्या दृश्यावेळी नाना पाटेकर यांनी इतक्या आवेशात संवाद फेकले की, तिथे उपस्थित असलेल्या खऱ्या सुरक्षा रक्षकांनाही काही क्षणासाठी हे खरे आंदोलनच सुरू आहे असा भास झाला. प्रकाश झा यांची लक्षवेधी मांडणी आणि नाना पाटेकरांचा अमोघ अभिनय यामुळे ही मालिका सत्तेचा क्रूर खेळ उलगडणारी एक अविस्मरणीय मेजवानी ठरेल.



## बर्लिन : थक्क करणारे बुद्धीचातुर्य

जागतिक स्तरावरील सर्वात लोकप्रिय गुन्हेगारी डावाचा सूत्रधार पुन्हा एकदा आपल्या बुद्धिचातुर्याने जगाला थक्क करण्यासाठी सज्ज झाला आहे. १५ मे २०२६ रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणारी 'बर्लिन: सीझन २' बुद्धिचातुर्य आणि धाडसी चोऱ्यांचा एक नवा अध्याय असलेली मालिका नेटफ्लिक्सवर पुन्हा एकदा उलगडणार आहे. ही कलाकृती ॲलेक्स पिना आणि एस्थर मार्टिनेझ लोबाटो यांच्या कल्पकतेतून साकारली आहे. काळाच्या पडद्याआड गेलेल्या कथा जेव्हा पुन्हा जिवंत होतात, तेव्हा त्यामागील रहस्ये अधिकच गडद आणि रोम ांचक वाटू लागतात. अल्बर्ट पिंटो यांच्या दिग्दर्शनाखाली पेड्रो अलोन्सो पुन्हा एकदा बर्लिन या लोकप्रिय व्यक्तिरेखेला या मालिकेत आपल्या जबरदस्त अभिनयाने पडद्यावर जिवंत करणार आहेत. त्यांच्यासोबत ट्रिस्टन उलोआ, मिशेल जेनर आणि इनमा क्वेस्टा यांसारख्या कलाकारांची साथ या प्रवासाला अधिक रंगतदार बनवेल. या सीझनमध्ये बर्लिनची टोळी स्पेनमधील सेव्हिल शहरात लिओनार्दो दा विंची यांचे जगप्रसिद्ध पेंटिंग द लेडी विथ अ हर्मिन चोरण्याची एक धाडसी योजना आखत आहे. 'काही चोऱ्या केवळ संपत्तीसाठी नसून, सन्मानासाठी आणि सूडासाठी रचलेले एक सुंदर जाळे असतात' या विधानाची प्रचिती या कथानकातून येते. ही चोरी केवळ मौल्यवान कलेसाठी नसून बर्लिनला ब्लॅकमेल करणाऱ्या ड्यूक ऑफ मालागाला उत्तर देण्यासाठी रचलेला हा एक डाव आहे. सेव्हिल, माद्रिद आणि सॅन सेबॅस्टियन या शहरांच्या निसर्गरम्य आणि थरारक पार्श्वभूमीवर विणलेले हे ८ भाग सस्पेन्स आणि रोमान्सची एक अनोखी मेजवानी ठरतील. मे महिन्याच्या मध्यात प्रदर्शित होणारी ही मालिका 'मनी हाईस्ट'च्या चाहत्यांसाठी नक्कीच अविस्मरणीय ठरेल.



## थिरकते संगीत आणि गुन्हेगारी विश्व


डिजिटल पडद्यावर तरुणाईचा जोश आणि चंदीगडच्या गल्ल्यांमधील खास शैली घेऊन 'लुक्खे' ही संगीताच्या ठेक्यावर थिरकणारी तरुणाई आणि त्यामागच्या गूढ गुन्हेगारी विश्वाचे चित्र उलगडणारी धडाकेबाज वेब सिरीज रसिकांच्या भेटीला येत आहे. ॲमेझॉन प्राइम व्हिडिओच्या व्यासपीठावर प्रदर्शित होणारी ही मालिका केवळ एक कथा नसून रॅप संगीताच्या तालावर चालणारा एक थरार आहे. विपुल डी. शाह आणि राजेश बहल यांच्या निर्मितीने सजलेल्या या मालिकेला दिग्दर्शक हिमांक गौर यांनी वेगळ्याच उंचीवर नेऊन ठेवले आहे. या कलाकृतीचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे सुप्रसिद्ध रॅपर किंग याचे अभिनयातील पदार्पण. एमसी बदनाम या भूमिकेतून तो केवळ गाणार नाही, तर अभिनयाची एक वेगळी छाप पाडताना दिसेल. कथेचा नायक लकी (लक्षवीर सिंग सरन) अमली पदार्थांच्या काळ्या छायेचा नाश करण्यासाठी चंदीगडच्या रॅप विश्वात प्रवेश करतो, तेव्हा तो प्रवास सुरांचा उरून संघर्षाचा होतो. या आव्हानात्मक वाटेवर त्याला कर्तव्यदक्ष पोलीस अधिकारी गुरबानी (राशी खन्ना) आणि सनोबर (पलक तिवारी) यांची साथ लाभते.



चंदीगडच्या मातीतील जीवनशैली आणि तिथला रांगडा स्वभाव अग्रिम जोशी व देबोजीत दास पुरकायस्थ यांनी आपल्या लेखणीतून उतरवला आहे. किंगने स्वतः स्वरबद्ध केलेले रॅप म्युझिक प्रेक्षकांना शेवटपर्यंत बांधून ठेवेल.

## न्यायाचा अखेरचा अध्याय

न्यायव्यवस्थेच्या चौकटीबाहेर जाऊन गुन्हेगारीचा नायनाट करणाऱ्या एका अजेय योद्ध्याचा अखेरचा अध्याय आता सुरू होत आहे. मार्व्हल विश्वातील सर्वात आक्रमक आणि करारी व्यक्तिमत्व असलेल्या 'जिओ हॉटस्टार'वर प्रदर्शित होत असलेल्या 'द पनिशर' या न्याय मिळवण्याचा थरार अनुभवायला लावणाऱ्या सीरिजचा उत्कंठावर्धक प्रवास आता एका निर्णायक वळणावर येऊन ठेपला आहे. ही विशेष कलाकृती म्हणजे फ्रँक कॅसलच्या आयुष्यातील वादळापूर्वीची एक शांतता आणि त्यानंतर उफाळलेला संघर्षाचा वणवा आहे. जिओ हॉटस्टारच्या चंदेरी पडद्यावर दाखल होणारी ही मालिका रेनाल्डो मार्कस ग्रीन यांनी दिग्दर्शित केली असून, मुख्य अभिनेता जॉन बर्नथल याने स्वतः या कथेचे सह–लेखन केल्यामुळे या पात्रातील जिवंतपणा आणि वेदना अधिक गडदपणे प्रेक्षकांपर्यंत पोहोचणार आहेत. कथानकाचा हा प्रवास अशा एका बिंदूवर उभा आहे, जिथे फ्रँक हिंसाचाराच्या सावलीतून बाहेर पडण्याचा प्रयत्न करत असतो, मात्र नशिबाच्या क्रूर फेऱ्यामुळे त्याला पुन्हा एकदा शस्त्रांशी नाते जोडावे लागते. जुन्या शत्रूंची टोळी जेव्हा त्याच्या अस्तित्वाला आव्हान देते, तेव्हा न्यायाची व्याख्या रक्ताक्षरांनी लिहिली जाते. वेलकम बॅक, फ्रँक या कॉमिक्सच्या पानातून उमललेली ही कथा जेसन आर. मूर आणि चेल्सी बिया यांच्या समर्थ अभिनयाने सजली आहे. हे जरी फ्रँकचे अंतिम ध्येय मानले जात असले, तरी भविष्यातील नव्या प्रवासाची चाहूल यातून मिळते. सूड आणि समर्पणाची ही गाथा मे महिन्याच्या रणरणत्या उन्हात चाहत्यांच्या मनाला एक रोमांचक उभारी देणारी ठरेल.



## वेग आणि झंझावाताचा थरार

'कट्टलन'च्या रूपाने दाक्षिणात्य सिनेसृष्टीतील अंगावर काटा आणणारा वेग आणि थरार यांचे दर्शन घडवणारा दाक्षिणात्य सिनेसृष्टीचा झंझावात आता हिंदी पडद्यावर एका नव्या वादळासह धडकण्यासाठी सज्ज झाला आहे. हिंदीसह पाच भाषांत डब होणारा हा तेलगू चित्रपट नव्या रूपाने एक नवे क्षितिज ओलांडण्यास सज्ज झाला आहे. ही केवळ एक मनोरंजक कलाकृती नसून, जागतिक तस्करीच्या गडद विश्वात विणलेला एक धगधगता संघर्ष आहे. चंदेरी पडद्यावर दाखल होणारा हा भव्य चित्रपट, दिग्दर्शक पॉल जॉर्ज यांच्या कल्पकतेतून आणि शरीफ मोहम्मद यांच्या निर्मितीतून साकारला आहे. मल्याळम चित्रपटसृष्टीतील अष्टपैलू अभिनेता अँटोनी वर्गीस पेपे यांचा रॉ अवतार या चित्रपटाचे प्रमुख आकर्षण ठरणार आहे. या चित्रपटाची भव्यता केवळ त्याच्या कथानकात नसून, त्यातील दिग्गज कलाकारांच्या मांदियाळीतही साम ावली आहे. पुष्पा फ ेम सुनील, दुशारा विजयन, कबीर दुहान सिंग आणि पार्थ तिवारी यांच्या उपस्थितीने या चित्रपटाला एक वेगळीच उंची लाभली आहे. 'केजीएफ' आणि 'सालार'सारख्या महाकाय चित्रपटांना आपल्या सुरांनी सजवणारे रवी बसरूर यांचे पार्श्वसंगीत, या कथेतील थरार अधिकच तीव्र करेल. थायलंडच्या निसर्गरम्य पण धोकादायक पार्श्वभूमीवर जागतिक कीर्तीचे ॲक्शन दिग्दर्शक केचा खम्फाकडी यांनी चित्रीत केलेली थरारक दृश्ये प्रेक्षकांचे श्वास रोखून धरतील. हस्तिदंत तस्करी आणि सत्तेच्या संघर्षावर आधारित ही कथा पॉल जॉर्ज, जोबी वर्गीस आणि जेरो जॅकब यांनी शब्दांकित केली असून, प्रसिद्ध लेखक उन्नी आर. यांचे धारदार संवाद चित्रपटाला लाभले आहेत. मल्याळमसह हिंदी, तमिळ, तेलगू आणि कन्नड अशा पाच भाषांमध्ये प्रदर्शित होणारा हा चित्रपट, प्रादेशिक सीमा ओलांडून रसिक प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवण्यासाठी सज्ज झाला आहे.





# बालांगण

## औषध कसे काम करते?

आपण आजारी पडलो किंवा शरीरात कुठे दुखायला लागले की आपण औषध घेतो. आपल्या शरीरात कोट्यावधी पेशी असतात. कधी कधी त्यात जंतू शिरतात तेव्हा आपले शरीर त्यांच्यावर हल्ला करते. त्यांच्याशी लढते. ताप येणे,



सूज येणे, वेदना होणे हे त्या लढाईचेच लक्षण असते.

प्रत्येक औषध वेगवेगळ्या प्रकारे काम करते. उदाहरणार्थ, पेनकिलर आपल्या मेंदूकडे जाणारे दुखण्याचे सिग्नल कमी करतात. अँटिबायोटिक औषधे जीवाणूंवर हल्ला करतात. त्यामुळे संसर्ग कमी होतो. पण ही औषधे फक्त जीवाणूंवर काम करतात. विषाणूंवर नाही. काही औषधे सूज कमी करून वेदना कमी करतात आणि जखम भरून येण्यास मदत करतात.

**रंजक विज्ञान**

औषध शरीरात गेल्यावर ते रक्तातून फिरते आणि ज्या ठिकाणी समस्या आहे तिथे पोहोचते. तेथे जाऊन ते आपल्या पेशींना मदत करते किंवा जंतूंशी लढते. औषध योग्य प्रमाणात आणि डॉक्टरांच्या सल्ल्यानेच घ्यावे.

परंतु काही औषधांमुळे रिॲक्शन येते. म्हणजे ते औषध घेतले की शरीरावर त्याचा काही वेगळा परिणाम होऊ शकतो. कारण औषध फक्त आजारावरच नाही, तर शरीरातील इतर भागांवरही थोडा परिणाम करू शकते. कधी कधी शरीर त्या औषधाला परकी गोष्ट समजून प्रतिक्रिया देते. प्रत्येक माणसाचे शरीर वेगळे असते, त्यामुळे काहींना ते औषध सूट होते. तर काही जणांना त्यापासून पुरळ, खाज, सूज यासारखी अलर्जी होऊ शकते. किंवा कधी कधी चक्कर येणे, पोट बिघडणे असे त्रास होऊ शकतात. म्हणूनच औषधे योग्य प्रमाणात आणि डॉक्टरांच्या सल्ल्याने घ्यावी आणि काही परिणाम जाणवल्यास लगेच डॉक्टरांना त्याविषयी सांगणे आवश्यक आहे.

## डोकं का दुखतं?



डोकं दुखायला लागलं की आपल्याला काहीही सुचत नाही. अभ्यासात लक्ष लागत नाही. तुम्हीही हा अनुभव घेतला असेल. मोठ्या माणसांप्रमाणे लहान मुलांचंही डोकं दुखतं. डोकं दुखतं म्हणजे नेमकं काय होतं हे समजून घेऊया.

डोकेदुखी म्हणजे मेंदूमध्ये होणाऱ्या वेदना नाहीत. शरीराच्या इतर भागांमध्ये वेदना होत असल्याचा संदेश मेंदू देतो. पण स्वत:च्या वेदना त्याला जाणवत नाहीत. डोक्याभोवतीचे स्नायू, रक्तवाहिन्या, नसा दुखू लागल्या की डोक्याजवळ वेदना जाणवतात. डोक्यालगतच्या नसा किंवा रक्तवाहिन्या सुजतात. यामुळेही वेदना जाणवतात. नसा आणि रक्तवाहिन्यांमध्ये काठिण्य निर्माण होतं किंवा त्यात इतर काही बदल होतात. यामुळे आसपासच्या नसांवर दाब येतो. या नसांच्या माध्यमातून मेंदूला वेदनेचा संदेश पाठवला जातो आणि आपल्याला डोकेदुखीची जाणीव होते.

**हेल्थ वेल्थ**

डोकेदुखीचे वेगवेगळे प्रकार आहेत. ताणतणाव किंवा स्नायूंच्या एकत्रीकरणामुळे होणारी डोकेदुखी हा प्रकार सर्वसाधारणपणे आढळतो. मायग्रेन किंवा अर्धशिशीमध्ये डोकं प्रचंड प्रमाणात दुखतं. हा त्रास वरचेवर जाणवत नाही. सर्दी-खोकला किंवा इतर काही कारणांमुळे डोकं दुखू लागतं. आजार पळाला की डोकेदुखी थांबते. रात्रीचं जागरण, वेळेवर न जेवणं, जास्त वेळ टिव्ही बघणं, मोबाईलवर खेळणं, जास्त वेळ उन्हात राहिल्यामुळेही डोकं दुखू शकतं. परीक्षेचा ताण किंवा एखाद्या गोष्टीची अधिक उत्सुकता असेल तर डोकं दुखू शकतं. त्यामुळे डोकं दुखण्यामागचं नेमकं कारण जाणून घ्या आणि त्यानुसार उपचार करा.

## स्टार्टअपचा विचार करताय?

सध्या स्टार्ट अप्सचा जमाना आहे. पदवी पूर्ण केल्यानंतर नोकरीचा थोडा अनुभव घेऊन अनेकजण स्वत:ची कंपनी सुरू करतात. याला स्टार्ट अप असं म्हटलं जातं. वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये ही स्टार्ट अप्स काम करतात. कमी भांडवल असलं तरी स्टार्ट अप्स सुरू करता येतात. कमी पैशात कोणती स्टार्ट अप्स सुरू करता येतील याविषयीची ही माहिती.

*

छायाचित्रणाच्या क्षेत्रात अनेक संधी आहेत. इव्हेंट फोटोग्राफर म्हणून तुम्ही नाव कमावू शकता. फोटोग्राफीचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर दर्जेदार कॅमेरा घेऊन करीअरला सुरूवात करता येईल. यासाठी फारशा भांडवलाची गरज नसते. पुरेसा अनुभव मिळाला की स्वत:ची फोटोग्राफी प्रशिक्षण संस्थाही सुरू करता येते.

**कोण बनणार?**

* भारतात चारचाकी वाहनांची बाजारपेठ विस्तारत आहे. तुम्हीही नव्या गाड्यांच्या विक्रीचा व्यवसाय सुरू करू शकता. तसंच सेकंडहँड गाड्यांची विक्रीही करता येईल.

*

देशभरात वाहनांच्या संख्येत प्रचंड वाढ होते आहे. त्यामुळे वाहन चालवण्याचे धडे देण्यासाठी प्रशिक्षकांची गरज असते. ड्रायव्हिंग स्कूलच्या माध्यमातून वाहन चालवण्याचं प्रशिक्षण दिलं जातं. हा व्यवसायही चांगला नफा मिळवून देतो.

* ब्युटी पार्लर किंवा स्पाविषयक अभ्यासक्रम पूर्ण करून स्वत:चं पार्लर किंवा स्पा सुरू करता येईल. या व्यवसायात अनेक संधी आहेत.



## जगातील सर्वात खोल खड्डा

कोला सुपरडीप बोअरहोल हा पृथ्वीवर माणसाने खणलेला जगातील सर्वात खोल खड्डा आहे. हा रशियामध्ये कोला द्वीपकल्पावर वैज्ञानिक संशोधनासाठी खोदण्यात आला होता. पृथ्वीच्या आत काय आहे, खडकांची रचना कशी आहे आणि जमिनीखालील तापमान किती असते, हे समजून घेण्यासाठी हा प्रकल्प सुरू झाला. हा खड्डा सुमारे १२.२ किलोमीटर खोल आहे. इतका खोल असूनही तो फार रुंद नाही, फक्त काही इंच व्यासाचा आहे. म्हणजे तो मोठ्या विहिरीसारखा दिसत नाही, तर खूप खोल आणि अरुंद आहे. वैज्ञानिकांना इतक्या खोलीवर अपेक्षेपेक्षा जास्त तापमान मिळाले, सुमारे१८० अंश सेल्सिअस. त्यामुळे पुढे खोदकाम थांबवावे लागले.

हा खड्डा आपल्याला दाखवतो की पृथ्वीच्या आत जाणे किती कठीण आहे. आपण चंद्रावर पोचलो. पण पृथ्वीच्या आत मात्र आपल्याला अगदी थोडे अंतर जाता आले.



## 'स्नो-सी' करेल मोबाईल चार्ज

घराबाहेर असल्यावर मोबाईल चार्ज करणं ही फार मोठी समस्या होऊन बसते. पॉवर बँकचा पर्याय आपल्याकडे असतो. पण ते सुद्धा वेळेवर चार्ज करावं लागतं. म्हणूनच एका कंपनीने स्मार्ट जॅकेट तयार केलं आहे. हे जॅकेट अवघ्या ४० मिनिटांमध्ये मोबाईल चार्ज करेल. ते सुद्धा कोणत्याही वायरशिवाय. सॉल्ट लेक सिटीमधल्या 'द वेब्ज' नावाच्या कंपनीने हे जॅकेट तयार केलं आहे.




'स्नो-सी' असं या जॅकेटचं नाव आहे. यात ३००० एमएएच क्षमतेची बॅटरी बसवण्यात आली आहे. वायरलेस चार्जिंगची सोय असलेले फोन्स या जॅकेटच्या मदतीने चार्ज होतील. पाऊस आणि थंडीतही हे जॅकेट वापरता येतं.

**स्मार्ट गॅजेट**

या जॅकेटचं काम कसं चालतं हे आपण पाहु या. यात फाईव्ह व्ही ३००० एमएएच अल्ट्रा थीन ही अत्यंत हलकी पॉवर बँक बसवण्यात आली आहे. पॉवर बँक चार्जरला जोडून जॅकेट चार्ज करता येतं. ही पॉवर बँक जॅकेटच्या अगदी खालच्या बाजूला बसवण्यात आली आहे. त्यामुळे याचा कोणताही त्रास होत नाही. हे जॅकेट घालून तुम्ही चालू शकता, बसू शकता, फिरू शकता. हे जॅकेट लवरकच बाजारात उपलब्ध होणार आहे. काळ्या आणि चंदेरी अशा दोन रंगांमध्ये ते उपलब्ध असेल. २४९ डॉलर्स म्हणजे जवळपास १५,८०० रूपये एवढी याची किंमत आहे. त्यामुळे हे जॅकेट घातलं की मोबाईल फोन चार्ज कसा आणि कुठे करायचा याचं कोणतंही टेन्शन तुम्हाला येणार नाही. ते विकत घेण्यासाठी पैशांचं टेन्शन मात्र येईल!

## जांभईचं गुपित!

जांभया द्यायला लागल्यावर झोप आली आहे असं सगळ्यांना वाटू लागतं. या जांभया नेमक्या का येतात? कंटाळा आल्यावरच जांभया यायला सुरूवात होते का? फुफ्फुसातला ऑक्सिजनचा प्रवाह वाढवण्यासाठी जांभई गरजेची आहे, असं अगदी आत्तापर्यंत शास्त्रज्ञांना वाटत असे. जांभईमुळे रक्तप्रवाह आणि हृदयाची धडधड वाढत असल्याने हे म्हणजे शरीर ताणल्यासारखंच आहे असं काही शास्त्रज्ञांचं म्हणणं होतं. ही दोन्ही संशोधनं खरी असली तरी जांभईमुळे तुम्ही ताजेतवाने होता, असं नुकतंच झालेलं एक संशोधन सांगतं. एका मोठ्या घटनेआधी आपण जांभई देतो. मोठ्या सामन्याआधी क्रीडापटूला जांभई येते. विमानाच्या उड्डाणाआधी पालयट जांभई देतो. तर तुम्ही मुलं परीक्षेआधी जांभई देता.



माणसांनाच नाही तर जनावरांनाही जांभई येते. खाण्याआधी काही प्राणी जांभई देतात तर जंगली प्राणी भांडण्याआधी जांभई देतात. गंमत म्हणजे एकाने जांभई दिल्यावर दुसऱ्यालाही जांभई येते. तुम्हीही बरेचदा हे अनुभवलं असेल. जांभईमुळे आपला मेंदू बदलासाठी तयार होतो, असं नव्या संशोधनांमधून समोर आलं आहे. जांभई म्हणजे कंटाळा या संकल्पनेच्या हे अगदी उलट आहे. आईच्या पोटात असलेलं बाळही आपली शारीरिक स्थिती बदलण्याआधी जांभई देतं. हजारो, लाखो वर्षांपूर्वी लोक शेकोटी पेटवून एकत्र बसत असत. त्यावेळी मुख्य व्यक्तीने जांभई दिल्यावर इतर लोकही मान म्हणून जांभई देत असत, असाही एक विचार आहे. जांभई या संकल्पनेभोवती अनेक गोष्टी फिरत असल्या तरी झोपण्याआधी जांभई का येते यामागचं गुपित उजूनही उघड झालेलं नाही.

**नॉलेज अपडेट**

## सिएरा नेवाडा

सिएरा नेवाडा ही उत्तर अमेरिकेतील एक महत्त्वाची आणि सुंदर पर्वतरांग आहे. ही मुख्यतः अमेरिकेतील कॅलिफोर्निया राज्यात पसरलेली असून काही भाग नेवाडा राज्यात जातो. सिएरा नेवाडा या नावाचा अर्थ हिमाच्छादित पर्वतरांग असा होतो. या रांगेतील उंच शिखरांवर वर्षभर बर्फ दिसतो म्हणून या पर्वतरांगेचे नाव सिएरा नेवाडा पडले असावे.

ही पर्वतरांग साधारणपणे ६०० किलोमीटर लांब आहे. या रांगेतील सर्वात उंच शिखर म्हणजे माउंट व्हिटनी आहे. याची उंची सुमारे ४४२१ मीटर आहे. हे अमेरिकेतील सर्वात उंच शिखरांपैकी एक मानले जाते. या पर्वतरांगेत खोल दऱ्या, उंच कडे आणि सुंदर धबधबे आढळतात. विशेष म्हणजे येथे असलेली काही दऱ्या हिमनद्यांनी तयार झालेल्या आहेत.

**गोष्टी पर्वतरांगांच्या**

सिएरा नेवाडा पर्वतरांग प्रामुख्याने पृथ्वीतील हालचालींमुळे आणि नंतर झालेल्या झीज प्रक्रियेमुळे तयार झाली. लाखो वर्षांपूर्वी पृथ्वीच्या पृष्ठभागातील भाग वर उचलला गेला आणि नंतर पाणी, वारा आणि बर्फ यांच्या परिणामाने त्याला आजचा आकार मिळाला. त्यामुळे येथे अनेक ठिकाणी कठीण खडक आणि उंच कडे दिसतात.या भागात विविध प्रकारची झाडे आणि वनस्पती आढळतात. खालील भागात पाइन, ओक आणि देवदार यांसारखी झाडे दिसतात. उंच भागात विशाल आकाराची सेक्वोया झाडे आढळतात, जी जगातील सर्वात मोठ्या झाडांपैकी आहेत. या जंगलांमुळे हा प्रदेश खूप हिरवा आणि आकर्षक दिसतो. प्राण्यांमध्ये काळे अस्वल, हरिण, कोल्हे आणि विविध पक्षी येथे आढळतात. काही दुर्मिळ प्रजातींचेही संरक्षण येथे केले जाते. त्यामुळे हा भाग जैवविविधतेसाठी महत्त्वाचा आहे.



येथे कोणतीही आदिवासी वस्ती मोठ्या प्रमाणात आता नाही. मात्र पूर्वी अनेक स्थानिक जमाती येथे राहत होत्या. त्यांनी निसर्गाशी जुळवून घेतलेले जीवन जगले.

पर्यटनाच्या दृष्टीने ही पर्वतरांग खूप प्रसिद्ध आहे. गिर्यारोहण, पायी भटकंती, बर्फातील खेळ आणि निसर्गदर्शन यासाठी लोक येथे येतात. काही प्रसिद्ध राष्ट्रीय उद्यानेही या भागात आहेत.

सिएरा नेवाडा पर्वतरांगेत पर्यटकांसाठी हॉटेल्स, लॉज आणि कॅम्पिंगची सोय आहे. काही ठिकाणी रोपवे म्हणजे केबलकारच्या सुविधा आहेत रोपवेने पर्यटकांना साधारण ३००० मीटरच्या आसपास उंचीवर नेले जाते. हे रोपवे प्रामुख्याने स्कीईंग, बर्फात खेळ आणि सुंदर दृश्य पाहण्यासाठी वापरले जातात. या उंचीवरून संपूर्ण पर्वतरांग, तलाव आणि बर्फाच्छादित परिसर खूप सुंदर दिसतो.

## गंजरोधक क्रोमियम

क्रोमियम या खनिज धातूचा रंग चंदेरी करडा असतो. तो खूप चमकदार आणि कडक असतो. क्रोमियम प्रामुख्याने क्रोमाइट नावाच्या खनिजामध्ये आढळतो. हे खनिज काळसर किंवा तपकिरी दगडासारखे दिसते आणि त्यातून क्रोमियम मिळवले जाते.

हे खनिज मुख्यतः ज्वालामुखीमधून तयार झालेल्या खडकांमध्ये आढळते. पृथ्वीच्या आत असलेला गरम द्रवरूप पदार्थ थंड होताना त्यातून वेगवेगळी खनिजे तयार होतात. त्या प्रक्रियेतच क्रोमाइटही तयार होते. त्यात क्रोमियम साठून राहते. त्यामुळे क्रोमियम हे पूर्णपणे नैसर्गिक भूगर्भीय प्रक्रियेमुळे तयार झालेले खनिज आहे. दक्षिण आफ्रिका, कझाकस्तान, भारत आणि तुर्की या देशांत क्रोमियम मोठ्या प्रमाणात सापडते. भारतात ओडिशा, कर्नाटक आणि महाराष्ट्र या राज्यांत क्रोमाइटच्या खाणी आहेत. खाणीतून हे खनिज मोठ्या दगडांच्या स्वरूपात काढले जाते.



क्रोमियम मिळवण्यासाठी खडकांचे तुकडे करून त्यावर प्रक्रिया केली जाते. ही प्रक्रिया कारखान्यांमध्ये केली जाते आणि त्यासाठी विशेष साधने लागतात. क्रोमियमचा सर्वात मोठा उपयोग स्टील अधिक मजबूत आणि गंजरोधक बनवण्यासाठी होतो. म्हणूनच स्वयंपाकघरातील भांडी, सुरी, चमचे आणि विविध यंत्रांचे भाग तयार करण्यासाठी क्रोमियम वापरले जाते.

याशिवाय क्रोमियमचा उपयोग धातूंवर चकाकी आणण्यासाठी केला जातो.काही वस्तूंवर क्रोमियमचा पातळ थर दिला जातो, त्यामुळे त्या वस्तू अधिक सुंदर आणि टिकाऊ बनतात. क्रोमियमचा वापर रंग तयार करण्यासाठी आणि चामड्याच्या प्रक्रियेतही केला जातो. क्रोमियम हा आपल्या शरीरासाठी सूक्ष्म प्रमाणात आवश्यक असलेला घटक आहे. तो शरीरात साखरेचे नियंत्रण ठेवण्यास मदत करतो.

## काच, पण न फुटणारी!

तुम्ही घरात खेळताय, क्रिकेट मॅच अगदी रंगात आलीये. आई घरात नाहीये तेव्हा दंगा करायलाही भरपूर वाव आहे. कोणीतरी सगळी शक्ती पणाला लावून बॅट फिरवतो आणि बॉल वेगात काचेवर आपटतो. हे घरातच होतं असं नाही. सोसायटीच्या आवारात खेळतानाही बरेचदा असे खळ्ळंखळ्ळं आवाज येत असतात. हा आवाज आला की छातीत धडकी भरते ना? कारण त्यानंतर किती मार पडणार आहे आणि किती बोलणी खावी लागणार आहेत हे डोळ्यासमोरच येतं. हात थरथरायला लागतात, पाय कापायला लागतात



आणि घशाला कोरड पडते ती वेगळीच. अशा वेळी तुम्हालाही वाटतं ना! या काचा फुटतातच कशाला? त्याही दगडासारख्या टणक का नसतात? कदाचित तुमच्या मनातला हा प्रश्न संशोधकांनी ऐकला असावा. म्हणूनच त्यांनी न फुटणारी काच तयार केली आहे. लवकरच अशी काच बाजारात येऊ शकेल. मॅक्गिल विद्यापीठ, कॅनडा येथील इंजिनिअर्सनी एक प्रगत तंत्र वापरुन अशा प्रकारची दणकट काच तयार करण्याचा चंग बांधलाय. ही काच अथवा आरसा सहज वळेल, वाकेल, पडल्यास थोडंफार नुकसान होईल पण ती कधीच फुटणार नाही. फारसं नुकसान होणार नाही. विशिष्ट प्रकारच्या मिश्रणापासून या काचेला दणकटपणा देण्याचा प्रयत्न होतोय. विशेषतः मोठमोठ्या इमारतींमध्ये काचा लावण्याचं प्रमाण वाढतंय.

**कुतूहल**

एखादा अपघात झालाच तर वरुन वेगानं येणारे काचेचे तुकडे मोठं नुकसान घडवून आणू शकतात. या अपघातात अनेकांच्या जीवालाही धोका पोहचू शकतो. पण या अनोख्या तंत्राच्या सहाय्यानं बनवण्यात आलेली ही काच साध्या काचेपेक्षा २०० टक्के जास्त दणकट असेल.

### प्राणीजगत



#### असा आहे स्लो लॉरिस

स्लो लॉरिस नावाचा एक प्राणी आहे. हा प्राणी दक्षिणपूर्व आशियामध्ये आढळतो. लॉरिस दिसायला गोंडस असला तरी त्याचे दात तीक्ष्ण आणि विषारी असतात. शत्रूपासून बचावासाठी ते याचा वापर करतात. या प्राण्याला एकटं रहायला आवडतं. कधी तरी तो इतर लॉरिससोबत दिसतो.

### ट्राय इट

#### लेमन स्क्वॉश

गारेगार असं काही तरी प्यावंसं वाटतं. अशा वेळी तुम्ही लेमन स्क्वॉश बनवू शकता. चार लिंबू, दोन टी स्पून टार्टारिक ॲसिड, दोन कप साखर, अडीच कप गरम पाणी हे साहित्य घ्या. लिंबांची सालं काढून घ्या. एका भांड्यात रस काढा. त्यात टार्टरिक ॲसिड आणि साखर घाला. त्यात गरम पाणी घाला. थंड करा. हे पाणी गाळून बाटलीत भरून ठेवा.



ही बाटली फ्रीजमध्ये ठेवा. आता हवं असेल तेव्हा मस्त लिंबू सरबत करून प्या. एक झाकण लिंबू सरबत आणि तीन भाग पाणी असं प्रमाण घ्या. घरी येणाऱ्या पाहुण्यांना तुम्ही हे सरबत देऊ शकता.

### माहिती मोलाची

#### किती वेळ धुवायचे हात?

जेवण्याआधी आपण हात धुतो. हात धुणं हे अत्यंत साधं काम वाटतं. पण ते न धुतल्याने अनेक रोग होऊ शकतात. त्यातच हात किती वेळ धुवायचे हा प्रश्न उरतोच. साधारण ३० सेकंद हात धुवायला हवेत, असं जाहिरातींमधून सांगितलं जातं. २० ते ३० सेकंदांपर्यंत हात धुतल्याने नीट स्वच्छ होतात, असं संशोधनातून समोर आलं आहे. त्यामुळे पुढच्या वेळी कमीत कमी ३० सेकंद तरी हात धुवा.



### योगा टाईम

#### पूषाण मुद्रा



स्मरणशक्ती सुधारायची असेल तर पूषाण मुद्रा करता येईल. या मुद्रेमुळे प्राण, व्यान आणि अपान या तिन्ही वायूंचे लाभ एकाच वेळी मिळतात. हे आसन करण्यासाठी उजव्या हाताचं पहिलं, मधलं बोट आणि अंगठा यांचा पुढचा भाग जुळवून घ्या. करंगळी आणि त्याच्या शेजारचं बोट सरळ ठेवा. आता डाव्या हाताचा अंगठा, मधलं बोट आणि करंगळीच्या शेजारचं बोट यांचा वरचा भाग जुळवून घ्या. मांडी घालून बसा. दीर्घ श्वास घ्या आणि सोडा. सुमारे पंधरा मिनिटं हे आसन करा.

# खेळाडू हनी ट्रॅपच्या जाळ्यात?

## • बीसीसीआयला भीती • फ्रँचायझीना पाठवलं ८ पानांची नियमावली

| मुंबई | प्रतिनिधी |

इंडियन प्रीमियर लीग २०२६ चा हंगाम सुरू असताना आता बीसीसीआयने खेळाडू आणि फ्रँचायझींशी संबंधित नियमांबाबत कडक भूमिका घेतली आहे. आयपीएलदरम्यान खेळाडूंना संभाव्य हनी ट्रॅप आणि ब्लॅकमेलिंगसारख्या प्रकारांपासून सावध राहण्याचा इशारा देण्यात आला आहे. बीसीसीआयने सर्व फ्रँचायझींना ८ पानांची नियमावली पाठवत खेळाडूंच्या सुरक्षेबाबत विशेष सूचना दिल्या आहेत.



बीसीसीआय सचिव देवजित सैकिया यांनी सांगितले की, मोठ्या स्पर्धांमध्ये काही वेळा खेळाडूंना जाणीवपूर्वक जाळ्यात अडकवण्याचा प्रयत्न होऊ शकतो. अशा प्रकारांमुळे लैंगिक गैरवर्तनासारखे गंभीर आरोप किंवा कायदेशीर अडचणी निर्माण होऊ शकतात. त्यामुळे प्रत्येक संघाने आणि व्यवस्थापनाने अधिक सतर्क राहणे गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

बीसीसीआयने दिलेल्या नियमांनुसार आता खेळाडूंच्या हॉटेल रूममध्ये कोणत्याही बाहेरील व्यक्तीला थेट प्रवेश मिळणार नाही. कोणालाही भेटायचे असल्यास आधी टीम मॅनेजमेंटची परवानगी आवश्यक असेल. नातेवाईक किंवा मित्रांना फक्त हॉटेल लॉबी किंवा रिसेप्शन परिसरातच भेटण्याची मुभा दिली जाणार आहे.त्याचबरोबर खेळाडूंनी हॉटेलमधून बाहेर पडताना संघाच्या सुरक्षा अधिकाऱ्याला माहिती देणे बंधनकारक करण्यात आले आहे. सुरक्षा अधिकाऱ्याला न सांगता कोणताही खेळाडू किंवा सपोर्ट स्टाफ बाहेर जाऊ शकणार नाही. बीसीसीआयच्या मते, यामुळे खेळाडूंच्या सुरक्षेला धोका निर्माण होऊ शकतो. याशिवाय प्रत्येक खेळाडू आणि स्टाफ सदस्याने सुरक्षा तपासणीवेळी आपले ओळखपत्र दाखवणे आवश्यक असल्याचेही बीसीसीआयने स्पष्ट केले आहे. काही सदस्य सुरक्षा कर्मचाऱ्यांशी सहकार्य करत नसल्याच्या तक्रारी आल्यानंतर हे नियम आणखी कडक करण्यात आले आहेत.

काही आयपीएल फ्रँचायझी मालकांनी सामना सुरू असताना डगआउटमध्ये खेळाडूंशी चर्चा करणे टाळावे. हे नियम पीएमओए प्रोटोकॉल आणि सुरक्षेशी संबंधित आहेत. या नियमांनुसार सामना अधिकारी आणि पंच यांच्याशी कोणत्याही बाहेरील व्यक्तीने संपर्क साधू नये. यामध्ये मालकांनाही विशेष सूचना देण्यात आल्या आहेत. काही संघमालक सामना सुरू असताना खेळाडूंशी बोलताना दिसत असल्याने बीसीसीआयने त्यांना असे करू नये असे स्पष्टपणे सांगितले आहे. त्याचबरोबर सामना जिंकल्यानंतर खेळाडूंना मिठी मारणे किंवा मैदानात जाऊन संपर्क साधणे टाळावे, असेही निर्देश देण्यात आले आहेत. बीसीसीआयच्या मते, हे सामन्याच्या प्रोटोकॉलचे उल्लंघन मानले जाऊ शकते.

त्याचबरोबर बीसीसीआयने वेपिंग आणि प्रतिबंधित पदार्थांबाबतही कठोर नियमावली जारी केली आहे. काही ठिकाणी ड्रेसिंग रूममध्ये वेपिंग केल्याच्या घटना समोर आल्याने बीसीसीआयने याची गंभीर दखल घेतली आहे.

## रंगणार बॅडमिंटनचा महासंग्राम

**मुंबई :** महाराष्ट्रातील सर्वात मोठी आणि देशातील अग्रगण्य बॅडमिंटन लीगपैकी एक असलेली फिनिक्स बॅडमिंटन सुपर लीग ९ आणि १० मे रोजी नवी मुंबई स्पोर्ट्स असोसिएशन येथे होणार आहे. ही लीग महाराष्ट्र बॅडमिंटन असोसिएशन तसेच ठाणे शहर आणि जिल्हा बॅडमिंटन असोसिएशन यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडणार आहे. या लीगसाठी खेळाडूंचा लिलाव झाला त्यासाठी एकूण १३ लाख ७८ हजार रुपये खर्च करण्यात आले. प्रमुख खेळाडूंचा सहभाग दीप रांभिया, दर्शन पुजारी, सोनाली मिर्खे लकर, सोयरा शेलार, सिमरन सिंही (सध्याची उबर कप संघ सदस्य), अक्षय देवलकर (भारताचा माजी अव्वल खेळाडू) हे प्रमुख खेळाडू म्हणून सहभागी आहेत. याशिवाय अनेक राष्ट्रीय स्तरावरील नामांकित खेळाडू या लीगमध्ये सहभागी होत असून, त्यामुळे ही स्पर्धा ऐतिहासिक ठरणार आहे.

## निवडक

### भुवनेश्वर कुमारने घडवला इतिहास!

**नवी दिल्ली :** भारताचा स्विंगचा किंग म्हणून ओळखला जाणारा वेगवान गोलंदाज भुवनेश्वर कुमार सध्या भारतीय संघात स्थान मिळवण्याच्या प्रयत्नात आहे. आयपीएल स्पर्धेत त्याच्या दमदार गोलंदाजीचा नमुना पाहायला मिळाला आहे. आतापर्यंत त्याने आपल्या धारदार गोलंदाजीच्या बळावर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाच्या विजयात मोलाचं योगदान दिलं आहे. आयपीएल २०२६ स्पर्धेतील ५० वा सामना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि लखनौ सुपर जायंट्स या दोन्ही संघांमध्ये सुरू आहे. हा सामना भुवनेश्वर कुमारसाठी अतिशय खास आहे. कारण हा त्याच्या आयपीएल कारकिर्दीतील २०० वा सामना आहे. यासह त्याच्या नावे एका मोठ्या रेकॉर्डची नोंद झाली आहे. भुवनेश्वर कुमार हा आयपीएल स्पर्धेतील १९ वर्षांच्या इतिहासात २०० सामने खेळणारा पहिलाच वेगवान गोलंदाज ठरला आहे. याआधी बरेच खेळाडू आहेत ज्यांनी या स्पर्धेत २०० सामने खेळण्याचा मान पटकावला आहे. पण त्यात फलंदाज आणि यष्टीरक्षकांचा समावेश आहे. भुवनेश्वर कुमार हा पहिलाच वेगवान गोलंदाज आहे, ज्याने २०० सामने खेळण्याचा पल्ला गाठला आहे. तो २०११ मध्ये आपला पहिला सामना खेळण्यासाठी मैदानात उतरला होता. भुवनेश्वर कुमारसह युझवेंद्र चहल आणि सुनील नरेन यांनी देखील २०० सामने खेळण्याचा मान पटकावला आहे. भुवनेश्वर कुमारने आपल्या वेगवान गोलंदाजीच्या बळावर अनेक रेकॉर्ड मोडून काढले आहेत. २०१६ मध्ये त्याने पहिल्यांदा पर्पल कॅपवर कब्जा केला होता. या हंगामात सनरायझर्स हैदराबाद संघाने पहिल्यांदा जेतेपदाचा मान पटकावला होता. या हंगामात गोलंदाजी करताना त्याने सर्वाधिक २३ गडी बाद केले होते. त्यानंतर २०१७ मध्ये त्याने पुन्हा एकदा पर्पल कॅपवर कब्जा केला होता. या हंगामात गोलंदाजी करताना त्याने सर्वाधिक २६

### टॅक्स भरण्यातही कॅप्टन कूल अव्वल!

**नवी दिल्ली :** भारतीय संघाचा माजी कर्णधार महेंद्रसिंग धोनी कर भरण्याच्या बाबतीतही नंबर वन ठरला आहे. तो या बाबतीत अव्वल ठरला आहे. ही माहिती आयकर विभागाने दिली आहे. मिळालेल्या माहितीनुसार वैयक्तिक करदात्यांमध्ये भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार महेंद्रसिंग धोनीने सर्वाधिक कर भरला आहे. तर कंपन्यांमध्ये सेंट्रल कोलफिल्ड्स लिमिटेड, भारत कोकिंग कोल लिमिटेड आणि यांनी सर्वाधिक कर भरला आहे. आयकर विभागाचे प्रधान मुख्य आयुक्त डॉ. डी. सुधाकर राव यांनी सांगितले की २०२५-२६ या आर्थिक वर्षात बिहार आणि झारखंडमधून एकूण २०,००० कोटी रुपये जमा झाले असून त्यापैकी १२,००० कोटी रुपये एकट्या झारखंडमधून जमा झाले आहेत. त्यांनी पुढे सांगितले की एकूण जमा रकमेपैकी सुमारे ७० टक्के रक्कम कर कपातद्वारे मिळाली आहे. ते म्हणाले, गेल्या आर्थिक वर्षात धोनी हा बिहार आणि झारखंडमधील एकत्रितपणे सर्वाधिक कर भरणारा वैयक्तिक करदाता होता. मात्र त्याने आपल्या कराची नेमकी रक्कम जाहीर करण्यास नकार दिला आहे..मागील वर्षी पावसामुळे खाणकामावर थोडा परिणाम झाला होता, ज्यामुळे कर संकलनावरही परिणाम झाला. या आर्थिक वर्षात कर संकलनाचा २०,००० कोटी रुपयांचा टप्पा पार होईल अशी आम्हाला आशा आहे, असेही ते म्हणाले. पुढे ते म्हणाले की सध्या बिहार आणि झारखंडमध्ये अंदाजे ५.५ कोटी पॅनकार्ड धारक असून त्यापैकी फक्त ४० लाख लोक आयकर रिटर्न भरतात. याआधी त्यांनी नवीन आयकर कायदा २०२५ संदर्भात आयकर अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली होती. या बैठकीत दोन्ही राज्यांतील १०० हून अधिक अधिकारी सहभागी झाले होते.

### सुर्यकुमार यादवचे कर्णधारपद जाणार?

**मुंबई :** इंडियन प्रीमियर लीग २०२६ नंतर होणाऱ्या आयर्लंड आणि इंग्लंड दौऱ्यासाठी निवड समिती सूर्यकुमार यादवला टी-२० कर्णधारपदावरून हटवण्याची शक्यता आहे. सध्या भारतीय संघाचा टी-२० कर्णधार हा सूर्यकुमार यादव आहे.



मिळालेल्या माहितीनुसार या वर्षी सूर्यकुमार यादवचा फॉर्म हा निवड समितीसाठी चिंतेचा विषय बनला आहे. या उजव्या हाताच्या फलंदाजाची कामगिरी या वर्षी खराब ठरली आहे. चालू आयपीएल हंगामात देखील त्याची कामगिरी फारशी चांगली नाही. आयपीएल हंगामानंतर भारतीय संघाचा आयर्लंडमध्ये २ टी-२० सामन्यांचा आणि त्यानंतर इंग्लंडमध्ये ५ सामन्यांचा दौरा होणार आहे.येणाऱ्या २०२८ च्या टी-२० वर्ल्डकप आणि त्यानंतर लॉस एंजेलिस ऑलिम्पिकच्या पार्श्वभूमीवर भारतासमोर टी-२० क्रिकेटचं मोठं वेळापत्रक आहे. त्यामुळे संघ व्यवस्थापन आता पुढच्या योजना आखत असल्याचं सांगितलं जात आहे. सध्या तरी सूर्यकुमार यादवचे कर्णधारपदाचे दिवस संपत चालल्याचं बोललं जात आहे. खेळाडू म्हणून तो संघात स्थान टिकवून ठेवतो का हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे. सूर्यकुमार यादवने नुकत्याच झालेल्या टी-२० वर्ल्डकपमध्ये भारताला विजेतेपद मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती.

### हार्दिकचे मुंबई इंडियन्समध्ये पुनरागमन

**मुंबई :** मुंबई इंडियन्सचा कर्णधार हार्दिक पंड्या दुखापतीनंतर रायपूरला पोहोचला आहे. तो रविवारी रॉयल चॅलेंजर्स बंगळूरू विरुद्धच्या महत्त्वाच्या सामन्यासाठी संघात सामील झाला आहे.



हार्दिक सोमवारी लखनऊ सुपर जायंट्स विरुद्ध खेळल्या गेलेल्या मागील सामन्यात खेळला नव्हता. त्याच्या अनुपस्थितीत सूर्यकुमारने संघाचे कर्णधारपद सांभाळले होते. सूर्यकुमारही मुलाच्या जन्मामुळे मुंबईत आहे आणि रायपूरला पोहोचलेला नाही. मुंबई इंडियन्सने सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर हार्दिकचा फोटो शेअर करून तो रायपूरला पोहोचल्याची माहिती दिली. हार्दिक पंड्याला गेल्या आठवड्यात अचानक पाठीच्या स्नायूंना ताण येण्याची समस्या जाणवली होती. त्यानंतर वैद्यकीय पथकाने त्याला विश्रांतीचा सल्ला दिला होता. तथापि, दुखापत गंभीर नव्हती. खबरदारी म्हणून त्याला लखनऊविरुद्धच्या सामन्यातून वगळण्यात आले होते, जेणेकरून तो उर्वरित साम न्यांसाठी तंदुरुस्त राहू शकेल. आता तो पूर्णपणे बरा झाला आहे. रायपूरच्या शहीद वीर नारायण सिंह आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर शुक्रवारी मुंबई इंडियन्सचे सराव सत्र (ट्रेनिंग सेशन) होणार आहे. हार्दिक यात सहभागी होऊन नेट्समध्ये फलंदाजी आणि गोलंदाजीचा सराव करेल अशी अपेक्षा आहे. रविवारच्या सामन्यापूर्वी त्याची तंदुरुस्ती तपासण्यासाठी हे सत्र महत्त्वाचे मानले जात आहे.

## २०२८ पासून आयपीएल सामन्यांची संख्या वाढणार

**मुंबई :** आयपीएल २०२६ हा लीगचा १९ वा हंगाम आहे. सध्याचे आयपीएल अध्यक्ष अरुण धुमाळ यांनी लीगच्या भविष्याबद्दल एक मोठी माहिती दिली आहे. त्यांनी सांगितले की, २०२८ पासून आयपीएलमध्ये ७४ ऐवजी ९४ सामने खेळवले जातील. बीसीसीआय आगामी मीडिया राइट्स सायकलसाठी स्पर्धेच्या स्वरूपात मोठा बदल करण्याची योजना आखत आहे.

बोर्डाच्या अधिकाऱ्यांनी पुष्टी केली आहे की, २०२८ पासून एकूण सामन्यांची संख्या ९४ पर्यंत वाढवली जाईल. सध्या, प्लेऑफसह एका हंगामात केवळ ७४ सामने असतात. या नवीन निर्णयामुळे क्रिकेट चाहत्यांना पूर्वीपेक्षा अधिक रोमांचक सामने पाहायला मिळतील. सध्या, लीग टप्प्यात एक संघ १४ सामने खेळतो. मात्र, २०२८ पासून प्रत्येक संघ १८ सामने खेळेल.

याचा अर्थ स्पर्धा आणखी मोठी आणि अधिक आव्हानात्मक होईल. यामुळे गुणतालिकेतील लढत अधिकच रोमांचक होईल. अध्यक्ष अरुण धुमाळ यांनी दिलेल्या मुलाखतीत स्पष्ट केले की, सामन्यांची संख्या वाढणार असली तरी संघांची संख्या तीच राहील.

## पहिल्यांदाच भारतात येणार झिम्बाब्वे महिला क्रिकेट संघ

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

भारतीय महिला क्रिकेट संघ आणि झिम्बाब्वे यांच्यात ऑक्टोबरमध्ये तीन एकदिवसीय आणि तीन टी-२० सामन्यांची मालिका खेळली जाईल. झिम्बाब्वेची महिला संघ प्रथमच भारत दौऱ्यावर येणार आहे. दोन्ही देशांमध्ये आतापर्यंत कोणतीही द्विपक्षीय आंतरराष्ट्रीय मालिका झालेली नाही.




क्रिकेट इतिहासात पहिल्यांदाच भारत आणि झिम्बाब्वेचे महिला संघ कोणत्याही आंतरराष्ट्रीय साम न्यात आमनेसामने येतील. आतापर्यंत दोन्ही संघांचे सामने केवळ आयसीसी स्पर्धा किंवा पात्रता फेरीपुरते मर्यादित होते. द्विपक्षीय मालिकेच्या रूपात ही एक नवीन सुरुवात असेल. बीसीसीआय आणि झिम्बाब्वे क्रिकेटने या मालिकेच्या माध्यम ातून महिला क्रिकेटला प्रोत्साहन देण्यासाठी पाऊल उचलले आहे.

वेळापत्रकानुसार, दौऱ्याची सुरुवात टी-२० मालिकेने होऊ शकते, त्यानंतर एकदिवसीय मालिका खेळली जाईल. भारतीय महिला संघासाठी ही मालिका बेंच स्ट्रेंथ तपासण्याची आणि युवा खेळाडूंना संधी देण्याची चांगली संधी असेल.

रेकॉर्डनुसार, भारतीय महिला संघानेही आतापर्यंत द्विपक्षीय मालिकेसाठी झिम्बाब्वेचा दौरा केलेला नाही. पुरुष क्रिकेटमध्ये दोन्ही देशांमध्ये नियमित सामने होतात, पण महिला क्रिकेटमध्ये ही पहिली द्विपक्षीय मालिका असेल. झिम्बाब्वे महिला संघासाठी भारतात खेळणे हा एक मोठा अनुभव असेल.

ऑक्टोबरमध्ये होणारी ही मालिका भारतीय महिला संघासाठी महत्त्वाची मानली जात आहे. आगामी आयसीसी स्पर्धा लक्षात घेता, बीसीसीआय अधिक द्विपक्षीय मालिका आयोजित करत आहे. २०२७ मध्ये श्रीलंकेत महिला टी-२० चॅम्पियन्स ट्रॉफी होणार आहे.

## पाकिस्तानसोबत द्विपक्षीय मालिकांवर बंदी कायम

**मुंबई :** क्रीडा मंत्रालयाने बुधवारी स्पष्ट केले आहे की भारत आणि पाकिस्तान यांच्यातील द्विपक्षीय क्रीडा संबंध स्थगितच राहतील.सरकारने एक अधिकृत मेमोरँडम जारी करून म्हटले आहे की भारताचे क्रीडा धोरण त्याच्या मुत्सद्दी धोरणानुसारच चालेल. या अंतर्गत, भारतीय संघ द्विपक्षीय मालिका खेळण्यासाठी पाकिस्तानला जाणार नाहीत आणि पाकिस्तानी संघांना भारतात खेळण्याची परवानगी दिली जाणार नाही. तथापि, विश्वचषक किंवा ऑलिम्पिकसारख्या बहुपक्षीय स्पर्धांमध्ये दोन्ही देश एकमेकांविरुद्ध खेळू शकतील.



युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयाने हे निर्देश भारतीय ऑलिम्पिक संघटना , भारतीय क्रीडा प्राधिकरण आणि सर्व राष्ट्रीय क्रीडा महासंघांना पाठवले आहेत. मंत्रालयाने स्पष्ट केले की पाकिस्तानच्या बाबतीत भारताची भूमिका पूर्णपणे स्पष्ट आहे. हा निर्णय अशा वेळी आला आहे जेव्हा ७ मे रोजी ऑपरेशन सिंदूरची वर्षपूर्ती आहे, जे गेल्या वर्षी पहलगाम दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून सुरू करण्यात आले होते. त्या हल्ल्यात २६ नागरिकांचा बळी गेला होता.

सरकारच्या या भूमिकेचा सर्वाधिक परिणाम क्रिकेटवर झाला आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील शेवटची द्विपक्षीय मालिका २०१२-१३ मध्ये झाली होती, जेव्हा पाकिस्तानचा संघ भारतात आला होता.त्यानंतर दोन्ही संघ केवळ आशिया कप आणि आयसीसी स्पर्धांमध्येच एकमेकांसमोर आले आहेत. अलीकडच्या काळात चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ बद्दलही बरीच चर्चा होती, परंतु भारताच्या या कठोर भूमिकेवरून हे स्पष्ट होते की टीम इंडिया सीमेपलीकडे जाऊन खेळण्याच्या बाजूने नाही.

## लखनौचा सुपर विजय

**■ आरसीबीला पराभवामुळे मोठं नुकसान**

**■ प्लेऑफचे गणित बदलले**

**लखनौ:** रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरु आणि लखनौ सुपर जायट्स यांच्यात आयपीएल २०२६ मधील सामना रंगला. पावसाच्या व्यत्ययामुळे सामना १९-१९ षटकांचा रंगला. लखनौने १९ षटकात २०९ धावा केल्या. याउलट डीएलएस पद्धतीमुळे आरसीबीला २१३ धावांचे लक्ष्य मिळाले. आरसीबीने सहा विकेट्स गामवून २०३ धावा केल्या आणि सामना लखनौने ९ धावांनी जिंकला.

लखनौ सुपर जायंट्सने रॉयल चॅलेंजर्स बंगळूरला ९ धावांनी पराभूत केले. या विजयामुळे लखनौ संघाने सलग ६ पराभवांची मालिका खंडित केली आणि प्लेऑफमध्ये पोहोचण्याची आपली आशा जिवंत ठेवली. सामन्यावर पावसाचा परिणाम झाला आणि खेळ तीन वेळा थांबवण्यात आला. परिणामी, सामना प्रत्येकी १९ षटकांचा करण्यात आला. या सामन्यात, प्रथम फलंदाजी करताना लखनौ सुपर जायंट्सने १९ षटकांत ३ गडी गमावून २०९ धावांचा डोंगर उभा केला.

मिचेल मार्शने अवघ्या ५६ चेंडूंमध्ये १११ धावांची धडाकेबाज खेळी केली. निकोलस पूरनने ३८ धावा केल्या आणि कर्णधार ऋषभ पंतने नाबाद ३२ धावा करून संघाला या धावसंख्येपर्यंत पोहोचवले. या काळात, जोश हेझलवूड, कृणाल पांड्या आणि रसिक सलाम यांनी आरसीबीसाठी प्रत्येकी १ बळी घेतला. डीएलएस पद्धतीनुसार, सामना जिंकण्यासाठी आरसीबीला १९ षटकांत २१३ धावांचे लक्ष्य देण्यात आले. मात्र, आरसीबीची सुरुवात खराब झाली.

मोहम्मद शमीने पहिल्याच षटकात जेकब बेथेलला बाद केले, त्यानंतर प्रिन्स यादवने दुसऱ्या षटकात विराट कोहलीला शून्यावर बाद केले. प्रिन्स याद-वने सामन्यात एकूण ३ बळी घेत उत्कृष्ट कामगिरी केली आणि लखनौच्या विजयाचा नायक ठरला.

## विद्युत कंपन्यांच्या राष्ट्रीय स्पर्धेत महावितरण अजिंक्यपदाकडे

| पुणे | वृत्तसंस्था |

दि. ७ मे २०२६: अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियंत्रण मंडळाच्या ४७ व्या राष्ट्रीय स्पर्धेत महावितरणने सलग दुसऱ्या दिवशीही दबदबा ठेवत अजिंक्यपदाकडे वाटचाल सुरु केली आहे. यामध्ये महावितरणच्या खो-खोच्या महिला संघाने विजेतेपद मि ळवले आहे. तर कबड्डीमध्ये उपांत्य फेरीत तर खो-खो व बास्केटबॉलमध्ये पूर्वउपांत्य फेरीत महावितरणच्या संघाने प्रवेश केला आहे.




बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलात एमएसईबी होल्डिंग कंपनीद्वारे आयोजित या राष्ट्रीय स्पर्धेत गुरुवारी (दि. ७) खो-खोच्या महिला गटात महावितरण विरुद्ध राजस्थान असा अंतिम फेरीचा सामना झाला. यात महावितरणच्या कर्णधार भाग्यश्री फडतरे, सारिका जाधव, श्रेया जाधव, मोनिका भोसले यांनी आक्रमण व संरक्षणामध्ये दमदार कामगिरी करीत सामन्यावरील वर्चस्व कायम ठेवले. पहिल्या डावात १२ विरुद्ध ५ गुणांची आघाडी घेत दुसऱ्या डावात महावितरण संघाने सहा मिनिटे राखून खो-खोचे राष्ट्रीय विजेतेपद पटकावले. तर राजस्थानला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.

**बायर्न म्युनिकविरुद्ध १-१ च्या बरोबरीत स्थान | 30 मे रोजी बुडापेस्टमध्ये आर्सेनलशी सामना**

## पीएसजी सलग दुसऱ्यांदा चॅम्पियन्स लीगच्या अंतिम फेरीत

| मुंबई | वृत्तसंस्था |

पेरिस सेंट-जर्मेनने चॅम्पियन्स लीगच्या अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले आहे. बुधवारी रात्री अलायन्स एरिना येथे खेळल्या गेलेल्या उपांत्य फेरीच्या दुसऱ्या टप्प्यात ने बायर्न म्युनिकसोबत १-१ असा ड्रॉ खेळला. एकूण स्कोअर ६-५ राहिल्यामुळे, गतविजेता स्पर्धेच्या अंतिम सामन्यात पोहोचला आहे. आता ३० मे रोजी बुडापेस्टमध्ये होणाऱ्या अंतिम सामन्यात पीएसजीचा सामना प्रीमियर लीगच्या अव्वल संघ आर्सेनलशी होईल.



गेल्या आठवड्यात पॅरिसमध्ये झालेल्या पहिल्या टप्प्यातील सामन्यात ५-४ ने आघाडीवर होता. दुसऱ्या टप्प्यातील सामन्याच्या सुरुवातीलाच तिसऱ्या मिनिटात उस्मान डेम्बेलेने गोल करून संघाची एकूण आघाडी मजबूत केली. ख्विचा क्वाराटशेलियाच्या पासवर डेम्बेलेने चेंडू गोल पोस्टच्या वरच्या भागात पोहोचवून बायर्नची अडचण वाढवली.

पेरिस सेंट-जर्मेनचा फ्रेंच फॉरवर्ड उस्मान डेम्बेलेने ६ मे २०२६ रोजी दक्षिण जर्मनीतील म्युनिक येथे चॅम्पियन्स लीग सेमीफायनलच्या दुसऱ्या टप्प्यात बायर्न म्युनिकविरुद्ध योसिप स्टॅनिसिचला मागे टाकत गोलच्या दिशेने शॉट मारला.पेरिस सेंट-जर्मेनचा फ्रेंच फॉरवर्ड उस्मान डेम्बेलेने ६ मे २०२६ रोजी दक्षिण जर्मनीतील म्युनिक येथे चॅम्पियन्स लीग सेमीफायनलच्या दुसऱ्या टप्प्यात बायर्न म्युनिकविरुद्ध योसिप स्टॅनिसिचला मागे टाकत गोलच्या दिशेने शॉट मारला.

संपूर्ण सामन्यात बायर्न म्युनिकने पुनरागमनाचा प्रयत्न केला, पण च्या बचावाने जास्त संधी दिल्या नाहीत. इंजरी टाइममध्ये (९०+४ मिनिटे) हॅरी केनने गोल करून स्कोअर १-१ असा बरोबरीत आणला, पण तोपर्यंत खूप उशीर झाला होता. केनचा या हंगामातील हा १४वा चॅम्पियन्स लीग गोल होता. बायर्नला अतिरिक्त वेळेत जाण्यासाठी आणखी एका गोलची गरज होती, जो ते करू शकले नाहीत.

पीएसजीला इतिहास रचण्याची संधी आहे. अंतिम सामना जिंकल्यास, ती १९९० नंतर चॅम्पियन्स लीगचे विजेतेपद राखणारी (डिफेंड करणारी) दुसरी टीम बनेल. यापूर्वी केवळ रिअल माद्रिदने सलग विजेतेपदे जिंकली आहेत. गेल्या वर्षी ने याच मैदानावर इंटर मिलानला हरवून आपले पहिले चॅम्पियन्स लीग विजेतेपद जिंकले होते.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)